सोलापूर
तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, २२ ऑक्टोबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २०९ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

अखेर महाविकास आघाडीत 'ऑल इज वेल!'

काँग्रेस हायकमांडची राज्यातील नेत्यांना सबुरीची सूचना; जागा वाटपाचा फॉर्मुला आज निश्चित होणार

तभा वृत्तसेवा/ जमीर काझी

मुंबई, दि.२१ ऑक्टोबर:

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना विरोधी महाविकास आघाडीतील प्रमुख दोन पक्ष असलेल्या काँग्रेस व उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत जागा वाटपावरून झालेला वाद अखेर पेल्यातीलच ठरण्याचे जवळपास निश्चित झाले आहे कोणत्याही परिस्थितीत आघाडी बिघाडी होऊ देऊ नका अशा सूचना काँग्रेसच्या हायकमांडने राज्यातील नेत्यांना दिल्याने त्यांनीही आक्रमक भूमिका सोडून दिली असून मंगळवारी पुन्हा जागा वाटपाबाबत उद्धव ठाकरे व शरद पवार गटाच्या नेत्यांमध्ये निर्णायक बैठक होत आहे. त्यामध्ये जागा वाटपाचा फॉर्मुला निश्चित करण्यात येणार आहे.

सोमवारी दिल्लीत काँग्रेस मुख्यालयात निवडणूक समितीची बैठक रात्री उशिरापर्यंत सुरू असून त्यामध्ये पक्षाचे उमेदवार जवळपास निश्चित करण्यात आले आहेत.

विदर्भात ठाकरे गटाला किमान १२ जागा हव्या आहेत मात्र काँग्रेस त्यांना ८ जागाहून अधिक देण्यास तयारी नव्हती. त्यामुळे ठाकरे गटाचे नेते संजय राऊत व काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यात गुरुवारी झालेल्या बैठकीत खडाजंगी झाली होती. त्यानंतर राऊत यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केल्यानंतर महाराष्ट्राचे काँग्रेसचे प्रभारी रमेश

चेनिथला तातडीने मुंबईत येऊन मातोश्री वर जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. त्यानंतर यशवंतराव चव्हाण सेंटर जाऊन राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांची भेट घेतली होती मात्र त्यानंतर रात्री बीकेसी मध्ये झालेल्या जागा वाटपामध्ये ही पुन्हा काही जागांचा तिढा कायम राहिल्याने बैठक अर्धवट ठेवण्यात आली . त्याचबरोबर त्याचवेळी उद्धव ठाकरे यांनी शनिवारी व रविवारी मातोश्रीवर पक्षाचे राज्यातील सर्व आमदार व प्रमुख नेत्यांना बैठक घेतली .तर आदित्य ठाकरे यांनी शरद पवार यांची स्वतंत्रपणे भेट घेतली होती. या घडामोडी वेगाने घडत असल्याने नाराज ठाकरे आघाडीतून बाहेर पडतील ,अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली. त्यातच संजय राऊत यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतल्याची ही चर्चा सुरू झाली.तर काँग्रेसचे राज्यातील नेते मुंबई दिल्लीला जाऊन हायकमांडशी चर्चा करत होते. सोमवारी सकाळी झालेल्या बैठकीत काँग्रेसच्या हाय का माननीय महाराष्ट्रात कोणत्याही परिस्थितीत महाविकास आघाडी कायम ठेवून निवडणूक लढविल्या जातील ,हे राज्यातील नेतृत्वाला समोर स्पष्ट केले. विदर्भातील जागावाटप सामुपचाराने सोडविण्याची सूचना केली. त्यानंतर प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांशी बोलताना ठाकरे गटाबरोबर कोणताही वाद नसल्याचे स्पष्ट केले. राज्यातील ९६ जागाबाबत काँग्रेस निवडणूक समितीत चर्चा झाली असून ही नावे जवळपास निश्चित करण्यात आले असल्याचे त्यांनी स्पष्ट केलेत मंगळवारी शरद पवार व उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करून जागावाटपचा फॉर्मुला जाहीर करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तर संजय राऊत यांनीही अमित शाह यांच्या भेटीबाबतच्या अफवा असल्याचे सांगून राज्यात महाविकास आघाडी एकत्रितपणे निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट केले.

१७ जागांबाबत आघाडीत वाद

जवळपास १७ जागांवर एकमत होऊ शकलेले नाही .त्यामध्ये विदर्भातील आरमोरी, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, चिमूर, बल्लारपूर, चंद्रपूर, रामटेक, कामठी, दक्षिण नागपूर, अहेरी, भद्रावती वरोरा या जागांवर शिवसेना ठाकरे गटाकडून दावा करण्यात आला आहे. मात्र, या जागा देण्यास काँग्रेस आणि शरद पवार गटाने त्याला तयार नाही.महाविकास आघाडीच्या जागा वाटपामध्ये सुरुवातीपासूनच विद्यमान आमदार ज्या पक्षाचा आहे त्या पक्षाला ती जागा सोडली जाईल असा फॉर्म्युला ठरला होता. मात्र या जागा ठाकरे गटांकडून मागितले जात आहेत. या जागा काँग्रेसने जिंकूनही ठाकरे गटाकडून दावा केला जात आहे.

शरद पवारांच्याकडून 'पॅचअप '

शनिवारी काँग्रेस आणि ठाकरे गटामधील वाद टोकाला पोहोचला असताना आघाडीत बिघाडी होण्याची शक्यता निर्माण झाली होती त्याचवेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष शरद पवार यांनी त्यामध्ये लक्ष घातले. आदित्य ठाकरे यांनी अनिल परब यांच्या समवेत येऊन त्यांच्याकडे घराणे मांडले त्यानंतर त्यांनी काँग्रेसच्या दिल्लीतील नेत्यांशी चर्चा केली . तसेच त्यांचा निरोप घेऊन प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील रविवारी रात्री उद्धव ठाकरे यांची मातोश्रीत जाऊन चर्चा केली. त्यानंतर काँग्रेस व ठाकरे गटाकडूनही सकारात्मक चर्चा होऊन जागा वाटपाबाबत मंगळवारी अंतिम निर्णय घेण्याचे ठरले.

काँग्रेसच्या ९६ जागा निश्चित- पटोले

महाविकास आघाडीत कोणतेही मतभेद नसून जागा वाटपाची चर्चा मंगळवारी पूर्ण करण्यात येणार आहे काँग्रेसच्या ९६ जागा वरील उमेदवारी जवळपास निश्चित झाले असून ती उद्या जाहीर केली जाईल असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी दिल्लीतील पक्ष नेतृत्वाच्या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले.

महाराष्ट्रद्रोही समवेत शिवसेना जाणार नाही- संजय राऊत

महाविकास आघाडीत काही जागा बाबत वाद असला तरी आमची आघाडी कायम राहणार आहे जागावाटपाबाबत सकारात्मक तोडगा काढण्यात येत असून महाराष्ट्र द्रोही भाजपा बरोबर शिवसेना कधीही जाणार नाही असे ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी सांगितले आपली आमित शाह यांच्याशी चर्चा झाल्याच्या इन्कार करीत या निव्वळ अफवा पसरवल्या जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पोलीस हुतात्यांना राज्यपाल, मुख्यमंत्री यांचे अभिवादन

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई,दि.२१ ऑक्टोबर : पोलीस स्मृतिदिनानिमित्त गेल्या वर्षभरात संपूर्ण देशात शहीद झालेल्या पोलीस हुतात्म्यांना सोमवारी नायगाव पोलीस मुख्यालय येथील पोलीस स्मृतिस्तंभावर राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन , मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली अर्पण केली. दरवर्षी २१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस स्मृतिदिन म्हणून देशभरात साजरा केला जातो.गेल्या वर्षभरात देशात प्राप्त झालेले ३९ पोलीस अधिकारी व १७७ पोलीस अमलदार शहीद झाले आहेत.

यावेळी पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर, विविध देशांचे मुंबईतील वाणिज्यदूत व प्रतिनिधी, वरिष्ठ पोलीस अधिकारी व निमंत्रित यांनी देखील पोलीस स्मृतिस्तंभाजवळ जाऊन हुतात्म्यांना अभिवादन केले. शहीद झालेल्या सर्व पोलीस अधिकारी व अंमलदारांची नावे वाचून दाखविल्यानंतर पोलीस बँड पथकाद्वारे सलामी शस्त्र धून वाजविण्यात आली. यावेळी अधिकारी व जवानांनी सलामी दिली तसेच पोलिसांतर्फे अभिवादन रूपात बंदुकीच्या तीन फैरी झाडण्यात आल्या. राज्यपालांनी निमंत्रित देश-विदेशी पाहुणे, वरिष्ठ पोलीस अधिकारी व हुतात्म्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली.

बेल्जीयमचे आर्थिक शिष्टमंडळ मार्चमध्ये मुंबई दौऱ्यावर येणार

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.२१ ऑक्टोबर:

बेल्जीयमचे राजे फिलिप यांच्या भगिनी प्रिन्सेस ऍस्ट्रिड यांच्या नेतृत्वाखाली बेल्जीयम येथील व्यापार - उद्योजकांचे भव्य आर्थिक शिष्टमंडळ (बेल्जीयन इकॉनॉमिक मिशन) येत्या मार्च महिन्यात भारत भेटीवर येणार असून त्यावेळी मिशनचे सदस्य दिल्लीसह मुंबईला भेट देणार आहेत , अशी माहिती बेल्जीयमचे मुंबईतील वाणिज्यदूत फ्रँक गिरकेंस यांनी राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची राजभवनातील भेटीवेळी दिली.

बेल्जीयमचा महाराष्ट्र व गुजरातशी हिऱ्यांचा मोठा व्यापार असून बेल्जीयम आता भारताशी लॉजिस्टिक्स, उत्पादन व आरोग्य सेवा क्षेत्रात सहकार्य वाढवणार असल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी सेमीकंडक्टर व्यापाराबद्दल देखील चर्चा होऊ शकते असे वाणिज्यदूतांनी सांगितले.

भारत युरोप व्यापार वाढविण्याबाबत फेडरेशन ऑफ युरोपिअन बिझनेसेस इन इंडिया (फेबी) काम करीत असून कौशल्य वर्धन या क्षेत्रात देखील बेल्जीयम महाराष्ट्रातील कौशल्य विद्यापीठाशी सहकार्य करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

भारत व युरोपमधील मुक्त व्यापार धोरण लवकर मंजूर झाल्यास त्याने उभयपक्षी व्यापार दुपटीने वाढेल असे राज्यपाल राधाकृष्णन यांनी यावेळी सांगितले.

देशातील १ लाख तरुणांना आणणार राजकारणात, पंतप्रधान नरेंद्र मोदींची घोषणा

वाराणसी : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज मोठी घोषणा केली आहे. वाराणसीमध्ये बोलत असताना, देशातील एक लाख तरुणांना राजकारणात आणणार असल्याचं वक्तव्य मोदींनी केलं आहे. तरुणांचे कुटुंबवादामुळे सर्वाधिक नुकसान होत आहे. यासाठीच आम्ही राजकारणात अशा एक लाख तरुणांना आणण्याचा संकल्प केला असल्याचं पंतप्रधान म्हणाले.

झच् मोदींच्या हस्ते ६७०० कोटी रुपयांच्या २३ प्रकल्पांचे उद्घाटन

रविवारी वाराणसीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक मोठी घोषणा केली. देशामधील १ लाख तरुणांना राजकारणात आणणार असल्याचं ते म्हणाले. ज्या कटुंबामधील राजकारणाशी काहीही संबंध नाही त्या तरुणांना नव्या राजकारणाचे केंद्रस्थान बनवलं जाईल असेही पंतप्रधान मोदी म्हणाले. आज ६७०० कोटी रुपयांच्या २३ प्रकल्पांचे पंतप्रधान मोदींच्या हस्ते उद्घाटन झाले. पंतप्रधान मोदींचा तिसऱ्या कार्यकाळातील हा दुसरा वाराणसी दौरा होता. आरजे शंकरा नेत्र रुग्णालयाचे या भेटीदरम्यान त्यांनी उद्घाटन केले. तसेच शंकराचार्य स्वामी शंकर विजयेंद्र सरस्वती यांची भेट घेऊन त्यांची प्रकृती देखील जाणून घेतली.

तरुणांचे कुटुंबवादामुळे सर्वाधिक नुकसान

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, आमच्या सरकारमध्ये कोणाशीही भेदभाव केला जात नाही. घराणेशाहीच्या राजकारणापासून आणि भारताला जातीय मुक्त करण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे पंतप्रधान यावेळी म्हणाले. देशात तरुण राजकारण आलं की, लोकशाही जास्तीत- जास्त मजबूत होईल असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यावेळी म्हणाले.

एनडीए सरकारने कोणाचाही हक्क हिरावून घेतला नाही

राम मंदिराच्या उभारणीचा आपल्या भाषणात संदर्भ देत पीएम मोदी म्हणाले की, अयोध्येमध्ये भव्य राम मंदिर बांधले जाईल, असे आम्ही सांगितले होते. लाखो लोक आज रामललाच्या दर्शनासाठी अयोध्येला जात असल्याचे मोदी म्हणाले. सरकारने तिहेरी तलाकपासून स्वातंत्र्य आणि महिलांना आरक्षण देण्याचे काम केलं आहे. एनडीए सरकारने कोणाचाच हक्क हिरावून घेतलेला नाही, गरिबांनासुद्धा दहा टक्के आरक्षण देण्याचे काम केल्याचे पंतप्रधान मोदी म्हणाले.

सोयगाव तालुक्यातील एका मुलाचा व मुलीचा विज पडून मृत्यू

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२१ ऑक्टोबर - सोयगाव तालुक्यातील हनुमंतखेडा येथे शेतातुन घरी जातांना चौदा वर्षिय मुलगी,तर बोरमाळ तांडा (ता.सोयगांव) येथील बर्कऱ्या चारतांना सोळा वर्षीय तरुणासह आठ बर्कऱ्यांच्या वीज पडून जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना सोमवारी (दि.२१)तीन वाजेच्या सुमारास घडली. आश्विनी मच्छिंद्र राठोड (वय.१४)रा हनुमंतखेडा,अजय नथ्थु राठोड (वय १६)रा.बोरमाळ तांडा असे मृतांचे नावे आहेत.

बनोटी परिसरातील गेल्या दहा दिवसांपासून परतीच्या पावसाने धुमाकूळ घातला आहे. सकाळ पासुन पाऊस विश्रांती घेत दुपारी दोन वाजेपासुन विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे शेतकरी मजुर जिवाची पर्वा न करता मिळेल त्या वेळेत शेतातील कामे करीत आहेत हनुमंतखेडा येथील मृत मुलीबरोबर आई वडील,बहीण आणि भाऊ असे पाचही जण हनुमंतखेडा शिवारातील गट क्रमांक १२९ मध्ये कापुस वेचताना अचानक विजांच्या कडकडाटासह पावसाला सुरुवात झाल्याने आई,वडील व मुलांनी घेत घरचा रस्ता धरला घराकडे येतांना आश्विनी सर्वात पुढे होती आणि आई,वडील,भाऊ,बहीण



चालत असतांना अचानकपणे वीज पडली यात आश्वनीचा जागीच मृत्यू झाला सुदैवाने यात आई,वडील,भाऊ आणि बहीण असे चार काहीही इजा पोहचली नाही.बोरमाळ तांडा येथील अजय नथ्थु राठोड हे सकाळी दहा वाजता नेहमी प्रमाणे बर्कऱ्या घेऊन जंगली कोठा शिवारात चारण्यासाठी घेऊन गेला बर्कऱ्या चारत असतांना अचानक वीज कोसळली यात त्याचा जागीच मृत्यू झाला तर आठ शेळ्या ही वीजेचा धक्का बसून मृत्यू झाला शिवारातील मजुर धावत जाऊन बघितले असता हा प्रकार लक्षात आला.

दोघाही मृत अल्पवयीन मुलांना बनोटी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आणले असता आरोग्य अधिकारी डॉ. रब्बानी शेख यांनी तपासून मृत केले त्याच्यावर बनोटी येथील आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यात आले.बनोटी दुरक्षेत्रात दोन्हीही घटनेची अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. दोघेही अल्पवयीन मुले हे घरातील कर्ते असल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असुन परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

राज ठाकरेंकडून दोन उमेदवारांच्या नावाची घोषणा; डोंबिवलीतून राजू पाटील यांना तर अविनाश जाधव यांना

डोंबिवली : इगझ ने आपली पहिली यादी रविवारी (ता. २० ऑक्टोबर) जाहीर केल्यानंतर आता सर्वच राजकीय पक्ष हळूहळू आपापल्या उमेदवारांच्या नावांची घोषणा करू लागले आहेत. सर्वच पक्षातून विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची यादी जाहीर केली जात आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी याआधीच आपली काही नावे सभांच्या माध्यमातून जाहीर केली आहेत. त्यानंतर आता डोंबिवलीमधील एका कार्यक्रमातून त्यांनी आपल्या विद्यमान आमदार राजू पाटील आणि अविनाश जाधव या दोन शिलेदारांच्या नावांची घोषणा केली आहे. आमदार राजू पाटील यांच्या कार्यालयाचे डोंबिवली येथे सोमवारी (ता. २१ ऑक्टोबर) उद्घाटन करण्यात आले. राज ठाकरे या कार्यक्रमाला सुद्धा उपस्थित होते. या कार्यक्रमादरम्यान त्यांनी ही घोषणा केली. तर आज किंवा उद्या मनसेकडून अधिकृतपणे यादी जाहीर करण्यात येणार असल्याचंही सांगण्यात आलं आहे.

आमदार राजू पाटील यांनी डोंबिवलीतील कल्याण-शिळफाटा रस्त्यावरील मानपाडा येथे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपल्या नव्या कार्यालयाचे उद्घाटन केले. मनसैनिकांनी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. राज ठाकरे यांनी या कार्यालयाचे उद्घाटन केले. यावेळी त्यांनी उपस्थितांसोबत संवाद साधला. त्यावेळी ते म्हणाले की, उमेदवारांच्या यादीवर शेवटचा हात फिरवला जातो आहे. आज किंवा उद्या उमेदवारांची दुसरी यादी जाहीर होईल. पण त्याआधी कल्याण ग्रामीणमधून मी राजू पाटील आणि ठाण्यातून अविनाश जाधव यांची उमेदवारी जाहीर करतो आहे. मी दोघांचे उमेदवारी अर्ज येत्या २४ तारखेला भरण्यासाठी येत आहे, अशी माहिती राज ठाकरे यांनी दिली.

मनसेने लोकसभा निवडणुकीच्यावेळी शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादी (अजित पवार) पक्ष या महायुतीला बिनशर्त पाठिंबा दर्शवला होता. आता विधानसभेसाठी महायुती सोबत न राहता राज ठाकरे यांनी स्वतंत्र भूमिका घेऊन आपले उमेदवार उभे करण्याची तयारी केली आहे. त्यामुळे लोकसभेच्या काळात महायुतीबरोबर असणाऱ्या राज ठाकरे यांच्या मनसेच्या उमेदवारांचा सामना आता भाजपा, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पक्षाबरोबर असणार आहे.

दुष्काळमुक्त मराठवाड्याचे लेखी आश्वासन द्या

मराठवाडा पाणी परिषदेची सर्व पक्षाकडे आग्रही मागणी

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

रविवार, २० ऑक्टोबर रोजी दुष्काळमुक्त मराठवाड्याचे सर्वच राजकीय पक्षांनी विधानसभा निवडणूक जाहिरनाम्यात लेखी आश्वासन द्यावे, अशी आग्रही मागणी मराठवाडा पाणी परिषदेने केली आहे. मराठवाड्याच्या न्याय हक्काचे पश्चिम वाहिनी नद्यांचे १६८.७५ टीएमसी, कृष्णा मराठवाडा प्रकल्प २५ टीएमसी, विदर्भातील अतिरिक्त ३४ टीएमसी पाणी दुष्काळी मराठवाड्याला देऊन मराठवाड्याला लागलेला दुष्काळाचा कलंक कायमचा मिटवावा, अशी मराठवाड्यातील जनतेची अपेक्षा आहे.

२०१२ पासून सततच्या दुष्काळामुळे मराठवाड्याचे कधीही भरून निघणार नाही एवढे मोठे नुकसान झाले आहे. पिण्यासाठी, शेतीसाठी, पशुधनासाठी पाण्याचा अभाव, जळालेल्या फळबागा, बेरोजगारी, स्थलांतर, आरोग्य, शिक्षणविषयक प्रश्न आदी सर्वांच्या केंद्रस्थानी पाणी हाच मुद्दा आहे. या दुष्टचक्रामुळे आजतागायत मराठवाड्यातील दहा हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या असून, आत्महत्यांचे सत्र सुरूच आहे. पाण्याअभावी मराठवाड्यामध्ये वाळवंटीकरणाची प्रक्रिया सुरू झालेली आहे. यापुढे असा दुष्काळ मराठवाड्याला परवडणारा नाही. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासून आजतागायतची जलविषयक धोरणे व विविध योजना मराठवाड्यातील जनतेला पुरेसे पाणी देऊ शकलेल्या नाहीत. हा दुष्काळ कायमचा संपावा यासाठी एकात्मिक जल व्यवस्थापन नीतीचा अंतर्भाव असलेल्या मागण्या सर्वच राजकीय पक्षाकडे करण्यात आलेल्या आहेत.

सततच्या दुष्काळामुळे मराठवाड्यातील ग्रामीण जनतेचे जीवन अस्वस्थ आहे. २३ ऑगस्ट २०१९ ला पश्चिम वाहिनी नद्याचे १६८.७५ टीएमसी पाणी वळवण्याचा शासन निर्णय होऊनही वाटीभर पाणी मराठवाड्याला मिळालेले नाही. सर्वच राजकीय पक्षाच्या खोट्या आश्वासनाची मराठवाड्यातील जनतेला चीड आलेली आहे. आता तरी पश्चिम वाहिनी नद्यासह उर्वरित भागातील अतिरिक्त पाणी मराठवाड्याकडे वळवून अपूर्ण धरणे, वितरण व्यवस्था, वर्षोन्वर्षे साठलेला गाळ, अवर्षणप्रवण भागात पाणलोट उपचार कामे यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबवून दुष्काळ कायमचा हटवणे शक्य आहे. आवश्यकता आहे राजकीय इच्छाशक्तीची. सर्वच राजकीय पक्षांनी मराठवाड्याचा पाणी प्रश्न गांभीर्याने घ्यावा, अन्यथा मराठा आरक्षण आंदोलनासारखे दुसरे पाणी प्रश्नाचे आंदोलन मराठवाड्यात उभे राहील. मराठवाड्यातील जनतेने विधानसभानिहाय उमेदवाराकडून मराठवाडा दुष्काळ निवारणाचे लिखित आश्वासन घ्यावे, अशी मागणी मराठवाडा पाणी परिषदेचे अध्यक्ष नरहरी शिवपुरे, उपाध्यक्ष मनोहर सरोदे आदींनी सर्व राजकीय पक्षांकडे केली आहे.

* अर्थव्यवस्था दुपटीने वाढणार

मराठवाड्याचे सध्याचे सिंचन क्षेत्र १८ टक्के आहे. सिंचन वाढीसाठी एकात्मिक जलनीती अंतर्गत सर्व पर्यायांचा एकत्रित विचार करून कालबद्ध कार्यक्रम राबवून पाण्याचा कार्यक्षम व उत्पादक वापर केल्यास सिंचन क्षमता ५० टक्क्यांपर्यंत वाढून मराठवाड्याची अर्थव्यवस्था दुपटीने वाढणार आहे

आनंदाचे डोही

अपर्णा कुळकर्णी / ९४२१२१२४४८

वह कागज की कश्ती... बाल आमोद!

सीमा-सुरेश निवृत्तीनंतरचे शांत समाधानी जीवन जगत होते. दोन्ही मुले परदेशी स्थायिक, सारेच कसे सुखवस्तू वैभवशाली! पण, मुलांकडे जाऊन आल्यापासून सीमाचे कशातच लक्ष लागत नव्हते. तिचा उत्साहच जणू मावळला होता. नातवंडांच्या आठवणीने तिचं मन कशातच रमेना. 'चल संध्याकाळी बागेत जाऊ,' असे सुरेशने सीमाला म्हटले तेव्हा तिने,'हे काय आपले बागेत जायचे वय आहे का?' म्हणत त्याचे म्हणणे धुडकावून लावले. सुरेश गमतीने म्हणाला,'आपली सेकंड इनिंग आनंददायी करण्यासाठी बागेत जाणे आवश्यकच!' सकाळी हास्य क्लबला जातोस ते कमी म्हणून संध्याकाळी पुन्हा बागेत जायचे वाटते तुला? सीमाने प्रतिप्रश्न केला. 'अग तुझ्यासाठी एक गुपित आहे तिथे! सीमा, आज चल नाही आवडलं तर उद्यापासून नको येऊस, मग तर झालं.' उतारवयात आनंद हे शक्तिवर्धक औषधाचे काम करतं असं तो आमच्या कंपूतील डॉ. अशोक नेहमीच सांगत असतो बरं ! बघ तरी बागेत सापडतं का तुला एखादं आनंदाचं रोप?'

'चल, तुझं व्याख्यान ऐकण्यापेक्षा आज तरी येते बाबा.' चिमण्या पाखरांनी भरलेली बाग बघून सीमाच्या चेहऱ्यावर स्मित पसरले. लहान मुलांच्या खेळण्याच्या विभागातील एका रिकाम्या बाकावर बसून, दोघे मुलांच्या गमती जमती बघत गप्पा मारू लागले. घसरगुंडी घसरून नुकताच चालायला शिकलेला एक गोंडस, गुबगुबीत मुलगा आजी...आजी म्हणून यांच्याकडे येण्याचा प्रयत्न करूलागला. सीमाला काही कळेना. उठावे की नको? त्याला उचलून घेतलेलं नाही आवडलं त्याच्या आई बाबांना तर! सीमा असा विचार करत होतीच तोवर ते गोजिरे रूप त्यांच्याकडे झेपावले. सीमाने कडेवर घेतल्यावर ते मस्त टाळ्या पिटू लागले. घसरगुंडीच्या बाजूला उभे राहून आपल्या बाळाची गंमत बघणारे आईबाबा पुढे होऊन यांच्याशी गप्पा मारूलागले. 'त्याला आजीआबा खूप आवडतात पण, आमच्या दोघांच्याही आईबाबांना इथे राहणे सध्या शक्य नाही. तुम्हा दोघांना बघून किती आनंद झालाय त्याला! जणू आजीआबाच भेटले. थोड्यावेळाने संभाषण आटोपून, उद्या भेटू हं सोहम आपण! असे म्हणून टाटा बाय-बाय करत मंडळी घरी आली ती प्रफुल्लीत चेहऱ्यानेच! सुरेशच्या लक्षात आले. अशोकची मात्रा लागू पडली. मग न चुकता रोजची संध्याकाळ बालगोपाळांशी खेळण्यात, त्यांना श्लोक शिकवण्यात व्यतीत होऊ लागली. आपल्या दोन नातवांसाठी झुरणारी सीमा आता कित्येकांची हक्काची आजी झाली. दुडुदुडू धावणारे, बॉलची फेकाफेकी करणारे, घसरगुंडी, सिसॉ खेळणारी एकटी मुलं आजीआबांना आपला सवंगडी-दोस्त बनवून टाकू लागली. बागेत येणाऱ्या आईबाबांनाही थोडे निवांत क्षण लाभू लागले. बोबडे बोल, दात यायच्या आधीचे बोळके असलेले कृष्णरुप जणू जीवनाचा अविभाज्य भाग झाला. मग काय! आनंदी संप्रेरकेही सीमाच्या भेटीला आतुर व्हायला लागली.

'थकल्या भागल्या, कोमेजल्या निराश मनावर उत्साहाची रंग उधळण करीत सहजतेने जीवन गीत कसं गायचं, याचे क्लासेस सुरूकरा वहिनी तुम्ही!' म्हणून अशोक भाऊजी सीमाला चिडवू लागले. 'फुलपाखरू

पकडायला, उन्हाचे कवडसे पकडायला धावणारी निरागसता बघून आपणही निरागस होऊन जातो, असं जाणवायला लागलंय हल्ली मला,' सीमा म्हणाली. 'लहान मुले बघितली की, आपोआपच निसर्गदत्त प्रेमाची अनुभूती येते. त्यांच्यातील निखळ आनंद झरा , निरागस गोड हास्य आपल्या मनालाही आनंदीत करते. निरपेक्ष प्रेमभाव ऑक्सिटोसिनची निर्मिती करून आनंद निर्माण करतो बरं का सीमा वहिनी!' लहान मुले उत्साहाचा धबधबा असतात, त्यांच्यात प्रचंड ऊर्जा असते. त्यांचं मोहक चैतन्य रूप बघून त्याचा सकारात्मक परिणाम म्हणून आपणही आनंदी होतो. लहान मुलांमध्ये रमताना आपल्यात दडलेल्या हसऱ्या खेळकर आणि खोडकर मुलाला अधूनमधून प्रकट होऊ दिले तर, बहार येईल ना! लोकं काय म्हणतील? वयाला शोभेल का? असा विचार करण्यापेक्षा हे लहान होणे! 'आनंद नक्षत्राची' झुंबरे लावणारं असेल तर लहान मुलांशी लहान मूल होऊन थोडा वेळ नक्कीच खेळायला हवं, असे मी सर्वांना सांगत असतो.

'वह मासूम चाहत की तस्वीर अपनी,
वह ख्वाबों खिलौनों की जागीर अपनी'

तुम्ही परत मिळवलीत वहिनी. हे मात्र तुमच्या दोघांकडे बघून अख्ख्या गुपला अगदी पटलंय बरं!'

'काय सुंदर दृश्य बघायला मिळालं आम्हाला यंदा तुमच्याकडे उन्हाळ्यात! बाहुला बाहुलीचे लग्न काय, पावसाळ्यात सुट्या कागदाच्या नावा करतोय मुलांसोबत अन् तुम्ही सर्व शेजारपाजारचे बाल मुकुंद घेऊन वाहत्या पाण्यात नावा सोडून, त्यांच्या आनंदाचा जणू हिस्साच झालेले! आधुनिक काळाने शिवलेले शिष्टाचाराचे पडदे बाजूला करून तुम्ही सोसायटीतील कित्येक मुलांचे आजी आजोबा होऊन त्यांना बालपणातील मौज लुटू दिलीत. बाल आमोद हीच जणू तुमची संपत्ती झाली; असे मला वाटू लागले.'

बादलीभर...

अंजली पांडे /९९२३३८१६४१

भाऊसाहेब खांडेकरांची एक कथा आहे. घरात खूप अडगळ झाली म्हणून त्यांनी घर आवरायला घेतलं. माळ्यावरच्या वस्तू खाली काढल्या. त्यात त्यांना काही खोकी आढळली. त्यात कागदाचे अनेक लहानमोठे तुकडे सापडले. त्यांनी एकेक उघडून बघायला सुरुवात केली आणि त्यांच्या लक्षात आलं की, हे सारे तुकडे म्हणजे त्यांच्या संकल्पित लिखाणाच्या छोट्या छोट्या नोंदी होत्या. अर्थात त्या त्यांनी फेकल्या नाहीत कारण, पुढे कधीतरी हे काम पूर्ण होईल, अशी त्यांना आशा होती. ही कथा आठवण्याचं कारण म्हणजे परवा अशाच मित्रांच्या गप्पा रंगल्या होत्या. तो म्हणाला,'यार मला फुटबॉल प्लेयर व्हायचं होतं. पण, काही नाही! घरच्यांच्या आग्रहाला बळी पडून खेळ बाजूला ठेवला आणि नुसता जीव तोडून अभ्यास केला. त्याचं फळही मिळालं. मोठ्या पगाराची नोकरी, गाडी, बंगला सगळं आहे. पण, मनातला फुटबॉल काही केल्या जात नाही. तो आजही मनाच्या कोपऱ्यात दडून बसलाय. माधुरी दीक्षितचा 'बकेट लिस्ट' बघितल्यापासून तर त्या कोपऱ्यातून रोज काही तरी नवीन बाहेर डोकावतंय. काय काय करायचं राहिलं. किती तरी अशक्य गोष्टीसुद्धा मनात येतात. वाटतं हे करावं, ते करावं पण नाही आता कसलं काय!

खरं होतं त्याचं म्हणणं किती तरी गोष्टी हातातून निघून गेल्या. मग मला एकदम आठवलं त्याला प्रवासाची खूप आवड होती. लहानपणी परिस्थितीमुळे किंवा इतरही कारणांमुळे त्याच्या वडिलांनी कधी कुठे फिरवलंच नाही. पण, स्वतः मिळवता झाल्यावर तर ते त्याच्या हातात होतं. मग नोकरीतल्या जबाबदाऱ्या, लग्न, संसार, मुलं त्यांची शिक्षणं सगळं लांबतच गेलं. खरं तर त्या रामरगाड्यातून वेळ काढला असता तर? पण, नाही जमलं काय कारणं असतील त्याची त्याला माहित!

तसं त्याला म्हणून काय उपयोग? माझं तरी काही वेगळं आहे का? मलाही काय काय करायचं होतं पण...नाहीच जमलं. आता वाटतं त्याच वेळी या गोष्टी जरा गांभीर्याने घ्यायला हव्या होत्या. काळ कुणासाठी थांबलाय? जे हातातून निसटून गेलंय ते आता परत नाही यायचं. ती अपुऱ्या इच्छांची बादली रिकामी होण्याऐवजी भरतच जाणार, ओसंडून वाहणार. मग एक दिवस त्या साऱ्या अपुऱ्या इच्छांना पूर्णविराम मिळेल. कसा? ते 'त्यालाच' ठाऊक! तरीही माझं मन परत परत शोध घेत राहतं. काही तरी आपल्या आवाक्यातील करण्यासारखं असेल तर? मी असा विचार करत असतानाच सायलीने अनाहूत सल्ला दिला. जे हातातून निसटलंय आणि जे करणं आता शक्य नाही ते सगळं आधी मनातून काढून टाक. म्हणजे मनातली गर्दी, गोंधळ जरा कमी होईल. मन हलकं होईल. त्यानंतर जे हाताशी आहे त्यात आनंद मानायला शिक. सभोवतालच्या परिस्थितीतील आनंद निवडून घ्यायला शिक, तो इतरांना वाटायला शिक. बघ तुझी ती इच्छा आकांक्षांची बादली लवकरच रिकामी होते की नाही. तसं झालं की, मन अगदी पिसासारखं हलकं होतं की नाही बघ! मी सायलीचं ऐकायचं ठरवलं. हे राहीलं, ते राहीलं असे विचार बाजूला ठेवून मला आत्ता काय करता येईल, तेव्हढंच मी मनावर घेतलं. खरोखर अल्पावधीतच माझी बादली चक्क रिकामी झाली की हो! बघा तुम्ही पण प्रयोग करून...

...अन् सूर गवसले!

भारती सावंत/९६५३४४५८३५

हुश्श करून सख्या, टाकला मी निःश्वास
तारुण्य अर्पण संसारी, मिळाला मोकळा श्वास

बालपणापासून तारुण्यापर्यंतचे फुलपंखी जीवन! एका फुलावरून उडायचं आणि दुसऱ्यावर बसायचं, मनसोक्त मधुपान करायचं. अल्लड, अवखळ अन् खट्याळ असं ते बालपण! १५-१६ वर्षांनंतर तारुण्याची चाहूल लागते. कुणीतरी आपल्याकडे पहावं, आपलं सौंदर्य डोळ्यांत साठवावं असं वाटण्याचं ते वय! दर्पणालाही जणू हेवा वाटावा अन् त्याने आपल्या लावण्याला अजूनच उजाळा द्यावा.

आनंदी आनंदच गडे, आपल्या चहूबाजूकडे
मनमयूर फुलवी पिसारा, शिकू शाळेचे पाठ्यधडे

शाळकरी दिवस संपून कॉलेजकडे पावले वळायला लागली की, चेहऱ्यावर अजूनच तेजस्विता येते आणि सगळे आपल्याकडेच पहात आहेत, असा भास होतो.

किती रूपवान दिसते मी,
सांगतो खट्याळ हाच ऐना
पाहती वळून साऱ्या नजरा,
उडते तनामनाची अशी दैना

कॉलेजचा अभ्यास, पिकनिक, पार्टीज, मित्रमैत्रिणींचा गोतावळा वाढत असतो. त्यातूनच एक दोन सख्यांशी आपले नाते अगदी घट्ट होते अगदी मनीचे, हृदयीचे हितगूज सांगावे इतके! घरातली करडी नजर आपल्या सर्व हालचाली टिपत असते. आपल्यालाही करियर करून कुणीतरी मोठे अधिकारी बनायचे असते. मनात विचारांचे द्वंद्व आणि घरची शिस्त यातच गुरफटून गेलेलो असतानाच, अचानक आपल्यासाठी स्थळं सुचविली जात असतात. आपला मनमयूर जरी नाचू लागला तरी, आपले शिक्षण पूर्ण होणे गरजेचे असते. पण, आईवडिल त्यांच्या जबाबदारीतून मुक्त होण्यासाठी उतावीळ असतात. पाठोपाठ असलेल्या बहिणींची लग्नेही त्यांना उरकायची असतात. लग्नाचा खर्च, देणीघेणी आणि हौसमौज यांचा ताळमेळ जमवायचा असतो. लग्नाला प्रमुख स्थान आणि शिक्षण-करीयरला आपसूकच दुय्यम स्थान मिळते. काळजापासून निघालेला 'असे का?' हा प्रश्न ओठांतच विरून जातो. आपणाला शिक्षण पूर्ण करून देऊ म्हणून आश्वस्त केले जाते. पण, फक्त पदवीपर्यंतच्या शिक्षणाला जगात काय किंमत!

आपल्या करीयरच्या आशाआकांक्षा पार धुळीस मिळतात अन् कपाळावर मुंडावळ्या चढतात. माहेरची लाडी जी कालपर्यंत बाहुलीसंगे खेळत होती, ती सासरचा उंबरठा ओलांडून 'सौ' असं बिरूद लावून सासरी जाणार होती. मनाला काल्पनिक पण वास्तव असा हा विवाहसोहळा थाटामाटात पार पडतो. वऱ्हाडी, पाहुणे मंडळी पोटावरून हात फिरवत तृप्तीचा ढेकर देत निघून जातात. आईवडिल, काकाकाकू, मामा-मामी कन्यादानाचे पुण्यकर्म करून, पापण्यात आसू लपवत परततात. अगदी एकटे वाटते. सासरची सर्व अनोळखी माणसे फक्त समोर असतात. एरव्ही स्वयंपाकात तरबेज असणारे आपण एकदम पडलेल्या जबाबदारीने थोडे भांबावून जातो. सासरी कुणीतरी पाठीवर हात फिरवून धीर देतं. आपणालाही थोडा धीर? येतो. आता उरलेलं सारं आयुष्य आपणाला इथंच, या माणसांना आपलंसं करून काढायचं आहे, याची जाणीव होते. हळुहळू आपणही स्थिरावू लागतो. कुणी कडक तर कुणी प्रेमळ वागून आपल्याशी संवाद साधतात. एक व्यक्ती मात्र आपणावर जीवापाड प्रेम करत असते. त्याच्या घट्ट विश्वासाच्या पावलावर पाऊल ठेवून आपण आपला संसार सजवत असतो. सख्यासोबतचे मयूरपंखी दिवस भुर्रकन उडून जातात आणि वेगळीच चाहूल लागते. गर्भकळा, मातृत्व आणि आपल्या पिलाला मोठे करण्यासाठी घेतलेला त्रास! अगदी आरशाने कितीही खुणावले तरी, त्याच्याकडे फिरकतही नाही. तोवर दुसऱ्याची चाहूल... दोघांचे संगोपन करताना कधी चाळीशी उलटली, हेच लक्षात येत नाही. मागे वळून पाहताना मनाशीच बोलतो आपण,'दहा वर्षे झाली लग्नाला! खुप काही करायचे राहूनच गेले की!' मुलांच्या जबाबदाऱ्या वाढत्या वयासोबत वाढतच जातात. एका क्षणी मुले आपला हात सोडून, मित्रांच्या गळ्यात टाकतात तेव्हा चक्क डोळ्यांवर चाळीशीचा चष्मा चढतो. केसांमधून चंदेरी बटा झळकू लागतात. वाटते, 'आता थोडे स्वतःकडे पाहू या!' मग सुरुवातीला ब्युटी पार्लरचा नंबर दाबला जातो. नवीन रुपडे घेऊन कधी चष्मा तर कधी गॉगल डोळ्यांवर चढतो. केसांचे निरनिराळे कट करू लागतो. इथेच आपणास जीवनाचे खरे सूर गवसतात. आता माघार नाही. अर्ध आयुष्य संसारासाठी झिजलो, आता थोडे स्वतःसाठीही जगू या. मग किटीपार्टी, शॉपिंगसाठी मैत्रिणींचे फोन वाजायला लागतात. महिन्यात बऱ्याच वेळा सिनेमा, हॉटेलिंग, शॉपिंग यात वेळ जाऊ लागतो. 'अहो' ऑफिसच्या कामात एवढे बुडालेले असतात की, त्यांना आपण विवाहित असल्याचीही जाणीव नसते आणि मुले त्यांच्या फ्रेंड सर्कलमध्ये! आपल्याला मात्र चक्क मोकळा वेळ मिळतो. त्यात काय करूअन् काय नको असे होऊन जाते. आपला पूर्ण वेळ नवरा, सासूसासरे, दीरनणंदा, पाव्हणेरावळे, मुलेबाळे यांच्यासाठीच देत होतो. आता मात्र आपल्याला स्वत्वाची जाणीव होते. आता मात्र या संधीचा पूर्ण फायदा घ्यायचा असतो कारण, आपल्या जीवनातला खरा सूर मिळालेला असतो ना!

साप्ताहिकी

अपर्णा विचोरे-आठल्ये/९८२२७०१०६२

शोधमालिका

रहस्यभेदन हे मनोरंजनाचे एक चांगले साधन असते. म्हणूनच रहस्यकथा, गुन्हे कथा यांचा खप चांगला असतो. दूरदर्शनवर याच जॉनरच्या मालिका आल्या आणि तेवढा कालखंड गाजवून गेल्या. वर्ष १९८५ मध्ये आलेली 'करमचंद' प्रेक्षकांना आजही आठवतेय, यातच मालिकेचं यश सामावलंय. पंकज पाराशर निर्मित या मालिकेतील करमचंद जासूस आणि त्याची भाबडी, धांदरट मदतनीस किटी! करमचंदच्या हाती असलेल्या गाजराला कोणी कसा विसरेल ? वेगळ्या धाटणीचं शिर्षकगीत, वेगळं जॉनर, हिरोच्या टिपिकल साच्यात न बसणारा नायकाचा चेहरा या बाबी प्रेक्षकांना 'करमचंद'कडे खेचत गेल्या. प्रत्येक एपिसोडच्या शेवटी किटीच्या तोंडचं 'यू आर रिअली जिनीयस सर !' हे वाक्य प्रेक्षकांनासुद्धा म्हणावसं वाटायचं. पंकज कपूर, सुस्मिता मुखर्जी आणि दीपक काजीर यांनी या मालिकेत धमाल उडवली होती.

त्यानंतर, १९९४ मध्ये आलेल्या 'तहकीकात'ने प्रेक्षकवर्ग दूरदर्शनशी बांधून ठेवला होता. स्वतः विजय आनंदने यात सॅम डिसिल्व्हाची भूमिका साकारली. सोबत सौरभ शुक्ला ही होता. विजय आनंद म्हणजे गाइड, ज्वेलथीफचा दिग्दर्शक! सोबत शेखर कपूर आणि करण राजदानसुद्धा दिग्दर्शन करत होते.

याशिवाय, वर्ष १९९४ मध्येच आलेली शेखर सुमनची 'रिपोर्टर' ही एक लक्षवेधी मालिका ठरली. बुद्धीमान नायकासोबत असलेला त्याचा काहीसा भोळसट मदतनीस हा या सर्व मालिकांचा युएसपी होता. मग ती करमचंद सोबतची किटी असो की तहकीकात मधला गोपीचंद! मुंबई दूरदर्शनवर सादर झालेली 'सत्य व ती' ही मालिका सोडता, याच प्रकारच्या मालिकांमध्ये स्त्री नायिका तेव्हा फारशा आल्याच नाहीत. त्यानंतरही 'राजा और रँचो','एक दो तिन चार' या सारख्या काही मालिका आल्यात पण ते तेवढंच! दखलपात्र असं त्यात काहीच नव्हतं. या सर्व पसाऱ्यात 'एक शून्य शून्य' मात्र चिरस्मरणीय ठरली.

ओल्या सांजवेळी...

संगीता वाईकर/९९२२५०४७९४

सांजवेळ तशीही कातरवेळ असते आणि त्यातही ती पावसाळी सांज असेल तर मनात काहीशी हुरहूर निर्माण करून जाते. सख्याची आठवण मनाच्या एका कोपऱ्यात राहून राहून येतेच. आयुष्याच्या या वळणावर हीच सोबत खऱ्या अर्थाने समृद्ध करून जाते. अशा या सायंकाळी मन काहीसे उदास होते पण, त्याच्या येण्याची चाहूल लागली की, हेच मन कसे बहरून जाते. आहेच अशी जादू त्याच्या केवळ असण्याची! हा भास की, हे सत्य हेच मनाला उमगत नाही हेदेखील आहेच. अशा या सांजवेळी विविध भारतीवर लागलेलं अनुराधा पौडवाल यांच्या स्वरात सजलेलं आणि प्रवीण दवणे यांचे शब्द, संगीतकार श्रीधर फडके आणि चित्रपट 'फिटे अंधाराचे जाळे' एका अप्रतिम गीताने मनाला वेढून टाकले अगदी क्षणात!

'ओलेत्या पानात, सोनिया उन्हात भरून मेघ आले,' जणू काही निसर्गाची ही रंगपंचमी! प्रत्येक डहाळी जणू नव्या उमेदीने डोलते आणि त्या डहाळीवर एक पाखरू मनाला साद घालते. नाही म्हणता म्हणता तिचेही मन असेच काहीसे अस्वस्थ झालेच. त्याची चाहूल लागली आणि कस्तुरीच्या गंधाने मन शहारून गेले. त्याच्या श्वासाने ती जणू हरवून गेली. काय आहे त्याच्या ओढीत? या स्वप्नांच्या हिंदोळ्यावर ती जणू लहरत राहिली बराच वेळ! हिरव्या रानात पसरलेला मातीचा गंध आणि रानातून वाऱ्याच्या झुळुकीने घेतलेली मधुर स्वर, जणू काही तो मुरलीधर बासरीची तान छेडीत आहे. पण, मन मात्र माझेच रंगून गेले आहे, हे मात्र निश्चित! ही ओली सांजवेळ दाही दिशांनी रंगगंधाची उधळण करीत असली तरी, मन मात्र त्याच्या आठवात कसे रमून गेले हेच उमगत नाही.

तो असताना शब्दांच्या पलीकडले घेऊन जातो आणि नसताना मनाच्या तळाशी ! शब्दांची जादू मनात नित्य रुंजी घालत राहते आणि ती मात्र क्षण क्षण बहरत जाते. हवेतला गारवा तन मनावर शहारा आणतो. खरं तर तो आणि ती दूर दूर जाताना वळणावळणाच्या हिरव्या गर्द रानात हरवून जातात. आकाशातील मेघ जणू धरतीवर उतरले आणि हीच त्या दोघांच्या भेटीचे साक्षीदार ! हरवलेल्या क्षणाचे सोबती! ऋतूंचा हा शिणगार खरोखरीच शब्दांच्या पलीकडचा आहे आणि तो प्रीतस्पर्श तर काळजात झंकार करून जाणारा! हा अभिसार अनोखा, हळवा शहारा निर्माण करून जातो, अगदी सहज! निसर्गाची ही किमया आहे. स्वप्न की वास्तव? खरंच काहीच कळत नाही. पण, वाटतं, प्रत्येकानं जगायला हवं,

आपापल्या परीनं, कारण...
तो वैशाखातही गारवा देतो
वळवाच्या सरीनं...

अशी ही ओली सांजवेळ जीवनाला सुखावून जाते, हे मात्र निश्चित!

गझल आरस्पानी

गझलनंदा / ८४२२०८९६६६

प्रेमऋतूचा अर्थ नव्याने आज समजला...

मंडळी, नुकताच विजयादशमीचा सण अत्यंत आनंदात पार पडलाय. घरोघरी सध्या भुलाबाईचं आगमन झालेलं आहे. आपल्या चालीरीती सुरू ठेवायच्या म्हणजे हे आलंच. अर्थातच, शास्त्र आणि संस्कारांची सांगड घालताना त्याला विज्ञानाची, साहित्याची जोड देऊन आपल्या जुन्या पिढीने आपल्यावर खूप उपकार केले आहेत. हे सांगण्याचं कारण म्हणजे भुलाबाई, हादगा, गजगौरी किंवा भोंडला या सणात मुली-स्त्रिया अनेक गाणी गातात. ही गाणी कुणी तयार केली? हे जरी आपल्याला ठावूक नसलं तरी ही गीतं लयबद्ध आहेत. आपल्याही नकळत ही गाणी आपण गुणगुणतो, नकळत पाय फेर धरू लागतात. महत्त्वाचं म्हणजे अगदी चिमुकल्या मुलींनाही ही गाणी सहज पाठ होतात, ती पाठ करावी लागत नाहीत. याचं मुख्य कारण म्हणजे, त्यांची विशिष्ट लय, ऱ्हिदम! यानंतर येते ती कोजागरी! आश्विन पौर्णिमा! चंद्राच्या शुभ्र ज्योत्स्नेत न्हाऊन निघणं! यामागचा उद्देश गीततील किंवा कवितेतील लय सांगण्याचा उद्देश होता.

गझल प्रामुख्याने अक्षरगणवृत्तात लिहिली जाते. त्यात ल आणि गा या अक्षरांची लगावली महत्त्वाची असते. याचा अभ्यास आपण आत्तापर्यंत केला आहेच. पूर्वी छंदोबद्ध किंवा वृत्तबद्ध कवितेच्या प्रांतात म स ज त य र भ ग अशा अक्षरांनी वृत्त समजावलं जायचं. म म्हणजे मानावा, गझलेत गागागा! स म्हणजे समरा ल ल गा, ज म्हणजे जनास = लगाल! त म्हणजे ताराप = गागाल, य म्हणजे यमाचा = लगागा, र म्हणजे राधिका = गालगा, भ म्हणजे भास्कर = गालल किंवा गागा ! शेवटी ग म्हणजे उरलेले गुरू अक्षर! मित्रांनो, वृत्ताची सर्व बांधणी ही लघु आणि गुरू यावरच अवलंबून असते. त्याचप्रमाणे गझलेचेही वृत्त असते.

गझलेचे प्रकार बघत असताना, अक्षरगणवृत्त आणि मात्रावृत्त हा भाग आपण बघितला. आज मात्रावृत म्हणजे काय? त्यासाठी हा विशेष भाग इथे देत आहे. मनोरमा, मंजुघोषा, व्योमगंगा, वियदगंगा, भुजंगप्रयात, आनंदकंद ही काही अक्षरगण वृताची नावं आहेत. लवंगलता, अनलज्वाला, वनहरिणी वगैरे मात्रावृत्तांची नावे आहेत. मात्रावृत्तात गण अक्षर न मोजता अक्षराच्या मात्रा मोजल्या जातात. ती कशी मोजायची? तर ल म्हणजे लघु एक मात्रा आणि ग म्हणजे गुरू २ मात्रा हे आपण शिकलोय. तोच प्रकार इथे आहे. तर मात्रावृत्तात गणांऐवजी मात्रा मोजल्या जातात. शिवाय, उच्चारानुसार मात्रा मोजणे अतिशय आवश्यक आहे.

मात्रावृत्तात लिहिताना पद्मावर्तनी आणि भृंगावर्तनी असे दोन प्रकारे लिहिले जाते. पद्मावर्तनी म्हणजे आठ पाकळ्यांचे कमळ जसे असते, तशा ८ ८ मात्रा घेऊन वृत्त बांधले जाते. यात २४ मात्रा, ३२ मात्रा वगैरे सामान्यतः घेतल्या जातात. तर, भृंग हा षट्पाद कीटक आहे. म्हणून जिथे ६ ६ मात्रा असतात ते भृंगावर्तनी मात्रावृत्त समजावे.

सर्वसाधारणपणे मात्रा मोजल्या आणि त्या २२/२४ भरल्या की मात्रावृत्त जमले, असा समज आहे. मात्र, एक महत्त्वाची गोष्ट इथे लक्षात ठेवावीच लागते की, नुसत्या मात्रा मोजून मात्रावृत्तात गझल लिहिता येत नाही. ती लिहिताना गझलेची अंतर्गत लय अतिशय चपखलपणे सांभाळावी लागते.

उदाहरणार्थ, मात्रावृत्त /यती ८ ८ ८

कथा कधी ऐकल्या कहाण्या आपत्तीच्या

या ओळीत २४ मात्रा आहेत मात्र, ही ओळ वाचताना आपण अडखळतो. हे अडखळणे म्हणजेच लय जाणे किंवा यती न सांभाळणे होय. येथे वृत्त सांगताना शीर्षस्थानी ८ ८ अशी यतीस्थाने सांगिताली आहेत. ती सांभाळलेली नसल्यामुळे इथे यतीभंगही झाला आहे. कसा ते बघा,

कथा कधी ऐ,/कल्या कहाण्या/आपत्तीच्या

कथा कधी ऐ ही आठ अक्षरे/कल्या कहाण्या ही आठ अक्षरे! इथे अर्थ लागत नाही. चाल लावताना किंवा गाताना इथे रसभंग होतो. म्हणजेच ही रचना लय आणि यती दोन्हीसाठी सदोष आहे. आता हीच ओळ आपण अशी लिहिली तर...

कधी ऐकल्या, कथा कहाण्या, आपत्तीच्या
व्यथा वेदना, अहेर सारे, घरून झाले

गझल लिहिताना स्वल्पविराम देत नाहीत. पण, लय आणि यतीस्थान हे समजण्यासाठी मी मुद्दाम येथे स्वल्पविराम दिलेले आहेत. चारही ओळींचे ८ ८ मात्रांचे ३/३ खंड पडलेले आहेत आणि प्रत्येक खंडात आठ आठ मात्रा आहेत. म्हणजेच इथे पद्मावर्तनी मात्रा वृत्त आहे आणि योग्य तऱ्हेने यती स्थान सांभाळले गेले आहे. यामुळे, पद गाताना त्रास होत नाही. आज लयीवर एवढे भाष्य केले. पुढे मात्रावृत्तातील यतीस्थान म्हणजे काय यावर बोलू या.

यती आणि लय न सांभाळता, गझल विशेषतः मात्रावृत्तातली गझल लिहिली की, पांढऱ्याशुभ्र वाफाळलेल्या भातात, दाताखाली कच्चकन एखादा खडा यावा, ही स्थिती होते. गझल सदोष होते ते वेगळेच! त्याहीपेक्षा ती गझलच होत नाही, एवढे लक्षात ठेवावे.

आधी अक्षरगणवृत्तात निर्दोष गझल लिहिता यायला हवी. नंतरच कवी/गझलकाराने मात्रावृत्ताकडे वळावे कारण, मात्रावृत्तात लिहिणे वाटते तेवढे सोपे नाही. सरावाअंती ते जमते हे नक्की! मात्र, मात्रावृत्तात कधीही सूट घेण्याचा प्रयत्न करू नये. आता नेहमीप्रमाणे माझीही एक मात्रावृत्तातली गझल...

सूर्य थबकला...

जुईस बघुनी हिरवा चाफा मनात हसला
स्पर्श रेशमी होता रात्री हळू उमलला
चाफ्याने मग ओठ घेतले अलगद ओठी
वृक्षलतेची ओढ पाहण्या चंद्र उगवला
शांतपणाने तेवत होता दिवा खरोखर
जवळी येता अवचित वादळ दिवा भडकला
सहा ऋतुंचे सहा सोहळे जगतासाठी
प्रेम ऋतूचा अर्थ नव्याने आज समजला
श्रावणातल्या सायंकाळी क्षितीज सजले
धराढगाचे मीलन बघण्या सूर्य थबकला

डॉ. संजय रोडगे यांचा सत्कार

सेलू:नाशिक येथे मराठवाडा सामाजिक फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दरवर्षी करण्यात येणाऱ्या मराठवाडा भूषण पुरस्काराचे मानकरी श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष शिक्षण महर्षी डॉ. संजय रोडगे यांचा सत्कार एल . के. आर. आर. प्रिन्स इंग्लिश सीबीएसई स्कूलचे प्राचार्य प्रा. कार्तिक रत्नाला यांनी केला. तसेच प्रॉस्परस पब्लीक स्कूल येथे प्राचार्या सौ. प्रगती क्षीरसागर, शिक्षकवृंद व विद्यार्थी वर्ग यांनी अभिनंदन केले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शिक्षण महर्षी डॉ. संजय रोडगे आपल्या मनोगतामध्ये सांगत होते की, तालुका सारख्या छोट्याशा गावामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरची शाळा निर्माण केली. मुलांचे भवितव्य चांगले घडवण्यासाठी शाळेत रोबोटिक लॅब इंग्लिश लॅब राजीव गांधी विज्ञान प्रयोगशाळा उपलब्ध करून दिले. तसेच मुलांनी या सर्व सोयींचा वापर करून भविष्यात मोठी पदवी मिळवावी अशी अपेक्षा मुलाबद्दल व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.कल्पना भाबट व सारिका ताठे यांनी केले.

विद्यार्थ्यांच्या फुटबॉलवरील उत्साहाचे कौतुक

उस्मानाबाद - जेमी नाईट यांच्या नावे अनेक गिनीज बुक विक्रम आहेत, त्यांनी उस्मानाबाद प्रथमच भेट दिली. जेमी जगातील सर्वात अनुभवी आणि सर्वाधिक मागणी असलेल्या व्यावसायिक फुटबॉल फ्रीस्टाइलर्सपैकी एक आहे. पोदार एज्युकेशन नेटवर्कच्या पुढाकाराचा एक भाग म्हणून त्यांच्या भारत भेटीमध्ये खेळावर जास्त लक्ष केंद्रित करणे आणि विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रख्यात खेळाडू आणि प्रशिक्षकांकडून उत्कृष्ट कार्यशाळा आणि प्रशिक्षण सत्रे मिळविण्यात सक्षम बनवणे होते.जेमी फुटबॉलवरील त्याच्या जबरदस्त नियंत्रणासाठी ओळखला जातो आणि त्याने जगभरात प्रवास केला आहे,

मेट्रो कॅश अँड कॅरी भारतात दोन दशके साजरी

पुणे,: मेट्रो कॅश अँड कॅरी, भारतातील आघाडीच्या संघटित घाऊक विक्रेते आणि खाद्य विशेषज्ञ, भारतातील यशस्वी ऑपरेशन्सच्या २१ व्या वर्षाचे स्मरण करताना, २१ व्या सणाच्या भेटवस्तू ऑफरची 'मेट्रो - फेस्टिव्ह गिफ्टिंग' लहान आणि स्वतंत्र व्यवसायांसाठी मेट्रो भारतातील घाऊक दुकाने सुरुवात केली आहे- मेट्रो इंडियाचे ३ दशलक्षाहून अधिक लहान आणि स्वतंत्र व्यावसायिक ग्राहक १ ऑक्टोबरपासून अधिकृतपणे सुरू झालेल्या आणि ३ नोव्हेंबर २०२४ पर्यंत चालणाऱ्या ३५ दिवसांच्या उत्सवात विशेष सणाच्या भेटवस्तू ऑफरचा लाभ घेऊ शकतात. मेट्रो घाऊक दुकानांव्यतिरिक्त, विशेष भेटवस्तू ऑफर आणि डील मेट्रोच्या वेबसाइट वर ऍक्सेस केले जाऊ शकतात आणि मेट्रो घाऊक पवर देखील उपलब्ध केले गेले आहेत (-पवीळव वापरकर्त्यांसाठी) आहे.हा अनोखा उपक्रम स्पर्धात्मक घाऊक किमतींवर उत्पादनांची विस्तृत श्रेणी ऑफर करतो, ज्यामुळे व्यवसायांना आकर्षक डील आणि बचत त्यांच्या ग्राहकांना करता येते. मेट्रोसह, लहान व्यवसाय त्यांच्या सर्व भेटवस्तू गरजा शोधू शकतात, लोकप्रिय ब्रँडपासून ते अद्वितीय शोधांपर्यंत, सर्व एकाच छताखाली उपलब्ध असणार आहेत.

जेमी नाईट ची कार्यशाळा संपन्न

लातूर / औसा - पोदार इंटरनॅशनल स्कूललातूरआणि औसा तर्फे जगातील टॉप टेन फुटबॉल फ्रीस्टाईलर पैकी एक जेमी नाईट यांना शाळेत निमंत्रितकरण्यात आले होते. जेमी नाईट यांच्या नावे अनेक गिनीज बुक विक्रम आहेत, त्यांनी लातूरप्रथमच भेट दिली. जेमी जगातील सर्वात अनुभवी आणि सर्वाधिक मागणी असलेल्या व्यावसायिकफुटबॉल फ्रीस्टाइलर्सपैकी एक आहे. पोदार एज्युकेशन नेटवर्कच्या पुढाकाराचा एक भाग म्हणूनत्यांच्या भारत भेटीमध्ये खेळावर जास्त लक्ष केंद्रित करणे आणि विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रख्यातखेळाडू आणि प्रशिक्षकांकडून उत्कृष्ट कार्यशाळा आणि प्रशिक्षण सत्रे मिळविण्यात सक्षमबनवणे होते. जेमी फुटबॉलवरील त्याच्याजबरदस्त नियंत्रणासाठी ओळखला जातो आणि त्याने जगभरात प्रवास केला आहे, प्रसिद्ध जागतिक ब्रँड्सशी सहयोग केला आहे. २०१७ आणि २०१८ मध्ये बॅक-टू-बॅक यूईएफए चॅम्पियन्स लीगफायनलमध्ये खेळपट्टीवर कामगिरी केली आहे. त्याच्या सातत्य आणि सूक्ष्म अंमलबजावणीमुळेत्याला जगप्रसिद्ध फुटबॉलपटूंकडून तसेच चाहत्यांकडून खूप प्रेम मिळाले आहे. जेमीच्या अनन्य साधारण कृतींमुळे विद्यार्थी मंत्रमुग्ध झालेहोते. जेमीचा ठाम विश्वास आहेकी फ्रीस्टाइल फुटबॉल शारीरिक आणि मानसिक आरोग्य विकसित करण्यात मदत करते आणि वाढीच्यामानसिकतेचे महत्त्व शिकवते.

१९ वर्षीय रुग्णावर स्पाईन करेक्शन सर्जरी यशस्वी

छत्रपती संभाजीनगर - नुकतीच पुण्यातील बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटल येथील डॉक्टरांच्या टिमने यशस्वीपणे येमेन मधील १९ वर्षीय महिला रुग्णावर अतिशय जटील अशा कॉम्प्रिटल किफोस्कोलिओसिस या आजारावर यशस्वी शस्त्रक्रिया केली. या रुग्णाला १२ सप्टेंबर २०२४ रोजी मज्जारज्जू मध्ये समस्या निर्माण झाल्याने रुग्णाला भरती करण्यात आले होते. या आजारामुळे त्या मुलीला रोजचे कामही करणे कठीण झाले होते तसेच चालता न येणे, बसता न येणे किंवा अगदी मलमूत्र विसर्जनही न करता येणे यासारख्या अगदी मूलभूत गोष्टींसह पाठदूखी सारखी अनेक लक्षणे तिच्यात दिसून येत होती.

जागतिक स्तरावर प्रतिनिधित्व करण्याची संधी

बीड - जेमी जगातील सर्वात अनुभवी आणि सर्वाधिक मागणी असलेल्या व्यावसायिक फुटबॉल फ्रीस्टाइलर्सपैकी एक आहे. पोदार एज्युकेशन नेटवर्कच्या पुढाकाराचा एक भाग म्हणून त्यांच्या भारत भेटीमध्ये खेळावर जास्त लक्ष केंद्रित करणे आणि विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रख्यात खेळाडू आणि प्रशिक्षकांकडून उत्कृष्ट कार्यशाळा आणि प्रशिक्षण सत्रे मिळविण्यात सक्षम बनवणे होते.जेमी फुटबॉलवरील त्याच्या जबरदस्त नियंत्रणासाठी ओळखला जातो आणि त्याने जगभरात प्रवास केला आहे, प्रसिद्ध जागतिक ब्रँड्सशी सहयोग केला आहे. २०१७ आणि २०१८ मध्ये बॅक-टू-बॅक यूईएफएचॅम्पियन्स लीग फायनलमध्ये खेळपट्टीवर कामगिरी केली आहे. त्याच्या सातत्य आणि सूक्ष्म अंमलबजावणीमुळे त्याला जगप्रसिद्ध फुटबॉलपटूंकडून तसेच चाहत्यांकडून खूप प्रेम मिळाले आहे. जेमीच्या अनन्य साधारण कृतींमुळे विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले होते.

प्रिया ठाकूरच्या आकर्षक घागरा चोलींनी टिपले वसुधाच्या राजस्थानी सौंदर्याचे सार

झी टीव्हीवर नुकतीच सुरू झालेली मालिका 'वसुधा'मधील प्रमुख अभिनेत्री प्रिया ठाकूरने आपला उत्तम अभिनय आणि सुंदर पारंपारिक लूक यांच्या जोरावर प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. आपल्या व्यक्तिरेखेला पूर्णपणे स्वीकारत प्रिया पडद्यावर आपले आकर्षक चैतन्य आणि रंगीबेरंगी घागरा चोली यांमध्ये उठून दिसते. हा लूक गावातील मुलगी असलेल्या वसुधाच्या ओळखीचा महत्त्वाचा भाग बनला आहे. हे पोशाख केवळ तिच्या व्यक्तिरेखेलाच उठाव आणत नाहीत तर ह्या मालिकेचा सांस्कृतिकपणामध्येही भर घालतात.

कलाकारांनी सांगितले धनत्रयोदशीला शॉपिंग करण्याच्या योजनेबाबत!

धनत्रयोदशीच्या शुभप्रसंगी लोक उज्ज्वल भविष्य आणि समृद्धतेसाठी नवीन वस्तूंची खरेदी करतात. या दिवसाचे महत्त्व सांगत एण्ड टीव्हीवरील कलाकार नेहा जोशी (कृष्णा देवी वाजपेयी, 'अटल'), हिमानी शिवपुरी (कटोरी अम्मा, 'हप्पू की उलटन पलटन') आणि विदिशा श्रीवास्तव (अनिता भाबी, 'भाबीजी घर पर है') यांनी त्यांच्या सेलिब्रेशन योजनांबाबत सांगितले. मालिका 'अटल'मध्ये कृष्णा देवी वाजपेयीची भूमिका साकारणाऱ्या नेहा जोशी म्हणाल्या, ''धनत्रयोदशी सण आपल्या घरामध्ये उत्साह व समृद्धता घेऊन येतो. दरवर्षी आपण या सणाची वाट पाहत असतो, जो दिवाळी सण सुरू होण्याचे प्रतीक आहे.

तथागत बुद्धांचा व भिक्कु संघाचा आशीर्वाद आ.मेघना बोर्डीकरांच्या पाठीशी -प्रा.जोगेंद्र कवाडे

गौतम बुद्धाच्या मूर्तीचा लोकार्पण सोहळा थाटात संपन्न, लोकार्पण सोहळ्यास भीम अनुयायांची अलोट गर्दी

जिंतूर-- आज सेलू तालुक्यातील आम्रवन महाविहार देवगाव फाटा येथे वर्षावास समाप्तीचे औचित्य साधून आमदार मेघना दीदी साकोरे बोर्डीकर यांच्या स्वयं कल्पनेतून साकार झालेल्या तथागत गौतम बुद्ध यांच्या मूर्तीचा भव्य लोकार्पण सोहळा व धम्मदेशना कार्यक्रम मोठ्या थाटात संपन्न झाला या कार्यक्रमास जिंतूर सेलू तालुक्यातील भीम अनुयायाची अलोट गर्दी उपस्थित होती.

या कार्यक्रमास लॉंग मोर्चाचे प्रणेते प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी उपस्थित अनुयायांना मोलाचे मार्गदर्शन करत तथागतांची शिकवण अंगीकारावी असे आवाहन करत उपस्थितीतांना मार्गदर्शन केले. त्यांनी असे पुढे सांगितले की तथागत गौतम बुद्ध व उपस्थित भिक्कु संघाचा आशीर्वाद कायम आमदार मेघना दीदी साकोरे बोर्डीकर यांच्या पाठीशी प्रत्येक कार्यात भरभरून राहील कारण त्यांच्या संकल्पनेतून

हे घडलेले पावन कृत्य समाज कधीही विसरणार नाही.

चौकट

आमदार मेघना बोर्डीकर यांनी आपल्या भाषणात उपस्थितांना मुलगा मोलाचे मार्गदर्शन करत असे सांगितले की जीवनात सुख-समृद्धी येण्यासाठी तथागताची दया करुणा व शांती प्रत्येकांनी अंगीकारली पाहिजे

राजकारण करतांना खुद्द वडिलांनी ग्रामीण भागात भावी पिढीस डॉ.बाबासाहेबांची प्रेरणा,ऊर्जा सर्वांना भेटावी म्हणून त्यांचे पुतळे देण्याचे काम मोठ्या प्रमानवर केले.तसेच वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून मी स्वतः छत्रपती शिवाजी महाराजांची शिकवणेची सदैव आठवण ठेवत सर्व जातीधर्मांना सोबत घेऊन सर्वांगीन विकास साधण्याचा प्रमानिक प्रयत्न केला.पूर्ण मतदारसंघात रेकॉर्डब्रेक विकास केला.तथागत गौतम बुद्धांची शिकवण दया,करुणा, शांती ही बहुमूल्य शिकवण प्रत्येकांनी आपले जीवन सुखी होण्यासाठी अंगिकरावी असे आव्हान आ.मेघना बोर्डीकांनी या वेळी केले. हा तथागत गौतम बुद्धांच्या मूर्तीचा लोकार्पण सोहळा कार्यक्रम म्हणजे प्रत्येकांच्या मनाला शांती देणारा व योग्य दिशा दाखवणारा कार्यक्रम आहे आणि हे माझ्या हातून घडले यात मी माझी धन्यता मानते.असे मनोगत त्यांनी व्यक्त केले.

माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांनीही आपल्या पंचवीस वर्षाच्या राजकीय कारकीर्दीत आपल्या समाजाचा नेहमीच मोठा हातभार लागलेला आहे.यांची आठवण त्यांनी या कार्यक्रमाच्या वेळी व्यक्त केली. बापा पुढे लेकीचे कौतुक ऐकले जावे यापेक्षा मोठे भाग्य नाही असे मत माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांनी यावेळी सांगताना आपल्या भावनिक भावना व्यक्त केल्या.

जिंतूरमधून सौ.मेघना साकोरे बोर्डीकर यांना उमेदवारी जाहीर

जिंतूर-विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या केंद्रीय कार्यालयाने रविवारी दुपारी महाराष्ट्रातील ९९ मतदारसंघातील उमेदवारांची यादी जाहीर केली.त्यातून जिंतूर विधानसभा मतदारसंघातून विद्यमान आमदार सौ मेघना साकोरे बोर्डीकर यांना उमेदवारी बहाल करण्यात आली आहे. भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय महासचिव तथा मुख्यालय प्रभारी अरुण सिंह यांनी या ९९ उमेदवारांची यादी जाहीर केली.

या यादीत नागपूर दक्षिण पश्चिम विधानसभा मतदारसंघातून देवेंद्र फडणवीस यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली असून त्या पाठोपाठ विदर्भ, खानदेश, मराठवाडाच्या

काही जिल्ह्यातील अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली.

नांदेड जिल्ह्यातील भोकर मतदारसंघातून श्रीजया अशोक चव्हाण, नायगाव मधून राजेश संभाजी पवार, मुखेडमधून तुषार राठोड यांना तर हिंगोलीतून विद्यमान आमदार तानाजी मुटकुळे, परतुरमधून माजी मंत्री बबनराव लोणीकर,बदनापूर मधून नारायण कूचे, भोकरदन मधून संतोष रावसाहेब दानवे,फुलंब्री मधून श्रीमती अनुराधाताई अतुल चव्हाण, संभाजीनगर मधून अतुल सावे,गंगापूर मधून प्रशांत बंब यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. मेघना दीदी यांना उमेदवारी जाहीर होताच जिंतूर सेलू विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी आतिषबाजी करत जल्लोष केला.

जिंतूरमधून सौ.मेघना साकोरे बोर्डीकर यांना उमेदवारी जाहीर

जिंतूर- विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या केंद्रीय कार्यालयाने रविवारी दुपारी महाराष्ट्रातील ९९ मतदारसंघातील उमेदवारांची यादी जाहीर केली.त्यातून जिंतूर विधानसभा मतदारसंघातून विद्यमान आमदार सौ मेघना साकोरे बोर्डीकर यांना उमेदवारी बहाल करण्यात आली आहे.

भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय महासचिव तथा मुख्यालय प्रभारी अरुण सिंह यांनी या ९९ उमेदवारांची यादी जाहीर केली.

या यादीत नागपूर दक्षिण पश्चिम विधानसभा मतदारसंघातून देवेंद्र फडणवीस यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली असून त्या पाठोपाठ विदर्भ, खानदेश, मराठवाडाच्या काही जिल्ह्यातील अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली.

नांदेड जिल्ह्यातील भोकर मतदारसंघातून श्रीजया अशोक चव्हाण, नायगाव मधून राजेश संभाजी पवार, मुखेडमधून तुषार राठोड यांना तर हिंगोलीतून विद्यमान आमदार तानाजी मुटकुळे, परतुरमधून माजी मंत्री बबनराव लोणीकर,बदनापूर मधून नारायण कूचे, भोकरदन मधून संतोष रावसाहेब दानवे,फुलंब्री मधून श्रीमती अनुराधाताई अतुल चव्हाण, संभाजीनगर मधून अतुल सावे,गंगापूर मधून प्रशांत बंब यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. मेघना दीदी यांना उमेदवारी जाहीर होताच जिंतूर सेलू विधानसभा मतदारसंघातील कार्यकर्त्यांनी आतिषबाजी करत जल्लोष केला.

विरोधकांनी प्रत्यक्ष निवडणूक रिंगणात येऊन निवडणूक लढावी मतदारांचा हक्क हिरावून घेऊ नये : मा आ विजय भांबळे

जिंतूर:- मा.आ.विजयराव भांबळे साहेब यांनी दि.१९ ऑक्टोबर २०२४ वार शनिवार रोजी सकाळी ११.३० वा त्यांच्या राहत्या घरी पत्रकार परिषद आयोजित केली होती यावेळी भाजपचे जिंतूरचे तालुका अध्यक्ष ऍड.विनोद राठोड यांनी भाजप जिंतूर तालुका अध्यक्ष पदाचा स्वखुशीने राजीनामा देऊन मा. आ. विजयराव भांबळे साहेब यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) गट जिंतूर पक्षात जाहीर प्रवेश केला. भाजप पक्षाची ध्येयधोरणे व नेतृत्वाला कंटाळून समाजहितासाठी आपण माजी आमदार विजयराव भांबळे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस(शरदचंद्र पवार) पक्षात प्रवेश केल्याचे स्पष्ट मत ऍड. विनोद राठोड यांनी व्यक्त केले. तर ऍड. विनोद राठोड यांचे यावेळी पक्षाचा रुमाल व हार घालून पक्षात मा आ विजयराव

भांबळे यांनी स्वागत केले. यापक्ष प्रवेशामुळे भाजपला जिंतूर तालुक्यात मोठे खिंडार पडले असून विद्यमान आमदार यांना मोठा धक्का बसनार आहे.

तसेच यावेळी पत्रकार परिषदेमध्ये भाजपचा आयटी सेल बाहेर राज्यातील अनेक मतदारांची नावे विविध बुथवर खोटे कागदपत्र जसे आधार कार्डावर पत्त्यामध्ये खाडाखोड करून नावे मतदार यादीत समाविष्ट करण्याकरिता नावे टाकत आहेत व जिंतूर सेलू मतदारसंघातील महाविकास आघाडीचे मतदार यांचा परस्पर सहा नंबरचा फार्म भरून अनेक लोकांची नावे मतदारसंघाच्या बाहेर टाकण्याचा प्रयत्न करीत आहेत त्यामुळे मा.आ.विजयराव भांबळे यांनी जिल्हाधिकारी यांच्याशी मा. खा.संजय जाधव साहेब यांच्या समवेत भेट घेऊन असा अनुचित प्रकार घडू नये म्हणून निवेदन देखील दिले आहे व यापुढे देखील असा प्रकार चालूच राहिला तर जिल्हाधिकारी परभणी यांच्या दालनात लाखो मतदार घेऊन ठिय्या आंदोलन करणार असल्याचा इशारा यावेळी देण्यात आला. विरोधकांनी असा मतदारांच्या हक्क हिरावून घेण्याचा प्रयत्न करून रंडीचा डाव खेळू नये तर याउलट प्रत्यक्ष निवडणुकीत निवडणूक लढवावी असे आवाहन देखील केले.

ऍड. विनोद राठोड यांनी आपल्या पक्षात प्रवेश करून आपण भाजपला मोठा धक्का दिला आहे असा प्रश्न विचारला असता यापुढे देखील लवकरच मोठमोठे धक्के देणार असल्याचे मा आ विजयराव भांबळे यांनी स्पष्ट केले व व मतदार यांनी एड विनोद राठोड यांनी सत्तेत असणारा भाजप पक्ष का सोडला यावर जनतेने शहानिशा करावी असे नागरिकांना आवाहन केले.

यावेळी अशोकराव चोधरी, अजयराव चोधरी, विश्वनाथ राठोड, रामराव उबाळे, बाळासाहेब भांबळे, गणेशराव ईलग, शौकत लाला, गजानन कांगणे, दलमिर पठाण, संजय निकाळजे,कैलास महाराज, विजय खिस्ते, प्रवीण चव्हाण, प्रकाश काका भांबळे, शंकर गंजे, खालेक भाई, अक्कु लाला, हकीम लाला, गंगाधर तरटे, कैलासराव सांगळे, शरदराव अंभोरे,संजयराव अंभोरे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

स्वरस्वामी कला साधना ग्रुप ची गायन क्षेत्रात उत्तुंग भरारी

स्वरस्वामी कला साधना हा ग्रुप अल्पावधीतच गायन क्षेत्रात नावारूपास आला. विविध प्रकारची मराठी, हिंदी चित्रपट गीतांची थीम घेऊन कराओके आणि लाईव्ह ऑर्केस्ट्रा च्या माध्यमातून हा ग्रुप श्रोत्यांच्या पसंतीस उतरला. याचे संपूर्ण श्रेय जाते ऑर्गनायझर सौरभ हातगे आणि प्रियांकाजी हातगे तसेच शुभचिंतक गणेश हातगे आणि राजेश हुनारी यांना. बृहन्मुंबई महानगरपालिकेत कार्यरत असताना, आपापली कामे सांभाळून त्यातून थोडा वेळ काढून ते बीएमसी सिंगर्स सोगो ग्रुप मध्ये सामील झाले आणि गायन क्षेत्रातला दांडगा अनुभव त्यांनी कमावला. या क्षेत्रात माणसांशी

माणसे जोडत ते पुढे पुढे जात होते. याच पठडीतल्या जिवलग माणसांना घेऊन त्यांनी स्वतःच्या स्वरस्वामी कला साधना ह्या ग्रुप ची स्थापना केली. नवोदित, प्रतिष्ठित, हरहुन्नरी, गायक कलाकार त्यांनी जमविले त्यांच्याकडून उत्तमातील उत्तम असे कलाविष्कार सादर करून घेतले.

दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी स्वरस्वामी कला साधना बॅनरखाली शम्मी कपूर देवानंद आणि राजेश खन्ना या त्रिमूर्तींच्या गाण्याचा लाईव्ह ऑर्केस्ट्रा कार्यक्रम, माटुंग्याच्या मैसूर ऑडिटोरियम येथे पार पडला श्रोत्यांनी खचाखच भरलेल्या सभागृहात श्री मिलिंद वाणी यांच्या वाद्य वृंदाच्या मदतीने ३० ते ४० गायक कलाकारांनी आपली कला सादर केली. उत्तम निवेदन, उत्कृष्ट साऊंड आणि खिळुन बसलेले श्रोते यांनी कार्यक्रमाला चार चाँद लावले.अगदी स्वर्गीय माहोल तयार झाला होता. या कार्यक्रमाने स्वरस्वामी ग्रुप ने एक गायन क्षेत्रात मोठा आविष्कार घडवून आणला आहे.

कार्यक्रमासाठी संपर्क.. प्रियांका हातगे मोबाईल ७०२१५९६९६५

जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांकडून नेवासा स्ट्राँगरूमची पाहणी

नेवासा, दि.२१ - जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सिद्धाराम सालीमठ व जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी रविवारी नेवासा येथील स्ट्राँगरूमला भेट देऊन तेथील व्यवस्थेचा आढावा घेतला.

ईव्हीएम यंत्राचे वाटप व मतमोजणीच्या दिवशी स्ट्राँगरूममधील जागेचे नियोजन याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली. ईव्हीएम सुरक्षेच्यादृष्टीने स्ट्राँगरूमचे ठिकाण व परिसराची पोलीस अधीक्षकांनी पाहणी केली. नेवासा तहसील कार्यालयात उभारण्यात आलेल्या निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयातील विविध कक्षांनाही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी भेट देऊन आढावा घेतला.

जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांनी सुरक्षेच्या आढावा घेऊन कामकाजाची पाहणी केली तसेच निवडणूक आचारसंहितेच्या अंमलबजावणीच्यादृष्टीने सूचना दिल्या. सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

याप्रसंगी नेवासा विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी अरूण उंडे, तहसीलदार डॉ. संजय बिरादार, नेवासा पोलीस निरीक्षक धनंजय जाधव, अपर तहसीलदार पाटील, नगरपंचायत मुख्याधिकारी सोनाली म्हात्रे आदी उपस्थित होते.

संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृद्धी योजनेच्या अशासकीय सदस्य पदी संतोष राठोड यांची निवड

जिंतूर : नुकतेच महाराष्ट्र शासनाच्या संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृद्धी योजनेअंतर्गत जिंतूर तालुका समितीवर अशासकीय सदस्य म्हणून संतोष बाबाराव राठोड यांची निवड करण्यात आली आहे. जिंतूर- सेलू विधानसभेच्या कार्यसम्राट आमदार सौ.मेघनादीदी साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनात सतत बंजारा समाजासाठी धडपडणाऱ्या, ऊसतोड कामगाराच्या समस्या अहोरात्र सोडवणाऱ्या, निस्वार्थी समाजसेवक, बंजारा समाजाला भजनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करणारे त्याचबरोबर विविध क्षेत्रातील त्यांच्या कामाची दखल घेऊन सदर नियुक्ती करण्यात आली आहे. बंजारा व लमाण समाजाच्या विकासासाठी तांड्यांना स्वयंपूर्ण बनवून मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टिकोनातून शासनाची तरतूद करण्यात आली आहे. प्रत्येक कांड्याला विकास निधीचा योग्य विनियोग व्हायला हवा या उदांत हेतूने तालुकास्तरावर तहसील कार्यालयामार्फत एक सदस्याची निवड करण्यात आली आहे. संत सेवालाल महाराज बंजारा/लमाण तांडा समृद्धी योजनेचे अंमलबजावणी करण्यासाठी तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली संतोष बाबाराव राठोड यांची अशासकीय सदस्य म्हणून पुढील तीन वर्षाकरिता निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे समाज बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण असून प्रत्येक स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

येलदरीत जल पूजन संपन्न

जिंतूर / प्रतिनिधी : जिंतूर तालुक्यातील येलदरी धरण १०० टक्के भरल्यामुळे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांकडून जलदेवतेचे पूजन करण्यात आले. अर्ध्या मराठवाड्याची तहान भागवणारे येलदरी धरण यावर्षी पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे परभणी हिंगोली व नांदेड जिल्ह्यातील लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांना या पाण्याचा मोठ्या प्रमाणात फायदा होतो. त्यामुळे येलदरी धरण भरल्यानंतर या भागातील शेतकरी, व्यापारी यांना प्रचंड आनंद होतो. गतवर्षी येलदरी धरण ६१ टक्के भरले होते. त्यामुळे काही प्रमाणात शेतकऱ्यांना पाणी वापरावर थोडेफार बंधन आले होते. मात्र यावर्षी येलदरी धरण शेवटी का होईना १०० टक्के भरल्यामुळे शेतकरी आणि व्यापारी यांना मोठा आनंद झाला आहे. यामुळे येलदरी धरणाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी व व्यापाऱ्यांनी येलदरी जलाशयाची येलदरी येथील ब्रिजगोपाल तोष्णीवाल यांच्या संकल्पनेतून व जवळा बाजार येथील भागवत कमिटीच्या वतीने जलपूजन करण्यात आले. यावेळी धरणातील जलपूजन बाळू महाराज गिरगावकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिंतूर कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रमोद चव्हाण, प्रदीप चव्हाण, जवळा बाजार भागवत कमेटीचे सदस्य मुरलीधर मुळे, मारोतराव सातपुते, रमेशचंद्र बंग, डॉ. रमेश नवले, अच्युत महाराज पिंगळीकर, शामराव ढोबळे, येलदरी व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष संजय भुतडा, सचिन तोष्णीवाल, पंकज तोष्णीवाल, रमण तोष्णीवाल, प्रवीण मुळी, बालासाहेब कावळे, ओंकार महाराज कदम, संभाजी पाटील, बालासाहेब ढोबळे, अरुण डहाळे, अशोक चव्हाण, शिवाजी कंकाळ, शामराव नेव्हल, साहेबराव कावळे, अशोक चव्हाण यांच्यासह शेतकरी, व्यापारी उपस्थित होते.

पूर्वजांच्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण प्रेरणादायी : स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज

सेलू : पूर्वजांचा इतिहास जाणून घेतल्याने मनाची घडण होते. अंगात सामर्थ्य संचारते. आपल्या घरण्याविषयी अभिमान वाटू लागतो. त्यामुळे पूर्वजांच्या गौरवशाली इतिहासाचे चिरंतन स्मरण ठेवा कारण ते प्रेरणादायी असते, असा संदेश अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष, राष्ट्रसंत स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांनी दिला. सेलू शहरातील नूतन विद्यालयाच्या मैदानावर हनुमानगढ परिसरात सुरू असलेल्या श्रीराम कथेमध्ये शुक्रवारी (दि.१८) रोजी राष्ट्रसंत गोविंददेव गिरीजी महाराज बोलत होते. शुक्रवारी रामकथेसाठी जगन्नाथधामचा देखणा मंच उभारण्यात आला होता. स्वामीजी म्हणाले की, ' आयुष्य नश्वर आहे. त्यामुळे योग्य ध्येय निश्चित केले पाहिजे. ज्यांची मन घडतात त्यांच्याकडून महान कार्य सिद्धीस जातात. स्वतः तील आत्मविश्वास जागवा. स्वतः चूक करू नका पण, ज्यांच्याकडून चूक घडली त्यांच्याविषयी अंतःकरणात करूणा असू द्या. आपले मन, मेंदू, मनगट मजबूत करा आणि जीवनामध्ये आपण काय कार्य करायला जन्मलोत हे समजून घ्या. तरच आपले जीवन सुखी, समृद्ध आणि सुंदर होईल. असेही ते म्हणाले. होती. या वेळी विविध मान्यवरांसह ग्रामीण भागात संत तुकाराम गुरूकुलच्या माध्यमातून निवासी शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिल्याबद्दल रामकिशन आबा सोळंके व सौ.सोळंके (लिखित पिंपरी ता.परतूर) यांचा स्वामी गोविंददेव गिरीजी महाराज यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रा.संजय पिंपळगावकर, अशोक लिंबेकर यांनी सूत्रसंचालन केले. कथेला श्रोत्यांची मोठी उपस्थिती होती.

अग्रलेख...

भारताची संरक्षण सिद्धता वाढविणारा करार

भारताची चीनबरोबरची सीमा अधिक भक्कम व्हावी यासाठी भारताने अमेरिकेसोबत सुमारे चार अब्ज डॉलर्सचा (३२ हजार कोटी रुपये) ३१ प्रीडेटर ड्रोन खरेदीचा करार नुकताच केला. भारताची संरक्षण सिद्धता अधिक भक्कम करणारा व देशाच्या संरक्षण क्षमतेवर दूरगामी परिणाम करणारा हा निर्णय असून याबद्दल केंद्रातील मोदी सरकारचे अभिनंदन केले पाहिजे. एकीकडे साम्राज्यवादी, विस्तारवादी, विश्वासघातकी ड्रॅगन आणि दुसरीकडे नेहमीच जिहादी दहशतवादाला आणि फुटीरतावादाला प्रोत्साहन व पाठिंबा देणारा पाकिस्तान हे दोन धोकादायक शेजारी आमच्या आजूबाजूला असताना भारताला अशाच प्रकारच्या प्रभावी संरक्षण सामग्रीची नितांत आवश्यकता होती. ३१ प्रीडेटर ड्रोन खरेदीमुळे देशाची ही गरज मर्यादित प्रमाणात का होईना, पण पूर्ण झाली आहे. बहुतांश क्षेत्रात आज ड्रोनचा वापर होतो. संरक्षण क्षेत्रदेखील त्याला अपवाद राहू शकत नाही. काळाची गरज ओळखून व भविष्यातील संभाव्य आंतरराष्ट्रीय चित्र लक्षात घेऊन केंद्र सरकारने हा करार करण्याच्या दृष्टीने निर्णायक पावले टाकली आणि त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली. गेल्याच आठवड्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली कॅबिनेटच्या सुरक्षा समितीने (सीसीएस) ड्रोन खरेदीला मान्यता दिली होती. खरेदी करण्यात आलेल्या ड्रोनपैकी भारतीय नौदलाला १५ 'सी गार्डियन' ड्रोन तर हवाई दल आणि लष्कराला प्रत्येकी आठ 'स्काय गार्डियन' ड्रोन मिळतील. म्हणजेच या ड्रोन खरेदी करारामुळे एकाच वेळी लष्कर, हवाई दल आणि नौदलाची संरक्षण सिद्धता आणि मारक क्षमता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. 'सी गार्डियन' ड्रोन विविध प्रकारांची भूमिका बजावू शकतात. यामध्ये सागरी टेहळणी तसेच पाणबुडीविरोधी युद्धात आणि दूर अंतरावरील लक्ष्यभेद करण्यासाठी या ड्रोनचा वापर होऊ शकतो. दीर्घ पल्ला आणि खूप उंचावरून उडण्याची क्षमता, ३५ तासांपेक्षाही अधिक काळ हवेत राहण्याची क्षमता व चार क्षेपणास्त्रे आणि ४५० किलो बॉम्ब टाकण्याची क्षमता ही या अत्याधुनिक ड्रोनची वैशिष्ट्ये आहेत. सध्या एकटा चिमुकला इस्रायल हमास, हिजबुल्लाहसह डझनभर धोकादायक इस्लामी दहशतवादी संघटना आणि इराण, लेबनॉन व अन्य मुस्लिम देशांशी संपूर्ण सामर्थ्यानिशी लढत आहे. अमेरिकेने पुरविलेली अत्याधुनिक संरक्षण सामग्री, तंत्रज्ञान तसेच प्रीडेटर ड्रोन याचाही यात महत्त्वाचा वाटा आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. इस्रायल स्वत:च्या बळावर लढत आहे, ही गोष्ट जेवढी खरी तेवढेच या देशाला अमेरिकेसारख्या बलाढ्य देशाचेही संपूर्ण पाठबळ आहे. त्यामुळेच शत्रू देशांनी चारही बाजूंनी वेढलेले असूनही इस्रायल अतिशय आत्मविश्वासाने लढत आहे, ही गोष्ट प्रकर्षाने लक्षात घ्यावी लागेल. आज ना उद्या भारतावरदेखील अशीच वेळ येणार आहे. विस्तारवादी ड्रॅगनचे शेपूट केव्हा वळवळ करेल, याचा काहीही भरवसा नाही आणि दुसरीकडे भारताच्या द्वेषाने अंध झालेला व कट्टर जिहादी घटकांचा भरणा असलेला पाकिस्तान तर कायमच काश्मीर प्रश्नावरून युद्धाची भाषा बोलत असतो. त्यामुळे भारताला संरक्षण क्षेत्रात स्वदेशी व विदेशी या दोन्ही मार्गांनी बळकट करणे आवश्यक झाले आहे. त्यामुळेच भारताच्या तीनही सेनादलांना प्रचंड सक्षम करणारा हा निर्णय भारतीयांसाठी आनंददायक आणि दिलासादायक आहे. कुठल्याही देशाचे अस्तित्व आणि सार्वभौमत्व टिकवून ठेवायचे असेल तर त्या देशाची संरक्षण व्यवस्था अतिशय मजबूत व उत्तम असणे गरजेचे असते. त्या देशातील नागरिक कितीही नीतिमान, चांगले, सत्याच्या वाटेवर चालणारे असले, तरी जोपर्यंत याला शक्ती व सामर्थ्याची जोड मिळत नाही, तोपर्यंत या सगळ्यांचा काहीच उपयोग नाही. प्राचीन इतिहासात डोकावून पाहिले असता सम्राट चंद्रगुप्त मौर्य, हिंदुस्थानचा नेपोलियन असे बिरूद असलेला सम्राट समुद्रगुप्त, मगध साम्राज्याला प्रचंड बळ देणारा व विदेशी आक्रमकांना भारतातून हाकलून देणारा महापराक्रमी पुष्यमित्र शुंग आणि मध्ययुगीन कालखंडात प्रतिकूल परिस्थितीवर मात करून हिंदवी स्वराज्याची स्थापना करणारे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकाळाचा व कार्यशैलीचा अभ्यास केल्यास एक बाब स्पष्टपणे सिद्ध होते आणि ती म्हणजे या सर्वांनीच देशाच्या संरक्षण सिद्धतेला, लष्कराला नेहमीच सर्वोच्च प्राधान्य दिले. याच्या बळावरच त्यांनी आपले साम्राज्य प्रस्थापित केले आणि वाढविलेदेखील. एखाद्या देशातील नागरिक कितीही नीतिमान, चांगले, सत्याच्या वाटेवर चालणारे असले, तरी जोपर्यंत याला शक्ती व सामर्थ्याची जोड मिळत नाही, तोपर्यंत या सगळ्यांचा काहीच उपयोग नाही. जगात दुर्बळांना, शक्तिहीन लोकांना कुणीच विचारत नाही, हे व्यावहारिक सत्य आहे. त्यामुळे इतिहासातील पराक्रमी आणि कर्तृत्ववान महापुरुषांची वाट चोखाळणारा केंद्रातील मोदी सरकारचा निर्णय स्तुत्य आहे. ज्या देशांकडील शस्त्रे जुनाट झालेली व कालबाह्य असतात त्या देशाचे अस्तित्व नेहमीच धोक्यात असते, हा इतिहास आहे आणि भारताने तर याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे. पंडित जवाहरलाल नेहरूंसारखी प्रभावी आणि बुद्धिमान व्यक्ती भारताच्या पंतप्रधानपदी होती. पण संरक्षण दलाला अत्याधुनिक शस्त्रे त्यांच्या सरकारने पुरवली नाहीत. १९६२ मध्ये चीनशी लढताना शत्रुसैन्याकडे अत्याधुनिक शस्त्रे असताना उंच व डोंगराळ भागात आमच्या जवानांजवळ दुसऱ्या महायुद्ध काळातील रायफली होत्या. परिणामी आमच्या जवानांनी प्रचंड शौर्य गाजवूनही या युद्धात भारताचा पराभव झाला. त्यामुळे संरक्षण क्षेत्राला अधिकाधिक बळकट करणारे मोदी सरकारचे निर्णय दूरदर्शीपणाचे आहेत. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, संरक्षण क्षेत्रातील आपली आयात कमी होऊन अधिकाधिक निर्यात कशी वाढेल यासाठी 'मेक इन इंडिया'ला अधिकाधिक प्रोत्साहन दिले पाहिजे. कावेबाज व कपटी शेजारी देशांनी आक्रमण करण्याचे व भारताची कुरापत काढण्याचे दु:साहस केले, तर त्यास चोख प्रत्युत्तर देणे गरजेचे असल्याने आपण त्यासाठी पूर्णत: सुसज्ज असले पाहिजे. त्या दृष्टीने बॅलेस्टिक क्षेपणास्त्र संरक्षण प्रणालीच्या निर्मितीत भारताने घेतलेली आघाडी सुखद आणि स्वागतार्ह आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात डीआरडीओने पाच हजार किलोमीटर पल्ल्यापर्यंतचे लक्ष्य भेदणारे क्षेपणास्त्र आकाशातच नष्ट करण्याची क्षमता विकसित केल्याची बातमी सुखद व आनंददायक आहे. मात्र, वर्तमान केंद्र सरकारनेही यासाठी भरीव आर्थिक तरतूद केली होती.

काँग्रेस सरकारच्या कार्यकाळात केंद्रीय अर्थसंकल्पात संरक्षण क्षेत्रासाठी भरीव आर्थिक तरतूद नसायची, ही वस्तुस्थिती आहे. सेनादलांनी वारंवार सांगूनही अनेकदा संरक्षणविषयक गरज काँग्रेसी राजवटीत भागविली गेली नव्हती, हा इतिहास आहे. पण यंदाच्या अर्थसंकल्पाने हे चित्र पूर्णपणे पालटवून टाकले आहे. यंदा भारत सरकारने जगातील तिसरा सर्वांत मोठा संरक्षण अर्थसंकल्प सादर केला आहे. केंद्रातील मोदी सरकारने २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात संरक्षण विभागासाठी ६.२१ लाख कोटी रुपयांची तरतूद केली आहे. गेल्यावर्षीच्या अर्थसंकल्पात ५.९४ लाख कोटींची तरतूद होती. म्हणजेच भारताने आपल्या संरक्षण खर्चात यावर्षी २७ हजार कोटींची वाढ केली आहे. काही दिवसांपूर्वीच कपटी व विस्तारवादी चीनने अरुणाचल प्रदेशावर आपला दावा केला होता. त्यामुळे चीनच्या सीमेवर आपल्याला सदैव सावध व सुसज्ज राहणे काळाची गरज आहे. रशिया-युक्रेन युद्धामुळे आणि इस्रायल-हमास यांच्यातील भयंकर संघर्षामुळे सध्या जगावर तिसऱ्या महायुद्धाचे ढग पसरले आहेत. हे दोन्ही युद्ध थांबण्याची सध्या कोणतीही लक्षणे दिसत नाहीत आणि दुसरीकडे भारतविरोधी शत्रूंच्या कुरापती सुरूच आहेत. अशा एकूणच स्फोटक आणि नाजूक परिस्थितीत भारताने सावधगिरी बाळगणे अतिशय आवश्यक आहे. त्यामुळेच संरक्षण क्षेत्राला अधिकाधिक बळकटी प्राप्त करून देणे हेच सरकारचे सर्वांत मोठे राष्ट्रीय कर्तव्य आहे. ■

दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

भारत-कॅनडातील वादळ!

२९ मे १९९९ चा दिवस! पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल परवेज मुशर्रफ चीनच्या दौऱ्यावर होते. बीजिंगमधील एका हॉटेलात मुक्कामास असताना त्यांनी आपले चीफ ऑफ स्टाफ जनरल मुहम्मद अझीझ यांना दूरध्वनी लावला. 'कारगिलमधील आपली कारवाई गोपनीय ठेवण्यात आपल्याला यश आले आहे,' असे ते आपल्या वरिष्ठास सांगत होते आणि हे संभाषण 'रॉ'चा एक अधिकारी टेप करीत होता. 'रॉ'च्या इतिहासातील ही सर्वात विलक्षण अशी कामगिरी होती. या एका संभाषणाने भारताला पाकिस्तानला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करता आले. 'रॉ' म्हणजे 'रिसर्च ॲण्ड ॲनलिसीस विंग' या भारताच्या विदेशी गुप्तचर संस्थेने देशासाठी वेळोवेळी महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. मात्र, याच रॉच्या कार्यक्षमतेवर आता काही गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. 'रॉ'च्या अकार्यक्षमतेचा फटका देशाला बसण्याचे ताजे उदाहरण म्हणजे भारत-कॅनडा संबंधात आलेली कमालीची कटुता.

निज्जर हत्याकांड : भारत-कॅनडा दोन्ही देशांनी परस्परांच्या काही अधिकाऱ्यांची हकालपट्टी केली आहे. हा सारा विषय एक खलिस्तानी समर्थक हरदीपसिंग निज्जर याच्या हत्याकांडातून उद्‌भवला आहे. या हत्याकांडात 'रॉ'चा हात असल्याचे कॅनडाला वाटते. निज्जर हा कॅनडाचा नागरिक होता. कॅनडाने निज्जर हत्याकांडाचे प्रकरण गंभीरपणे घेतले असून मागील काही महिन्यांपासून या हत्याकांडाने दोन्ही देशांमधील संबंध ताणले गेले आहेत. कॅनडा सरकारने या हत्याकांडची चौकशी चालविली आहे. कॅनडाच्या भूमीवर कॅनडाच्या नागरिकास कोणत्याही विदेशी सरकारने ठार करणे आम्हाला मान्य नाही, अशी या सरकारची भूमिका आहे. कॅनडा सरकारची ही भूमिका तशी योग्य आहे. त्याचवेळी आपल्या भूमीचा वापर कोणत्याही देशाविरुद्ध अपप्रचार व त्या देशाविरोधात होऊ न देण्याची जबाबदारी कॅनडा सरकारची आहे, हेही या देशाने विसरता काम नये. बहुधा याचा विसर कॅनडा सरकारला पडलेला दिसतो. कॅनडा सरकारने या चौकशीत कॅनडातील भारताचे उच्चायुक्त संजय वर्मा यांनाही गोवण्याचा प्रयत्न केल्यानंतर निज्जर प्रकरण पुन्हा एकदा उसळून आले आहे. कॅनडातील निज्जर हत्याकांडाला गंभीरता आली, ती अमेरिकेतील गुरपतवंतसिंग पन्नू या आणखी एका खलिस्तानी अतिरेक्याच्या फसलेल्या हत्याकांडाने. कॅनडातील प्रकरणापेक्षा हे प्रकरण जास्त गंभीर ठरले. कारण या प्रकरणात अमेरिकन अधिकाऱ्यांनी 'रॉ'चा एक एजंट सहभागी असल्याचा काही पुरावा गोळा केला असल्याचा दावा केला आहे.

सीसी-वन : गुरपतवंतसिंग पन्नू प्रकरणात न्यू यॉर्कच्या न्यायालयात एक आरोपपत्र दाखल करण्यात आले असून त्यात 'सीसी-वन' या नावाने एका भारतीय अधिकाऱ्याचा उल्लेख करण्यात आला आहे. या अधिकाऱ्याचे नाव आता प्रथमच सार्वजनिक करण्यात आले असून तो अधिकारी विकास यादव हा आहे. तो केंद्रीय राखीव पोलिस दलात अधिकारी होता. त्याला 'रॉ'मध्ये पाठविण्यात आले होते. तो अमेरिकेत तैनात होता. हे सारे प्रकरण सार्वजनिक झाल्यावर विकास यादवला भारतात बोलाविण्यात आले असून 'सीसी-वन'ला अटक करण्यात आल्याची माहिती अमेरिकेला देण्यात आली आहे. या प्रकरणी भारतीय अधिकाऱ्यांची एक चमू सध्या अमेरिकेत आहे.

निखिल गुप्ताची अटक : खालिस्तानी नेता पन्नूला ठार करण्याचा आदेश प्रथम विकास यादवला नवी दिल्लीहून देण्यात आला, असा अमेरिकेचा दावा आहे. विकास यादवने या कामासाठी निखिल गुप्ता या अमेरिकेत स्थायिक झालेल्या व्यावसायिकाची मदत घेतली. गुप्ताने एक भाडोत्री मारेकरी निवडला आणि तो नेमका अमेरिकन गुप्तचर संस्थेचा एजंट निघाला आणि पन्नू हत्याकांडाचे बिंग फुटले. म्हणजे या साऱ्या घटनाक्रमात विकास यादवने निखिल गुप्ताची केलेली निवड, निखिल गुप्ताने अतिशय बालिशपणे हाताळलेले हे सारे प्रकरण आज भारत सरकारसाठी डोकेदुखी ठरले आहे. हा सारा विषय केवळ कॅनडापुरता मर्यादित न राहता यात अमेरिकाही ओढली गेली आहे.

भारताचा इन्कार : भारताने हरदीपसिंग निज्जर हत्याकांड व पन्नू हत्येचा कट या दोन्ही घटनांचा स्पष्ट शब्दात इन्कार केला आहे. या दोन्ही घटनांचा भारत सरकारचा दुरान्वयानेही संबंध नसल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे आणि ते बरोबरही आहे. भारत सरकार असल्या कारवायात का सामील होईल? भारताने असे कधीही केलेले नाही आणि करणारही नाही.

निखिल गुप्ता डबल एजंट? : पन्नू प्रकरणात सध्या अमेरिकेच्या ताब्यात असलेला निखिल गुप्ता हा डबल एजंट असावा काय, असा प्रश्न आता विचारला जात आहे. प्रथम तो अमेरिकेसाठी काम करीत होता. नंतर त्याने भारतासाठी काम करणे सुरू केले आणि याच प्रकरणात तो अमेरिकेच्या जाळ्यात अडकला. गुप्ता भारतात आला असताना परत जाताना तो झेकोस्लाव्हियाची राजधानी प्रागला गेला. तेथे त्याला अटक करण्यात आली. याचा अर्थ गुप्तावर नजर ठेवली जात होती. मधल्या काळात गुप्ताने प्रत्यार्पण होऊन त्याला अमेरिकेच्या ताब्यात देण्यात आले आहे. तो सध्या अमेरिकेत अटकेत आहे. निज्जर प्रकरणाचे धागेदोरे पन्नू प्रकरणापर्यंत जाऊन पोहोचले ते या घटनाक्रमाने. दुसरीकडे अमेरिका-कॅनडा यांच्यात घनिष्ठ मैत्री आहे. दोन्ही देश गुप्तचर माहितीची देवाणघेवाण करीत असतात.

अपुरे प्रशिक्षण? : अमेरिकेत नियुक्त करण्यात आलेल्या विकास यादव या रॉ अधिकाऱ्याचे अपुरे प्रशिक्षण की त्याचे नवखेपण हा या साऱ्या प्रकरणातील मुख्य मुद्दा ठरला आहे. याने केवळ गुप्ता स्वत: अडचणीत आलेला नाही तर रॉ व भारत सरकार अडचणीत आले आहे. विकास यादवने पन्नू हत्याकांडासाठी निवडलेला निखिल गुप्ता डबल एजंट निघतो. गुप्ताने ज्या भाडोत्री मारेकऱ्याची निवड केली होती तो अमेरिकेचा एजंट निघतो... हा सारा घटनाक्रम बेजबाबदारपणाचे लक्षण नाही तर काय? असा प्रश्न विचारला जात आहे. कोणतीही सावधगिरी नाही, गोपनीयता नाही. रॉच्या एका अधिकाऱ्याने फारच बालिशपणे हा सारा विषय हाताळला. त्याला सरकारची संमतीही नव्हती, असे आता समोर आले आहे. या साऱ्या घटनाक्रमाने एक मोठे प्रश्नचिन्ह रॉच्या कार्यक्षमतेवर निर्माण झाले. अमेरिका व कॅनडासोबत ब्रिटन, न्यूझीलंड व ऑस्ट्रेलिया हे देशही यात सक्रिय असल्याचे म्हटले जाते. विशेष म्हणजे अमेरिका, ब्रिटन व कॅनडा या तीन देशांमध्ये शीख समाज मोठ्या प्रमाणावर आहे. त्यांच्यावर या घटनाक्रमाचा काय परिणाम होईल, याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. पंजाबमध्ये काही वर्षांपूर्वी फोफावलेली खलिस्तानी चळवळ आता थंडावली आहे. त्याला आता धुगधुगी मिळू नये असे भारताला वाटत असले, तरी काही शक्ती याला खतपाणी घालू शकतात. त्यामुळे भारत सरकारने अतिशय तडफेने व तातडीने या साऱ्या प्रकरणाचा निपटारा करणे आवश्यक असल्याचे मानले जाते. कॅनडा-भारत यांच्यातील संबंध सलोख्याचे राहिलेले आहेत. एका हत्याकांडाने त्यात व्यत्यय यावा, ही कॅनडा सरकारची भूमिका योग्य नाही. स्थानिक राजकारणात फायदा मिळविण्यासाठी तर कॅनडा सरकार हे करीत नाही ना, असा एक प्रश्न विचारला जात आहे. कॅनडाने हे न करणे त्याच्या हिताचेच ठरेल. ■

वेध

अनिल उमाकांत फेकरीकर

आले विधानसभा इलेक्शन! जपा गावकऱ्यांनो रिलेशन!!

लोकांनी, लोकांच्या हिताकरिता, लोकांकरवी चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही होय. हीच भूमिका स्वीकारून भारतात २६ जानेवारी १९५० पासून लोकशाही राज्य प्रणाली स्वीकारली आहे. या प्रक्रियेत लोकसभेसाठी खासदार निवडले जातात, तर विधानसभा निवडणुकीच्या माध्यमाने आमदारांची निवड सामान्य मतदार मतदान करून करीत असतात. मतदानाची प्रक्रिया पूर्णत: गोपनीय असते. मात्र, गेल्या काही वर्षांत इलेक्शन येताच शहरासह गावखेड्यातील माहोल खराब होत जातो. गावगाड्यातील जी काही नाती वर्षानुवर्षे जपलेली असतात, त्यांनाही निवडणुकांमुळे तडा जातो. कालपर्यंत एखादा मुलगा शेजाऱ्याला मोठ्या आदराने काका/मामा म्हणून आवाज देतो; तो अचानक राजकारणाचा संचार होताच त्यांच्याशी बोलणेही सोडून देतो. त्याला वाटते की, काका/मामा तर विरोधी पक्षातील आहेत. म्हणजे काका आपले शत्रूच असल्याचे तो मानतो. कारण, त्याला राजकारणात येण्यापूर्वी योग्य प्रशिक्षणच मिळालेले नाही. त्याला वाटते की, विरोध करणे म्हणजेच राजकारण असते. पण विरोधाला विरोध करणे म्हणजे राजकारण नसते तर विरोधाला प्रेमाने जिंकणे, एखादा मुद्दा विविध उदाहरणे देत पटवून देणे आणि आपले म्हणणे कसे देशहिताचे आहे, हे संसदीय भाषेत सांगणे म्हणजे राजकारण होय. याची परिभाषा बहुतांश नेत्यांनाच ठाऊक नसल्याने ती मंडळी कार्यकर्त्यांना काय सांगणार आहेत. असाच प्रकार वाढला आणि गावागावांत भांडणतंटे वाढले. अशाच स्वरूपाचे वाद आता २३ नोव्हेंबर २०२४ पर्यंत महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या काळात वाढतील. पण यात सहभागी होण्यापूर्वी प्रत्येकाने एकदा तरी सुज्ञपणे विचार करायला हवा. त्यांनी झाले गेले विसरून विधानसभा इलेक्शन असले तरी रिलेशन जपायला हवे. आजपर्यंत जे वाद झाले, त्यातून कुणाला काहीही मिळालेले नाही. पक्षकारांच्या वादविवादाला कोर्टही कंटाळले होते म्हणूनच त्यांनी लोकअदालत हा स्तुत्य उपक्रम अंमलात आणला आहे ना? मग आपण लोकशाहीच्या मंदिरात जाण्यापूर्वी भांडण करून आयुष्य खराब का करीत आहोत, तोच प्रकार वारंवार झाल्याने गावाच्या सर्वांगीण विकासावर त्याचा प्रतिकूल परिणाम झाला आहे. असा परिणाम झाला नसता तर आज भारतातील ७६६ जिल्ह्यांच्या अंतर्गत येणाऱ्या ६ लाख ६४ हजार ३६९ गावांमध्ये सर्व काही सुजलाम् सुफलाम् राहिले असते. महाराष्ट्राचा विचार करता ३६ जिल्ह्यांतील ४४ हजार ७२७ गावे स्वयंपूर्ण राहिली असती. पण वस्तुस्थिती मोठी विचित्र आहे. स्वार्थाने प्रेरित असलेल्या राजकारणाने गावातील चांगल्या वातावरणाचा सत्यानाश केला आहे.

आपल्या देशातील लोकशाहीचा पाया मजबूत असल्याचे म्हटले जाते. मग याच देशातील सुज्ञ मतदार गैरव्यवहाराच्या आरोपाखाली तुरुंगात गेलेल्या किंवा तिथेच मुक्कामी नेत्याला निवडूनच कसे देतात, हाही प्रश्न मन सुन्न करणाराच आहे. अहो, कारागृहात गेलेल्या व्यक्तीचे रक्त वैद्यकीय क्षेत्र स्वीकारत नाही. मग त्या व्यक्तीला लोकशाहीच्या मंदिरासाठी आमदार, खासदार म्हणून आपणही का स्वीकारावे, असाही प्रश्न सुज्ञ म्हणवून घेणाऱ्या मतदारांनी स्वत:ला विचारायला हवा. आपण स्वार्थी लोकांच्या नादी लागतो आणि वर्षानुवर्षे जपलेल्या नात्यांना मूठमाती देतो. परिणामी इलेक्शन येताच रिलेशन खराब होतात. हा प्रकार आपल्या लोकशाही व्यवस्थेला अभिप्रेत नाही. अनेक गावखेड्यांत निवडणुकीच्या रंगात एकमेकांवर गलिच्छ आरोप करीत जीवघेणे हल्ले केले जातात. कार्यकर्त्यांना चिवडा आणि दारू यात बुडवले जाते. यातून रिलेशन कसे जपले जाणार? यामुळे तर वाद वाढतील. ज्यांना आपला स्वत:चा फायदा करून घ्यायचा ते कार्यकर्त्यांमध्ये भांडण लावून देतात आणि ते विधानसभेत जाऊन आमदारकीचा लाभ घेतात. इकडे कार्यकर्ते इलेक्शनच्या नावाखाली रिलेशन खराब करून घेतात. पण आतापर्यंत जे झाले ते विसरून प्रत्येकाने निवडणूक असो किंवा नसो सर्वांशी प्रेमाने, आदराने राहण्याचा प्रयत्न करायलाच हवा. वैद्यकीय जगताचा अभ्यास करता घरोघरी ताणतणावामुळे अनेकांचे आरोग्य खराब झाले आहे. त्यात हा राजकारणाचा ताण सहन होण्यासारखा मुळीच नाही. तेव्हा आपल्या आरोग्याचे पानिपत करून घेण्यापेक्षा शांतपणे सर्व मतदारांनी वादाला वेशीवरच ठेवले तर नक्कीच गावागावांत शांतता नांदेल. एक सांगतो, जेव्हा गावात किंवा घरात शांतता नांदते तेव्हाच तेथील प्रगती सुरू होत असते. तेव्हा प्रगती करायची असेल तर गावकऱ्यांनो निवडणुकीच्या रंगातही रिलेशन जपण्यासाठी पुढाकार घ्या. ■

९८८१७१७८५९

कानोसा

अमोल पुसदकर

जीवन आणि जीविकेचा संघर्ष

'जीनियस' नावाच्या एका कंपनीने कर्मचाऱ्यांचे आरोग्य, त्यांचे ताणतणाव, त्यांची नोकरीवर परतण्याची इच्छा, सहकारी कर्मचाऱ्यांचा त्यांच्याशी व्यवहार, व्यवस्थापनाचा त्यांच्याशी व्यवहार या सर्व मुद्यांवर आधारित एक सर्वेक्षण केले. त्यामध्ये अत्यंत चिंताजनक माहिती समोर आली. त्या सर्वेक्षणानुसार ७९ टक्के कर्मचाऱ्यांना असे वाटते की, त्यांचे कार्य, मानसिक स्वास्थ्य, ताणतणाव याबद्दल कंपनीने अधिक उपाययोजना आणि कार्य करण्याची आवश्यकता आहे. ६६ टक्के कर्मचाऱ्यांनी सांगितले की, त्यांचे कार्य हा त्यांच्यावर अत्याधिक बोजा असून त्यांना इतरांचेही कार्य करावे लागते. अनेक ठिकाणी नवीन भरती करायची नाही या नावाखाली जुने जे कर्मचारी काम सोडून जातात; त्यांचे काम त्यांच्या सहकारी कर्मचाऱ्याला दिले जाते. त्याही नंतर जर कोणी सोडून गेला तर त्याचेही काम त्या एकट्याच माणसाला दिले जाते. ज्या कामासाठी पूर्वी दोन माणसं असायची ते सर्वच काम आता हा एकटा माणूस सांभाळतो. या परिस्थितीमुळे त्याच्यावर कामाचा अत्याधिक बोजा होतो. व्यवस्थापन काहीही ऐकून घ्यायला तयार नसते. व्यवस्थापनाला त्यांच्याही वरच्या अधिकाऱ्यांना खूश करायचे असते. त्यामुळे ते आम्ही कसे कमी माणसात काम करून दाखवतो, हे वरच्या स्तरावर सिद्ध करण्यासाठी खालच्याचा बळी घेत असतात. त्यामुळे वरिष्ठा-वरिष्ठांकडे बोलता येत नाही, खालती कोणाला सांगता येत नाही, घरी काही सांगून त्यांना काही समजणार नसते. त्यामुळे 'मरता, क्या न करता!' म्हणून त्याला आपले व इतरांचेही काम करावे लागते. कामाचे कष्ट, सोबतच होणारी मानसिक कुचंबणा यामुळे नैराश्याचा सामना त्याला करावा लागतो.

४५ टक्के कर्मचाऱ्यांना रविवारी संध्याकाळी मानसिक चिंता सतावत असते. सोमवारी आपल्यापुढे काय वाढून ठेवलेले आहे या सर्व गोष्टींचा त्रास त्यांना रविवारी संध्याकाळपासून होणे सुरू होतो. त्यामुळे हे कर्मचारी सोमवारी सकाळी कामावर जायला अनुत्सुक असतात. ७८ टक्के लोक सहकारी कर्मचाऱ्यांचा व्यवहार आणि व्यवस्थापनाच्या कर्मचाऱ्यांकडून असलेल्या अपेक्षा याबद्दल नाराज आढळून आले. राजकारण आता सर्वत्र व्याप्त झालेले आहे. खाजगी नोकऱ्यांमध्येही ते व्याप्त झालेले आहे. खाजगी नोकऱ्यांची संख्या कमी असणे, अनेक वर्षांपासून तिथे काम करीत असल्यामुळे बऱ्यापैकी पगार तिथे मिळत असतो. ती नोकरी सोडून दुसरीकडे जाणे यासाठी काही लोकांना शहर बदलण्याचा पर्याय असतो तर काही लोकांना कमी पगारावर जाण्याचा पर्याय असतो. अनेक वेळा तर कर्मचारी कमी पगारावर दुसरीकडे जायला तयार होतात, परंतु ते त्या पगारावर त्याच कंपनीत काम करायला तयार नसतात. कोणत्याही कंपनीसाठी यशस्वी होण्याकरिता कर्मचाऱ्यांचा सहभाग हा त्यांना आवश्यकच असतो. परंतु कर्मचारी जर मन लावून काम करू शकत नसतील तर कंपनीला अपेक्षित यश मिळणार नाही, याची कंपनीने नोंद घेण्याची आवश्यकता आहे. अनेक वेळा काही मोठ्या कंपन्या या आपण कर्मचारी कल्याणासाठी त्यांच्या कार्य व जीवन याच्या संतुलनासाठी काय काय करतो हे दाखवितात. परंतु बरेचदा संचालकांच्या खोलीत ठरलेल्या गोष्टी या फारशा खाली पोहोचत नाही. अनेक वेळा उत्पादन काढण्याच्या मागे सर्व लोक लागलेले असल्याने उत्पादन निघाल्यावर उरलेल्या वेळामध्ये आपण कर्मचारी कल्याण करू हा त्यांचा विचार असतो. त्यामुळे अनेक वेळा अनेक सर्वेक्षण, अनेक फॉर्म हे केवळ खानापूर्ती म्हणून भरले जातात.

सुट्यांच्या दिवशी ठेवण्यात येणारी सहल हा कर्मचाऱ्यांना एक त्रासच वाटतो. सुट्यांच्या दिवशी कर्मचारी कल्याणाकरिता ठेवण्यात आलेले प्रशिक्षणही कर्मचाऱ्यांसाठी अत्यंत नावडता विषय असतो. कर्मचाऱ्यांच्या कार्य आणि जीवन याच्या संतुलनासाठी काही कंपन्या खरोखरच कार्य करीत असतात. त्या कामाच्या दिवशी त्यांच्यासाठी विविध प्रकारांचे प्रशिक्षण आयोजित करतात. यामुळे अशा प्रकारच्या प्रशिक्षणामुळे कर्मचाऱ्यांचा उत्साह वाढतो व ते अधिक चांगल्या प्रमाणात कार्य करू शकतात.

एखादा कर्मचारी सोडून गेल्यास त्याचे काम जर दुसऱ्या कर्मचाऱ्याला सोपविणार असेल तर नवीन कर्मचारी येतपर्यंत त्याला आपण काही आर्थिक स्वरूपाचा लाभ मिळवून देऊ शकतो का, याचा कंपनीने विचार करायला पाहिजे. आजकाल राजकारण सर्वत्र झाल्यामुळे कर्मचाऱ्यांना इतरांच्या टिंगलटवाळीचा, त्यांनी केलेल्या शेरेबाजीचा किंवा त्यांनी सातत्याने एखाद्याला लक्ष करून त्याच्या कामात अडथळे आणण्याच्या केलेल्या प्रयत्नांचा, कर्मचाऱ्यांच्या मनावर व त्याच्या कार्यक्षमतेवर खूप अनुचित परिणाम होत असतो. त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांना कंपनीमध्ये वरिष्ठांसोबत हा विषय सांगण्याची मुभा व स्वातंत्र्य असणे आवश्यक आहे. कंपन्यांमध्ये काही इजा झाली तर त्यासाठी छोटासा दवाखाना असतो, त्यामध्ये बरेचदा डॉक्टर असतात. परंतु, कंपन्यांनी मानसिक विकारतज्ज्ञ, मनोचिकित्सक, मानसिक सल्लागार अशा विविध लोकांची सेवा घेण्याची आवश्यकता आहे. कंपन्यांमध्ये होणारे भांडणतंटे, लोकांचे मोठ्या आवाजात बोलणे, किंचाळणे हे सर्वच मानसिक रोगाचे लक्षण असू शकतात. त्यासाठी अशा कर्मचाऱ्यांना मानसिक आधार व मदत देण्याची आवश्यकता असते. उत्पादन काढणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. त्यासाठी सर्वांनीच काम केले पाहिजे. परंतु, काम करणारे माणसं आहेत, गाडीला जुंपलेले बैल नाहीत, याचा विचार ठेवणे आवश्यक आहे.

ज्यांच्यावर आपले घर कुटुंब चालविण्याची जबाबदारी आहे त्यांना नाईलाजाने का होईना; ती नोकरी ओढावी लागते. अशा लोकांनी कंपनीसाठी खूप मोठा त्यांच्या आयुष्यातला वेळ दिलेला असतो. कंपनीची सेवा केलेली असते. कंपनीला मोठे करण्यात या लोकांचा फार मोठा हातभार लागलेला असतो. अनेक वेळा कंपन्या पन्नाशीनंतर किंवा ५५ नंतर कर्मचारी कपातीच्या नावाखाली त्यांना अनेक वेळा मुदतपूर्व निवृत्ती घ्यायला बाध्य करतात. ही मानसिकता म्हणजे भाकड गाईला कसायाला विकण्याची मानसिकता आहे.

कार्य करण्यास सुलभ वातावरण, मानसिक शांतता, चांगले सहकारी संबंध व कोणाचेही शोषण होणार नाही, असे वातावरण देणे ही कंपन्यांची जबाबदारी आहे. ती जर त्यांनी पार पाडली तर जीविका आणि जीवनाचा समतोल साधण्याचे कार्य कर्मचाऱ्यांना करता येईल व हीच खरी कार्पोरेट सामाजिक जबाबदारी (कार्पोरेट सोशिअल रिस्पॉन्सिबिलिटी) ठरेल. ■

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

वाचक पत्रे

लाडक्या बहिणींनो, तयार राहा...!

महायुती सरकारने एक महत्त्वाकांक्षी योजना अंमलात आणली आणि असंख्य लाडक्या बहिणींच्या चेहऱ्यावर हास्य उमटलं. शिंदे सरकारने लाडकी बहीण योजना प्रभावीपण

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

मोटार सायकल चोरी करणाऱ्या एक आरोपीस स्थागुशा बीड यांनी केले जेरबंद

तभा वृत्तसेवा
बीड दि.२१ ऑक्टोबर

पोलीस अधीक्षक साहेब बीड यांनी मोटार सायकल चोरीचे जास्तीत जास्त गुन्हे उघडकीस आणण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेला आदेश दिलेले आहे. त्यावरून मा.पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा.बीड यांनी मोटार सायकल चोरी करणारे आरोपींची माहिती काढुन गुन्हे उघडकीस आणण्यासाठी अधिपत्याखालील अधिकारी यांना योग्य मार्गदर्शन करून आदेश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने पो.स्टे.पेठ बीड गुरनं १८३/२०२४ क.३०३(२) इछड या गुन्हयातील बुलेट चोरीचा तपास करीत असतांना दिनांक १९/१०/२०२४ रोजी पोलीस पोउपनि श्री. सिध्देश्वर मुरकूटे यांना सदर बुलेट समर्थ विनोद काळे रा.चंदन आरकेड छ.संभाजीनगर याने चोरल्याची गोपनिय माहिती मिळाली तेव्हा तात्काळ मा.पोलीस निरीक्षक श्री.उस्मान शेख स्था.गु.शा.यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथक रवाना होवुन आरोपी नामे समर्थ विनोद काळे वय२३ रा. चंदन आरकेड छ.संभाजीनगर यास ताब्यात घेवुन त्याचेकडुन गुन्हयात चोरीस गेलेली मोटार सायकल जप्त करण्यात आली आहे. तसेच त्याचेजवळ आणखीन एक मोटार सायकल सायकल मिळुन आली तपास केला असता सदर मो.सा. पो.स्टे.शिवाजीनगर(मुंबई शहर) गुरनं ३२४/२०२२ कलम ३७९ भादंवि मधील चोरीची असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. आरोपीकडुन आणखीन गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असुन आरोपी व दोन मोटार सायकल असा एकुण १,४०,०००/- चा मुद्देमाल जप्त केले आहे.आरोपीस पो.स्टे. पे बीड यांचे ताब्यात देण्यात आलेले असुन पुढील तपास पो.स्टे.पेठ बीड करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.श्री. अविनाश बारगळ पोलीस अधीक्षक,बीड , मा.श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, श्री. उस्मान शेख पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि श्री. सिध्देश्वर मुरकूटे, सफौ/तुळशीराम जगताप, पोह/मनोज वाघ, कैलास ठोंबरे, राहुल शिंदे, विकास वाघमारे यांनी केली आहे.

दिशा व जागृती महिला गटातर्फे शारदोत्सव उत्साहात

तभा वृत्तसेवा
बीड दि.२१ ऑक्टोबर

दिनांक २० ऑक्टोबर २०२४ रोजी दीनदयाल शोध संस्थान दिशा महिला गट व जागृती महिला गट बीड येथे अतिशय उत्साहात व छान वातावरणात शारदोत्सव साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या सर्वप्रथम सुरुवातीला शारदास्थापना, प्रतिमा पूजन, शारदास्तवन व शारदेची आरती करण्यात आली.या कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रमुख अतिथी मा.सौ कमलताई गंगाधर देशमुख तर अध्यक्ष म्हणून जागृती महिला गटाच्या सौ.रत्नमाला सुरवसे ताई या लाभल्या. व्यासपीठावर अँड अर्चनाताई तुंगार मथुरा गृह उद्योग अध्यक्ष तथा दिशा भिशी च्या पालक जन शिक्षण संस्थेच्या पालक यांची उपस्थिती होती. तसेच गोकुळ शालेय समिती सदस्य श्रीमती सुनंदाताई कुलकर्णी व शारदोत्सव सांस्कृतिक समिती प्रमुख सौ.विनया हसेगावकर ताई यांची ही प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना अँड अर्चनाताई तुंगार म्हणाल्या संस्थेच्या माध्यमातून १९९३ पासून भिशी सुरू करण्यात आली व २५ ते ३० वर्षापासून शारदोत्सव घेण्यात येत आहे. आत्मविश्वास पूर्ण व स्वयंशिस्तपणा भिशी मधून मिळतो व महिलांच्या सुप्तगुणांना वाव देण्यासाठी आपल्या रोजच्या दैनंदिन जीवनातील अमूल्य वेळ काढून आपण महिला एकत्रित जमतो. तसेच त्यानंतर प्रमुख अतिथी सौ कमलताई देशमुख यांनी आपले मनोगत व्यक्त करताना महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून ही संस्था वेगवेगळे उपक्रम व कार्यक्रम घेत असते व

तसेच त्यांनी शारदा देवीचे व दुर्गा मातेची विविध रूपे स्पष्ट केली.

कार्यक्रमाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे आजच्या काळातील वास्तववादी कष्टकरी तळागाळातल्या दुर्गा यांचा सन्मान करण्यात आला. त्या दुर्गांमध्ये सौ बबीता शेळके, सौ उमा मोकाशी, सौ गोदावरी व्यवहारे, सौ अर्चना पौळ व सौ स्वाती वाघमारे या पाच दुर्गांचा स्मृतिचिन्ह व साडी चोळी देऊन त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप व त्यांच्या पुढील जीवनातील कार्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले.त्यानंतर अध्यक्ष समोरोपात सौ रत्नमाला सुरवसे ताई यांनी महिषासुरच्या वधाची कथा व वाईट कृत्यावर सत्याचा विजय म्हणून विजयादशमी साजरी करतो व ऊर्जा, शक्ती, चेतना नवदुर्गा रूप घेऊन त्यातून आजच्या काळातील अर्थबोध याबद्दल विवेचन केले. या सर्व कार्यक्रमाच्या आभार प्रदर्शन सौ विनयाताई हासेगावकर यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.मायाताई खांदाट प्रा. प्रज्ञाताई देशमुख व सौ सुप्रियाताई काळे यांनी केले. यानंतर पाच स्पर्धांचे आयोजन केले गेले. प्रथम तीन क्रमांकाचे बक्षीस वाटप करण्यात आले. स्पर्धा क्रमांक १) फुगा फुगवून, ग्लास उचलणे--सौ.अपर्णा ताई जवळेकर,सौ.मंजुषा ताई थिगळे,सौ.वैशाली ताई टाकरवणकर स्पर्धा क्रमांक २) पत्ते उलथन्याने उचलणे--सौ.प्रज्ञा ताई देशपांडे,सौ.स्वाती ताई जैन, सौ.सुनिता ताई कुलकर्णी स्पर्धा क्रमांक ३)न बघता वस्तुंच्या जोड्या लावणे--सौ.विनया ताई हसेगावकर, सौ.प्रज्ञा ताई देशमुख स्पर्धा क्रमांक ४) संगीत खुर्ची --सौ.सुनिता ताई कुलकर्णी, सौ.वंदना ताई मगरे, सौ.सुप्रिया ताई काळे या कार्यक्रमासाठी ७५ महिलांची उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी दिशा व जागृती महिला गट यातील सर्व सदस्यांनी या कार्यक्रमासाठी सहकार्य केले. शेवटी उत्स्फूर्त सांस्कृतिक कार्यक्रमा व दांडीया आणि कार्यक्रमाची उत्साहात सांगता झाली.

अंबाजोगाईत विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस

तभा वृत्तसेवा
अंबाजोगाई दि.२१ ऑक्टोबर

हवामान विभागानं वर्तविलेल्या अंदाजानुसार, अंबाजोगाई शहरांसह परिसरात सोमवारी दुपारी २ च्या सुमारास विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह पावसानं हजेरी लावली. मागील काही दिवसांपासून प्रचंड उकाडा वाढल्याने नागरिक त्रस्त झाले होते. मात्र, सोमवारी दुपारी आलेल्या पावसामुळं वातावरणात गारवा निर्माण झाल्यानं नागरिकांची उकाड्यापासून सुटका झाली.

आज दिनांक २१ ऑक्टोबर रोजी दुपारच्या सुमारास विजांच्या कडकडाटात अंबाजोगाई शहरांसह तालुक्यात पावसाने झोडपले. त्यामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. दरम्यान, हाती आलेल्या माहितीनुसार अंबाजोगाई तालुक्यातील अनेक भागात विजांच्या कडकडाटासह, वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली आहे. जोरदार पावसाने हजेरी लावल्यामुळे शहरातील वीज पुरवठा खंडित झाला होता. पावसामुळे शेतकऱ्यांच्या भाजीपाल्याचं मोठं नुकसान झाले आहे, अशी माहिती प्राप्त झाली आहे.

साहित्य निकेतन ग्रंथालयाच्या वतीने आज प्रसिद्ध पत्रकार तथा अभ्यासू वक्ते उदय निरगुडकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन

तभा वृत्तसेवा
अंबाजोगाई दि.२१ ऑक्टोबर

येथील साहित्य निकेतन ग्रंथालय, अंबाजोगाई यांच्या वतीने प्रसिद्ध पत्रकार तथा अभ्यासू वक्ते उदय निरगुडकर यांच्या व्याख्यानाचे व जागतिक किर्तीचे पखवाज वादक उध्दवराव बापू आपेगांवकर यांच्या मंगलमय पखवाज वादनाचे आयोजन मंगळवार, दिनांक २२ ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. अशी माहिती देवून या कार्यक्रमास अंबाजोगाई शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन साहित्य निकेतन ग्रंथालय, अंबाजोगाई यांच्या वतीने करण्यात आले आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेले अंबाजोगाईतील वैभवशाली ग्रंथालय साहित्य निकेतनने नुकतेच ८० व्या वर्षांत पदार्पण केले आहे. त्यानिमित्त समाजामध्ये पुस्तक प्रेम वृद्धिंगत व्हावे, समाजातील सांस्कृतिक व चिंतनशील विचारांची देवाण - घेवाण वाढावी या हेतूने साहित्य निकेतन ग्रंथालय आपल्या परीने विशेष प्रयत्न करीत आहे. अशाच एक प्रयत्नांतून यावर्षी ऑगस्ट महिन्यात गीत रामायणाचे रचयिते व प्रख्यात साहित्यिक, कवी, गीतकार ग.दि.माडगूळकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेली रसाळ कृष्ण कथा गीत गोपालचा संगीतमय कार्यक्रम आयोजित केला होता. त्याला अंबानगरीतील सुजाण नागरिक, रसिक श्रोत्यांनी भरभरून प्रतिसाद दिला होता. पुन्हा एकदा असाच एक वेगळा विषय घेऊन येत्या मंगळवारी, दिनांक २२ ऑक्टोबर २०२४ रोजी आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह, अंबाजोगाई येथे दुपारी ४ वाजता जागतिक किर्तीचे पखवाज वादक उध्दवराव बापू आपेगांवकर यांचे मंगलमय पखवाज वादन सादर होणार आहे. त्यानंतर नामवंत पत्रकार व चिंतनशील अभ्यासू वक्ते उदय निरगुडकर यांचे 'विकसित भारतातील महाराष्ट्राचे योगदान' या विषयावरील व्याख्यान होणार आहे. उदय निरगुडकर यांनी मागील दोन दशकांहून अधिक काळ शिक्षण, पायाभूत सुविधा, व्यवस्थापन कौशल्य, आर्थिक क्षेत्र, आयटी उद्योग तसेच न्यूज मिडीया अशा अनेक ठिकाणी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्वाच्या पदांवर कार्य केले आहे. त्यांचा अनुभव व त्यातून त्यांनी केलेले चिंतन ऐकण्यासाठी आपण व आपले सर्व सहकारी यांनी व्याख्यानासाठी आवर्जून उपस्थित रहावे असे आग्रहाचे आमंत्रण व आवाहन साहित्य निकेतन ग्रंथालय, अंबाजोगाई यांच्या वतीने करण्यात आले आहे.

परळीतील धोंड परिवाराच्या अंगणात उमलले दुर्मिळ हळदीचे फुल

तभा वृत्तसेवा
परळी वैद्यनाथ दि.२१ ऑक्टोबर

हळद ही एक धार्मिक व आरोग्यावर अत्यंत गुणकारी वनस्पती आहे.अशा ह्या गुणकारी असलेल्या वनस्पती ला अपवादानेच फुल आल्याचे पहावयास मिळते.परंतु येथील अंबेवेस भागातील सौ.किर्ती किरण धोंड यांच्या घरी हळदीच्या झाडाला फुल आले असुन हे पाहण्यास अनेक जण भेट देत आहेत. हळदीचा वापर रोजच्या आहारात, औषधात, सौंदर्य प्रसाधनात,जैविक किटकनाशकात व पुजेत करण्यात येतो.हळद हे कंदवर्गीय असल्याने यास फुलोरा व परागीकरण याचा संबंध नसल्याने हळद या झाडाचा इतरांसारखा संबंध येत नाही. मात्र अनेकानेक वर्षा मधे एखाद्या वेळेस अतिशय अपवादात्मक परिस्थितीत हळदीच्या एखाद्याच झाडाला फुल पहावयास मिळते.अशातच सौ.किर्ती धोंड यांच्या घरी दीड वर्षा पुर्वी लावलेल्या हळदीच्या झाडाला फुल आलेले आहे.

झाडाच्या बुंध्यापासुन निघालेले साधारण:८ते१० ईच उंचीचे वरुण पांढर्या रंगाचे हे फुल उमलताना दिसते.हिंदु पौराणिक कथांनुसार हे हळदीचे फुल उमलणे हे अतिशय शुभ सकल परिसरात सकारात्मक उर्जा निर्माण करणारे व यशस्वितेचे प्रतिक मानले जाते.पौराणिक इतिहासातील नोंदीनुसार ज्या राज्यांची सेना युध्दावर गेली असेल त्या राज्यात जर हळदीचे फुल उमलले तर त्याला युध्द विजयाचे शुभ संकेती लक्षण म्हणून संबोधल्याच्या नोंदी आहेत.

जिवाचीवाडीमध्ये मताचे विभाजन होणार-भागवत चौरे

तभा वृत्तसेवा
केज दि.२१ ऑक्टोबर

केज तालुक्यातील जीवाचीवाडी हे गाव पंकजाताई मुंडे यांचे प्राबल्य असलेले गाव अर्थातच भाजपाच्या मागे खंबीरपणे उभे राहीलेले गाव परंतु या होणाऱ्या विधान सभा निवडणुकीत मात्र वेगळे चित्र पाहायला मिळत आहे. जरी वंजारा मतदान असले तरी यावेळी मोठ्या प्रमाणात मत विभागणी होईल असे येथील कार्यकर्ते भगवान दादा चौरे यांनी मत मांडले आहे.

याविषयी सविस्तर वृत्त असे की यावेळी मताच्या विभागनीचे कारण म्हणजे विद्यमान आमदाराचे शेतकरी वर्गाच्या योजनेकडे असलेले दुर्लक्ष तसेच विधान सभेच्या पार्श्वभूमीवर जिवाचीवाडी ता.केज येथील गाव गाड्यातील सामान्य माणसं स्व. कै. गोपीनाथराव मुंडे साहेबापासून ते आज पंकजाताई मुंडे धनंजय मुंडे साहेब असतील यांच्या बाजूने असलेले गाव पण स्थानिक प्रतिनिधीना वैतागले आहेत. अनेक आडचणी असतात पण त्यातल्या काही आपण दैनंदिन जीवनात पूर्ण करू शकतो. राज्यघटनेच्या रूपाने लोकशाही आली आणि नंतर आज राजकारण उदयाला आले त्यातून जन माणसांचे प्रश्न सोडविण्यासाठी लोकप्रतिनिधी तयार केले पण असे असले तरी कष्टकरी गरीब लोकांच्या प्रश्नांना वाच्या फुटली का ? केज सारख्या विधान सभेला विध्यमान आमदार कामे आणतात पण कामे दर्जेदार होत नाहीत, काही दिवस राहते नंतर लुप्त पावते मग कामाच्या रूपातून ते स्वत:चे पोट भरतात की गुतेदाराचे हाच प्रश्न ? जिवाचीवाडी येथील रस्ता असेल राणूबाईचीवाडी, तुकूचीवाडी येथील रस्ते उकरून ठेवले आहेत. पण बोलायचं कोणी?

आनुदानासारखा विषय असेल जो सामान्य माणसाच्या पदरात पडला नाही त्या बदल आमदार ताई बोलायला तयार नाही. मग प्रश्न का पडतात हे आमच्या सारख्या सामान्य नागरिकाच्या पोरांनी लक्ष्यात आणून द्यावे लागतात. आता केज तालुक्यातून विद्यमान आमदार शेतकरी वर्गाला नकोशा झाल्या आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात मत विभागणी होवून विद्यामान आमदारांचा दारुण पराभव होऊ शकतो म्हणून जनता वैतागलेल्या त्याच त्या पाणचट कार्यकर्त्यांना हाकलून नविन चेहर्याना संधी द्यावी अन्यथा पराभव निश्चित असे परखड मत भगवान चौरे यांनी मांडले आहे.

परळी नगर पालिकेने वसूल केलेल्या अनधिकृत १ टक्का कराच्या पावत्या, झेरॉक्स नागरिकांनी संपर्क कार्यालयात जमा करा : राजेभाऊ फड

तभा वृत्तसेवा
परळी वैद्यनाथ दि.२१ ऑक्टोबर

परळी नगर पालिकेकडून अतिरिक्त शुल्क आकारण्यात येत असल्याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे युवा नेते राजेभाऊ फड यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल केली आहे. परळी नगर पालिकेने जनतेची गैर कायदेशीर मार्गाने जवळपास १०० कोटी रुपयांची फसवणूक केली आहे. वास्तविक पाहता अशा स्वरूपाचा कर घेण्याबाबत कुठलेही आदेश नाहीत किंवा कुठलाही शासन आदेश नाही. मालमत्ता करासाठी शासन नियमानुसार भरलेल्या पैशांपेक्षा एक टक्का अतिरिक्त शुल्क नगर पालिकेकडून वसूल केले जात आहेत. हा प्रकार नियमबाह्य असून, हेच पैसे जनतेला परत करा व यापुढे असा कर वसूल केला जाऊ नये अशी मागणी याचिकेद्वारे करण्यात आली आहे. यासंदर्भात न्यायालयीन लढाई सुरू असून, मागील पाच वर्षांत याची झळ सोसलेल्या नागरिकांनी कर भरलेल्या पावत्या संपर्क कार्यालयात आणून द्याव्यात असे आवाहन त्यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,परळी वैजनाथ नगरपरिषद परळी वैजनाथ या कार्यालयात मालमत्तेची नोंदणी करण्यासाठी नाव नोंदणी अर्ज दाखल केल्या नंतर सदरील मालमत्तेच्या नावाची नोंदणी प्रमाणपत्र देते वेळी अनाधिकृतपणे कर आकाराला जातो व शहरातील नागरिकांवर त्याचा विनाकारण भुर्दंड पडतो. अशा प्रकारचा कर आकारण्याची कोणतीही तरतूद नगरपरिषद कायद्यामध्ये, नियमा मध्ये व शासन निर्णयामध्ये नसतानाही सामान्य नागरिकांना वेठीस धरून अशा प्रकारची कर वसुली परळी नगरपरिषद कार्यालयामार्फत केली जाते अन्यथा त्यांच्या मालमत्तेची नोंद नगरपरिषद कार्यालयामध्ये घेतली जात नाही. नाइलाजास्तव परळी शहरातील नागरिकांना इच्छा नसतानाही कर भरावा लागतो. सदरील काराबद्दल राजेभाऊ श्रीराम फड यांनी वेळोवेळी मुख्य अधिकारी परळी नगरपरिषद परळी वैजनाथ यांच्याकडे लेखी अर्ज देऊन सदरील कराबद्दलची माहिती मागितली असता त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली शेवटी दिनांक २४/०६/२०२४ रोजी केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये सदरील काराबद्दल माहिती मिळवण्यासाठी अर्ज दाखल केला असता मुख्य अधिकारी परळी नगरपरिषद यांनी सदरील कराबाबत माहिती दिली नाही व वर्षानुवर्षे अशा प्रकारचें अनाधिकृतपणे कर वसुली करत आहेत. याबाबत उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात न्यायालयीन लढाई सुरू आहे. नगर पालिकेने अनधिकृतपणे वसूल केलेल्या कराची रक्कम नागरिकांना तत्काळ परत करावी व यापुढे हा प्रकार थांबवावा अशी मागणी राजेभाऊ फड यांनी केली आहे. तर मागील पाच वर्षांत नागरिकांना याची मोठ्या प्रमाणावर झळ बसली आहे. अनधिकृत एक टक्का वाढीव भरावा लागलेल्या नागरिकांनी कर भरलेल्या पावत्या असतील तर त्या आमच्या संपर्क कार्यालयात जमा कराव्यात असे आवाहन केले आहे.

शेतकरी मित्र राजेंद्र मस्केंनी घेतली मनोज जरांगे पाटलांची भेट

तभा वृत्तसेवा
बीड दि.२१ ऑक्टोबर

शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी भारतीय जनता पार्टी जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यानंतर आज प्रथमच संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांची अंतर्वली सराटी येथे भेट घेतली.लोकसभा निवडणुकीत जिल्हाध्यक्ष पदाची धुरा संभाळत सामाजिक प्रतीकुल परिस्थितीत प्रचार यंत्रणा उभी केली.

भाजपाचा निसटता पराभव झाल्या नंतर पराभवाचे खापर मराठा समाजावर फोडून राजेंद्र मस्के यांच्या कामावर संशय व्यक्त केला. अखेर काल राजेंद्र मस्के यांनी समर्थक व कार्यकर्त्यांची बैठक घेऊन भारतीय जनता पार्टीचा त्याग करून जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला. २०१९ पासून बीड विधानसभेची निवडणूक लढवण्यासाठी राजेंद्र मस्के तयारी करत आहेत.आगामी बीड विधानसभा निवडणुकीत उमेदवारी मिळावी यासाठी पक्ष नेतृत्वाकडे मागणी केली होती. परंतु प्रतिसाद नसल्याने अपक्ष निवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली. यापूर्वी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्याकडे उमेदवारीची मागणी केलेली आहे. पक्षाचा राजीनामा दिल्यानंतर प्रथमच जरांगे पाटलांची सदिच्छा भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

दीनदयाळ नागरी सहकारी बँक म., अंबाजोगाई
DNS Bank Ltd. Ambajogai

ताबा सुचना

प्रति
(१) श्री. मुंडे सुदाम एकनाथ (कर्जदार)
पत्ता:- मुंडे हॉस्पीटल, बस स्टँड समोर, परळी-वैजनाथ, जि. बीड ४३१ ५१५
(२) श्री. अंगद तात्याराव केंद्रे
पत्ता:- शास्त्री नगर, परळी वैजनाथ, जि. बीड ४३१ ५१५
(३) श्री. सरस्वती सुदाम मुंडे
पत्ता:- मुंडे हॉस्पीटल, बस स्टँड समोर, परळी-वैजनाथ, जि. बीड ४३१ ५१५
विषय:-वित्तीय मालमत्तेच्या सुरक्षितीकरण आणि पुनर्निर्माण आणि सुरक्षा अधिकार अंमलबजावणी ॲक्ट२००२ (२ रा) च्या सेक्शन १३ (४) नुसार ताबा सुचना
संदर्भ: बँकेची डिमांड नोटीस क्र. SARFAESI/04/TL-183/60/2024-25 दिनांक १६.०८.२०२४अन्वये.
महोदय,
उपरोक्त संदर्भीय डिमांड नोटीस दिनांक १६.०८.२०२४ नुसार मी खालील सही करणार आपणास सुचित करीत आहे की ६० दिवसाची मुदत पुर्ण होवुन व वेळोवेळी आपणास थकीत कर्ज भरण्याची मुदत देवुन सुधा थकीत कर्ज रक्कम जमा न केल्यामुळे खालील प्रमाणे वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा कलम १३(४) अंतर्गत ताबा घेण्यात येईल.
करीता आपणास कळविण्यात येते की, दिनांक २१.११.२०२४ रोजी दुपारी ०१.०० वाजता (३० दिवसांच्या आत) किंवा त्यानंतर बँकेच्या वेळेनुसार केव्हाही आपल्या स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्यासाठी येत आहे. स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्यास व पंचनामा तसेच इंव्हेन्टरी तयार करतांना सहकार्य करावे.
तसेच आपणास कळविण्यात येते की, वरील कार्यवाही करतांना आपण अथवा इतर कोणीही कुठल्याही प्रकारे कार्यवाही मध्ये अडथळे निर्माण केल्यास अथवा कार्यवाही थांबविण्याचा प्रयत्न केल्यास सदर्दु वर्तन हे फौजदारी कार्यवाहीस पात्र राहील. कृपया नोंद घ्यावी.
परिशिष्ठ:- मालमत्तेचे वर्णन
(मालमत्ता मालकाचे नाव- सुदाम एकनाथराव मुंडे) मौजे परळी-वैजनाथ, ता. परळी वैजनाथ, जि. बीड येथील बस स्टेंड समोर नगर पालीका घर क्र.१३/१, ६३४/१ ज्याचा सी.टी.एस.क्र.६७७ वार्ड क्र. ०६ क्षेत्रफळ ८० फु X ६० फु. व त्यावरील बांधकामासह त्यांच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे
पुर्व:- गजानन लॉज ची जागा
पश्चिम:- परळी-अंबाजोगाई राज्य रस्ता
दक्षिण:- परमार कॉलनी ची जागा
उत्तर:- कावेरी प्लॉझा रोड
(वरील मालमत्ता जशी आहे तशी आहे त्या स्थितीत)
अधिकृत अधिकारी

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

भाजपकडून उमेदवारी जाहीर होताच आ. मुटकुळे विघ्नहर्ता चिंतामणीच्या दर्शनाला

पुन्हा एकवेळा जनसेवेची संधी देण्यासाठी जलेश्वर, संत नामदेवांना घातले साकडे

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २१ आक्टोबर

रविवारी भाजपच्या पहिल्याच यादीत आ. तान्हाजीराव मुटकुळे यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली. उमेदवारी जाहीर झाल्यानंतर आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी सोमवारी सकाळी येथील श्री विघ्नहर्ता चिंतामणीचे दर्शन घेतले तसेच प्राचीन जलेश्वर मंदिरातील महादेवाला अभिषेक करून पुन्हा एकदा जनसेवा करण्याची संधी देण्यासाठी साकडे घातले.

रविवारी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांना हिंगोली विधानसभा मतदारसंघातून तिसऱ्यांदा संधी मिळाली आहे. यानंतर भाजपच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी येथील गांधी चौकात फटाक्यांची आतिषबाजी करीत मिठाई वाटप करून आनंदोत्सव साजरा केला. यावेळी माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांनी बोलतांना सांगितले की, आ. मुटकुळे यांनी नगर परिषदेच्या माध्यमातून शहरात २५० कोटींची विकास कामे केली आहेत. शहराचा चेहरा मोहरा बदलून टाकला आहे. तसेच चार मोठी सभागृह त्यांच्याच काळात झाली आहेत. याशिवाय ग्रामीण भागात रस्ते, सिंचन, पाणी आणि वीजेची कामे केली आहेत. मागील दहा वर्षाचा काळात सतत लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी काम केले आहे. त्यांच्या कामांची पावती यावेळी मतदारसंघातील जनता त्यांना निश्चित देणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सोमवारी सकाळी येथील नवसाला पावणारा श्री विघ्नहर्ता चिंतामणी गणपतीचे दर्शन तसेच प्राचीन जलेश्वर मंदिरातील महादेवाला अभिषेक करण्यात आला. यावेळी त्यांनी पुन्हा एकदा जनसेवा करण्याची संधी देण्यासाठी देवाला साकडे घातले.

यावेळी माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर. जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, कैलास काबरा, प्रशांत सोनी, बळीराम मुटकुळे, बाबा घुगे, सखाराम मुटकुळे, उमेश गुठ्ठे, शाम खंडेलवाल, भानुदास वाबळे, मनोज शर्मा, अग्रवाल, कैलास शहाणे, संतोष टेकाळे, युवाजिल्हाध्यक्ष पप्पू चव्हाण, आशिष जैस्वाल, हमीद प्यारेवाले आदींची उपस्थिती होती. त्यानंतर नर्सी येथील संत नामदेव महाराजांच्या मंदिरात संत नामदेव महाराजांचे तसेच विठ्ठल-रूख्मीणीचे आशिर्वाद घेण्यासाठी तसेच पुन्हा एकवेळा जनसेवेची संधी देण्यासाठी साकडे घातले. यावेळी ॲड के के शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, कैलाशंचद्र काबरा, प्रशांत सोनी, माणिक लोडे, नारायण खेडकर, हिम्मत राठोड, कैलास शहाणे, पृथ्वी मुटकुळे, सचिन शिंदे, संतोष टेकाळे यांची उपस्थिती होती.

उपविभागीय अधिकाऱ्यांकडून पाहणी

आजपासून नामनिर्देशन पत्र स्वीकारणार

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २१ आक्टोबर

हिंगोली विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी दि २२ आक्टोबरपासून उमेदवारांकडून नामनिर्देशन पत्र दाखल करण्यास सुरूवात होणार आहे. यानिमित्त येथील उपविभागीय कार्यालयात विविध समित्यांची कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. या कक्षाची पाहणी उपविभागीय अधिकारी तथा निवडणुक निर्णय अधिकारी समाधान घुटुकडे यांनी केली.

हिंगोली विधानसभा सार्वत्रिक निवडणुकांसाठी आजपासून नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात येणार आहेत. यासाठी येथील उपविभागीय कार्यालयात विविध कक्ष स्थापन करण्यात आले आहेत तसेच परिसरात मतदान जनजागृती करण्यासाठी विविध फलक लावण्यात आले आहेत. उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, तहसीलदार श्रीकांत भूजबळ, मुख्याधिकारी अरविंद मुंढे, पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर यांनी सोमवारी परिसराची पाहणी केली तसेच निवडणुक कामानिमित्त चोख पोलिस बंदोबस्त लावण्यात आला असून कार्यालयात विविध विभागातील कक्षाची पाहणी देखील घुटुकडे यांनी केली. यावेळी निवडणुक कामावरील अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

कुरूंद्याजवळ पोलिस व्हॅन उलटली, दोन अधिकाऱ्यांसह कर्मचारी जखमी

तभा वृत्तसेवा
वसमत, २१ आक्टोबर

कुरूंदा ते उमरा मार्गावर नेहरूनगर शिवारात पोलिस व्हॅन उलटून झालेल्या अपघातात दोन अधिकारी व एक चालक कर्मचारी जखमी झाल्याची घटना दि २१ आक्टोबर रोजी सकाळी साडे सहा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. जखमी अधिकाऱ्यांवर उपचार करून घरी पाठविण्यात आल्याचे पोलिस सुत्रांनी सांगितले.

हिंगोली येथील पोलिस अधीक्षक कार्यालयाच्या परिसरात आज सकाळी पोलिस स्मृती दिनानिमित्त हुतात्मा पोलिस अधिकारी व अंमलदार व जवानांना श्रध्दांजली अर्पण करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास जिल्हाभरातील पोलिस अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार कुरूंदा पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक रामदास निरदोडे, वसमत पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक विशाल भोसले एकाच वाहनातून आज सकाळीच हिंगोलीकडे निघाले होते. कुरूंदा येथून उमरा मार्गे ते हिंगोली येथे येत होते. यावेळी कुरूंदापासून सुमारे सात ते आठ किमी अंतरावर त्यांचे वाहन आले असतांना वाहनाचे पाठीमागील टायर अचानक फुटले. त्यामुळे चालक सतीश ढेपे यांचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने वाहन रस्त्याच्या खाली जाऊन उलटले. या अपघातात सपोनि निरदोडे व सपोनि भोसले, चालक ढेपे जखमी झाले.

या अपघाताची माहीती मिळताच कुरूंदा पोलिस ठाण्याचे जमादार बालाजी जोगदंड, चालक ढेपे यांच्यासह पोलिसांच्या पथकाने तातडीने घटनास्थही धाव घेतली. पोलिसांनी जखमी अधिकारी व कर्मचाऱ्यांना तातडीने वाहनाच्या बाहेर काढून उपचारासाठी रूग्णालयात दाखल केले. त्यांच्यावर प्राथमिक उपचार करून घरी पाठविण्यात आल्याचे पोलिस विभागाच्या सुत्रांनी सांगितले.

हिंगोली- आजपासून ९४- हिंगोली विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी नामनिर्देशन प्रक्रिया सुरू होणार आहे. यानिमित्त जिल्हाधिकारी अभिनव गोयन यांनी येथील उपविभागीय कार्यालयाला भेट देत विविध कक्ष समितीची पाहणी केली. यावेळी उपजिल्हाधिकारी रामेश्वर रोडगे, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार श्रीकांत भूजबळ, मुख्याधिकारी अरविंद मुंढे आदी. छाया- विजय गुंडेकर

संक्षिप्त वृत्त

मतदार जनजागृतीसाठी स्वीप समितीचा प्लॅन तयार

हिंगोली- मतदान प्रक्रियेमध्ये मतदारांचा जागरूकपणे सहभाग वाढावा यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. येत्या २० नोव्हेंबर, २०२४ ला होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकांमध्ये मतदारांनी उस्फूर्तपणे मतदान करावे. यासाठी मतदार जनजागृती करण्यासंदर्भात जिल्हाभरात विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच अनुषंगाने जिल्हा स्वीप नोडल अधिकारी संदीप कुमार सोनटक्के आणि प्रशांत डिग्रसकर यांच्या नेतृत्वात जिल्हा स्वीप प्लॅन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. यावेळी अपर जिल्हाधिकारी खुशालसिंह परदेशी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी रामेश्वर रोडगे आदी उपस्थित होते. स्वीप प्लॅन तयार करण्यासाठी स्वीपचे जिल्हा समिती सदस्य विजय बांगर, बालाजी काळे, दीपक कोकरे आणि हनुमान गिराम यांनी काम केले.

प्रियकराविरूध्द कळमनुरी ठाण्यात गुन्हा दाखल

हिंगोली- लग्नाचे आमिष दाखवून वारंवार अत्याचार करणाऱ्या प्रियकराविरूध्द कळमनुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डिग्गी येथील भुजंग उर्फ नट्या धबाले यांचे एका ३८ वर्षीय महिलेसोबत प्रेमसंबंध जुळले. यावेळी त्याने महिलेस लग्नाचे आमिष दाखविले. त्यानंतर महिलेस पुणे येथे पळवून नेले. याप्रकरणी महिलेच्या पतीने कळमनुरी पोलिस ठाण्यात ऑगस्ट २०२४ मध्ये पत्नी बेपत्ता असल्याची तक्रार अर्ज दिला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून पोनि मोहन भोसले, उपनिरीक्षक इंगळे, जमादार प्रशांत शिंदे, कैलास सातव यांच्या पथकाने दोघांना पुणे येथून ताब्यात घेवून कळमनुरी येथे आणले होते. त्यावेळी भुजंग याने त्या महिलेसोबत लग्न करण्याचे कबुल केले. त्यामुळे याप्रकरणात गुन्हा दाखल झाला नाही. मात्र लग्नाचे आमिष दाखवून त्याने महिलेसोबत लग्न केले नाही. महिलेने लग्न कधी करायचे याची विचारणा त्या महिलेकडून होत होती. मात्र भुजंग त्यासाठी टाळाटाळ करीत होता. त्यामुळे आपली फसवणुक झाल्याचे लक्षात येताच महिलेने रविवारी रात्री कळमनुरी पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. यामध्ये भुजंग याने लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केल्याचे नमुद केले. यावरून पोलिसांनी भुजंग धबाले याच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. पोनि मोहन भोसले, उपनि इंगळे पुढील तपास करीत आहेत. या प्रकरणात गुन्हा दाखल होताच भुजंग फरार झाला असून त्याच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आली आहेत.

२ लाख ४६ हजारांचा अवैध दारू साठा जप्त

हिंगोली- विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हिंगोली पोलिस दला ॲक्शन मोडवर आले पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, स्थागुशाचे पोनि विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या विशेष पथकाने जिल्ह्यात तब्बल २५ ठिकाणी अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर छापा मारला असून २ लाख ४६ हजार ८३० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी आरोपीतांविरूध्द दारूबंदी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शिक्षण विभागातील लिपीकास दहा हजारांची लाच घेतांना रंगेहाथ पकडले

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २१ आक्टोबर

जिल्ह्यातील एका टाईपिंग इन्स्टिट्युटला संगणक मान्यता देण्यासाठी तसेच तपासणीसाठी प्रस्ताव दाखल करण्यासाठी १० हजारांची लाच घेतांना माध्यमिक शिक्षण विभागातील प्रतिनियुक्तीवरील लिपीक गजानन पळसकर यास सोमवारी दि २१ आक्टोबर रोजी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. याप्रकरणी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

हिंगोली जिल्ह्यातील एका टाईपिंग इन्स्टिट्युटला संगणक मान्यता देण्यासाठी नुतनीकरणासाठी माध्यमिक शिक्षण विभागाकडे प्रस्ताव सादर करावा लागतो. त्यानंतर सदर प्रस्ताव अधिकाऱ्यांकडे पाठवून त्यानंतर अधिकारी प्रत्यक्ष इन्स्टिट्युटच्या कार्यालयास भेट देऊल पाहणी करतात. त्यानुसार प्रस्ताव मान्यतेसाठी वरिष्ठ कार्यालयात पाठविला जातो.

दरम्यान, यासंदर्भात एका इस्टिट्यूट चालकाने शिक्षण विभागाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव दाखल केला होता. सदर प्रस्तावाबाबत कुठल्याच प्रकाराची कार्यवाही झाली नसल्याने संबंधिताने शिक्षण विभागात प्रतिनियुक्तीवर असलेल्या गजानन पळसकर यांच्याशी संपर्क साधला. त्याने १० हजार रूपयांच्या लाचेची मागणी केली. त्यानंतर तक्रारदाराने लाचलूचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून तक्रार दाखल केली. लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने तक्रारीची पडताळणी केल्यानंतर सोमवार दि २१ आक्टोबर रोजी लाचलूचपतचे उपाधिक्षक विकास घनवट, पोनि प्रफुल्ल अंकुशकर, विनायक जाधव, जमादार तान्हाजी मुंडे, ज्ञानेश्वर पंचलिंगे, राजाराम फुफाटे,रवींद्र वर्णे, गजानन पवार, भगवान मंडलीक, गोविंद शिंदे यांच्या पथकाने दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास शिक्षण विभागाच्या परिसरात सापळा रचला होता. यावेळी तक्रारदाराकडून १० हजारांची लाच घेतांना पळसकर यास रंगेहाथ पकडण्यात आले. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

हिंगोलीत पोलिस दलाच्यावतीने स्मृती दिनाचे आयोजन

तभा वृत्तसेवा
हिंगोली, २१ आक्टोबर

पोलिस दलातील अधिकारी, अंमलदार यांना कर्तव्य बजावीत असतांना वीर मरण प्राप्त झाले अशा सर्व शहीदांना श्रध्दांजली देण्यासाठी दि २१ आक्टोबर रोजी संत नामदेव पोलिस कवायत मैदानात पोलिस दलाच्यावतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी अभिनव गोयल, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, समादेशक पोर्णिमा गायकवाड, उपविभागीय पोलिस अधिकारी शालीनी नाईक, उपविभागीय पोलिस अधिकारी सुरेश दळवे, अंबादास भुसारे, पोलिस निरीक्षक यांची उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी गोयल यांनी हुतात्म्यांना पुष्पचक्र अर्पण करून श्रध्दांजली वाहीली.

२१ आक्टोबर हा दिवस संपूर्ण देशभर पोलिस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात येतो. पोलीसांना कायदा व सुव्यवस्थेसोबतच देशाला धोका पोहचविणारे अतिरेकी, दहशतवादी, समाज विघातक कृत्य करणारे गुंड व समाजद्रोही लोकांचा सामना करावा लागतो. त्यामध्ये वीर मरण प्राप्त झालेल्या पोलिस अधिकारी, अंमलदार यांना श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी स्मृती दिनाचे आयोजन करण्यात येते.

शिवसेनेचे आ. संतोष बांगर यांच्यावर आचारसंहिता भंगाचा गुन्हा दाखल

तभा वृत्तसेवा
कळमनुरी, २१ आक्टोबर

कळमनुरी येथील एका कार्यक्रमात शिवसेना शिंदे गटाचे आ. संतोष बांगर यांनी मतदारांना वाहनाने घेऊन या, त्यांना काय लागेल ते फोन पे करा असे वक्तव्य केल्याप्रकरणी आ. बांगर यांचेवर कळमनुरी पोलिस ठाण्यात आचारसंहिता भंगाचा गुन्हा दि २० आक्टोबर रोजी सायंकाळी दाखल करण्यात आला आहे.

कळमनुरी येथील तोष्णीवाल मंगल कार्यालयात दि १८ आक्टोबर रोजी कार्यकर्त्यांच्या बैठकीत जाहीर कार्यक्रमात आ. संतोष बांगर यांनी मतदार संघात जास्तीत जास्त मतदान होण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावेत असे आवाहन केले. याशिवाय बाहेरगावी असलेल्या मतदारांच्या याद्या तीन दिवसांत सादर कराव्यात तसेच त्यांना संपर्क साधून त्यांना मतदानासाठी मिळेल ते वाहन घेऊन येण्याबाबत कळवावे. त्यासाठी त्यांना फोन पे वगैरे करा असे वक्तव्य केले होते.

या वक्तव्याविरोधात शिवसेना ठाकरे गटाचे आंबादास दानवे, हिंगोली जिल्हा प्रमुख गोपू पाटील, अजित मगर यांनी आक्षेप घेत आचारसंहिता भंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. याप्रकरणात आदर्श आचारसंहिता पथकाने सविस्तर अहवाल सादर केला होता. त्यानंतर याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे आदेश निवडणुक निर्णय अधिकारी भूते यांनी कळमनुरीचे गटविकास अधिकारी गणेश बोथीकर यांना दिले होते. त्यानुसार बोथीकर यांनी दि २० आक्टोबर रोजी सायंकाळी कळमनुरी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. यामध्ये कळमनुरी विधानसभा मतदार संघातील व्यक्तींना त्यांचा निवडणुक विषयक हक्क वापरण्यासाठी व्यक्तीला प्रवृत्त करण्याचा तसेच मतदारसंघातील व्यक्तींना बक्षीस देण्याचे हेतूने लाच देण्याचे कबुल करून ती मिळवून देण्याची तयारी दर्शविली व तसा प्रयत्न केल्याचे दिसून येत असल्याचे तक्रारीत नमुद केले आहे. पुढील तपास पोनि मोहन भोसले करीत आहेत.

जिल्हास्तरीय ज्यूनिअर तलवारबाजी स्पर्धा आणि निवड चाचणीचे आयोजन



तभा वृत्तसेवा
हिंगोली, २१ आक्टोबर

महाराष्ट्र फेन्सिंग असोसिएशन यांच्या मान्यतेने छत्रपती संभाजीनगर जिल्हा फेन्सिंग असोसिएशन यांच्या वतीने जिल्हा क्रीडा संकुल गारखेडा, छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी दिनांक २६ ते २८ सप्टेंबर २०२४ या दरम्यान ३२ वी महाराष्ट्र राज्य ज्युनिअर फेन्सिंग स्पर्धा होणार आहे या स्पर्धेमध्ये हिंगोली जिल्ह्याचा मुलं व मुलींचा संघ यामध्ये सहभागी होणार आहे या स्पर्धेत खेळाडू सहभागी होण्यासाठी खेळाडूची जन्मतारीख ०१.०१.२००५ नंतरची व ३१.१०.२०११ अगोदरची असावी. ही स्पर्धा व निवड चाचणी दिनांक २२ ऑक्टोबर २०२४ रोजी स्मार्ट फेन्सिंग स्पोर्ट्स क्लब एस.आर.पी.एफ कॅम्प समोर हनुमान नगर हिंगोली या ठिकाणी होणार असून आपण ठीक सायंकाळी ४:०० वाजता खेळाच्या गणवेशांमध्ये (पांढरा पोशाख) हजर राहावे.

या संघाच्या निवड समिती सदस्य म्हणून श्री संदीप वाघ श्री प्रा. नरेंद्र रायलवार, श्री इरवंत बत्तलवाडीकर हे राहणार असून हिंगोली जिल्हा फेन्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष श्री. कल्याण देशमुख, उपाध्यक्ष आनंद भट्ट कोषाध्यक्ष श्री.विजय जऊळकर संघटनेचे सचिव श्री संजय भुमरे यांनी खेळाडूंना निवड चाचणी स्पर्धेसाठी येण्याचे आवाहन केले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

आ.लोणीकरांच्या विजयाचे मास्टरमाईंड राहुलनिती लोणीकरांच्या हालचालीवर विरोधकांच्या नजरा!

सुरेश जेथलिया यांची क्रेझ मात्र इच्छुकांची गर्दी; वेळेवर विलीणीकर जेथलियांना महागात पडणार?

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

नुकत्याच भारतीय जनता पक्षाच्या वतीने विधानसभेच्या निवडणुकीसाठी अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे त्यात परतुर - मंठा तालुक्यातील आ.बबणराव लोणीकर यांना भाजपने सातव्यांदा संधी दिली. आ बबणराव लोणीकर यांचा परतुर - मंठा विधानसभा मतदारसंघात दांडगा संपर्क, अनुभव आहे. मतदारसंघातील विकासकांमात भरभराटी त्यांनी आणली वाडी वस्तीवर रस्त्यांचे जाळे निर्माण केले. मतदारसंघात विजेच्या समस्यांचे निराकरण केले. त्याच बरोबरीने मतदारसंघात पाणीपुरवठा करणे साठी मराठवाडा वाटर ग्रीड योजना सुरू करुण मतदार संघातील अनेक गावे दुष्काळमुक्त केले असे अनेक विविध प्रकारची विकास कामे पूर्ण करत त्यांनी यावेळी सामान्य माणसापर्यंत आपली पकड मजबूत केली आहे. मात्र राज्यातील सध्याचे मराठा आरक्षण आणि ओबिसी आरक्षण मुद्दयावर मोठ्या प्रमाणावर राजकारण केले जात आहे याचे पडसाद परतुर - मंठा विधानसभा मतदारसंघातील विधानसभा निवडणुकीत उमटतील यामुळे सध्यातरी नेमंक कोणाला बहुमत मिळेल सांगता येणार नाही.

गेल्या पंचवार्षिक विधानसभा निवडणुकीत आमदार राहुल लोणीकर यांनी निवडणूकांच्या तोंडावर आपले संघटणात्मक समर्पण, संघटण, कौशल्य आपल्या तुल्यबळाचा वापर करत पिता आ. बबणराव लोणीकर यांना बहुमतांनी विजयी करण्यात आणि राहुल लोणीकर नावाचा फॅक्टर चालला होता. याचा मोठा बोलबाला यावेळी मतदारसंघात जनसामान्य मानसांकडुण बोलते जात होते. तसेच यावेळी सुद्धा राहुल लोणीकर ऐण वेळी कोणती राजकीय खेळी असेल त्यामुळे याही विधानसभा निवडणुकीत विरोधी पक्षातील राजकीय पुढारी राहुल लोणीकर यांच्या हालचालीवर लक्ष ठेवून आहेत अशी चर्चा सुरू आहे.

महाविकास आघाडी कडुण अनेकजण परतुर - मंठा विधानसभेच्या निवडणुकीत ईच्छुक आहेत. मित्र पक्षांकडून कपील आकात, ए.जे.बोराडे, अविनाश चव्हाण, कल्याण बोराडे, सुरेश नाईक राठोड मविआकडून इच्छुक आहेत, यात प्रामुख्याने माजी आमदार सुरेश जेथलिया यांची मतदार संघावर सध्यातरी चांगली पक्कड आहे. समाज माध्यमातुन सुरेश जेथलिया यांच्या नावाने चर्चा चर्चीली जात असली तरीही महाविकास आघाडीतील अनेकजण निवडणुक रिंगणात पक्षाने उमेदवारी जाहीर न केल्यास एकदा चेलो रे चा दंड थोपटत अपक्ष उमेदवार म्हणून निवडणुक रिंगणार उतणार असणार आसल्याचे निश्चीत आहे. तर दुसरीकडे वंचितचे रामप्रसाद थोरात यांना उमेदवारी जाहिर झाली असुन ते मतदारांवर आपला प्रभाव किती प्रमाणात पाडु शकतात हे ही पाहणे महत्वाचे आहे.

जरांगे पाटलांचा आदेश मान्य असेल!

“ मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी रणनिती आखली आहे. त्यात अनेकजण इच्छुक उमेदवार म्हणून मनोज जरांगे यांच्याकडे उमेदवारीची मागणी केली आहे त्यात प्रा. डॉ.पुरुषोत्तम वायाळ, युवा नेते महेश नळगे, प्रा.नामदेवराव वायाळ, प्रा.पांडुरंग नवल यांच्यासह अनेकजण मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली परतुर - मंठा मतदारसंघातुन ईच्छुक म्हणून विधानसभेच्या निवडणुकीत बांशींग बांधून आहेत.

संक्षिप्त

परतीच्या पावसाने खरिपाच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान

तभा वृत्तसेवा
अंबड/प्रतिनिधी

तालुक्यात सतत पडत असलेल्या परतीच्या पावसामुळे खरिपांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सोयाबीन, मकाच्या पिकांमध्ये पाणी साचल्याने पिके पाण्यात आहेत. मजूर वेळेवर मिळाले नसल्याने कपाशी देखील भिजल्याने हाता तोंडाशी आलेला घास निसर्गाच्या लहरीपणाने हिरवला गेल्याने शेतकऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. अंबड तालुक्यात काल रात्री विजांच्या कडकडाटासह वादळी वारा वाहून मुसळधार पाऊस झाला. शेतामध्ये ठिकठिकाणी सोंगणी करून ठेवलेले सोयाबीन पाण्यात भिजल्याने मोठे नुकसान झाले आहे. या पावसाने भिजलेल्या सोयाबीनला कोंब फुटले आहेत. तसेच अनेक शेतकऱ्यांच्या शेतात वेचणीला आलेला कापूस पावसामुळे भिजल्याने वाती झाल्या आहेत. पावसाने कपाशीच्या झाडांना फुटलेला कापूस ओला होऊन जमिनीवर पड़न खराब होत आहे. पावसाने झालेल्या पिकांच्या नुकसानीचे प्रशासनाने पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात येत आहे. अंबड तालुक्यात मागील काही दिवसांपासून परतीच्या या पावसाने धुमाकूळ घातला आहे. या परतीच्या पावसाने शेतीचे आणि पिकांचे मोठे नुकसान झालेच आहे. मात्र पशुधनाचीदेखील या पावसाने तारांबळ सुरू आहे. शेतात असणारी उभी पिके आडवी झाली आहेत. तर काही पिकांवर रोगराईचा प्रादुर्भाव वाढला आहे. या आसमानी संकटामुळे शेतकऱ्याचा हाता तोंडाशी आ-लेला घास परतीच्या पावसाने हिरावला गेला आहे. बळीराजा पुन्हा एकदा संकटात सापडला आहे. प्रशासनानं त्वरित पंचनामे करावे अशी मागणी शेतकरी वर्गात तून होत आहे.

वादळ-वाऱ्याने वीज गूल अंबड तालुक्यात काल रात्री वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसाने तालुक्यात बहुतांश ठिकाणी वीज गूल होण्याचे प्रकार वाढले आहेत. महावितरणकडून विजेच्या पोलजवळ असणारे झाड तोडण्यात आले नसल्याने तसेच मेंटेनन्सची कामे करण्यात आली नसल्याने या विजेच्या तारा तुटल्याने देखील काही भागात वीज प्रवाह खंडित होण्याचे प्रकार वाढले आहेत. तरी जालना जिल्हा महावितरण अधिकारी यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे

माजी आ.सांबरे यांनी मानले जरांगे पाटील यांचे आभार

तभा वृत्तसेवा
अंबड/प्रतिनिधी

आंतरवाली सराटी येथे काल झालेल्या बैठकीत एससी एसटी यांच्या राखीव मतदार संघा उमेदवार देणार नाही या अनुषंगाने मा आमदार संतोष सांबरे यांनी अंतरवाली सराटी येथे जाऊन मनोज पाटील जरांगे यांचे मानले आभार.

विकास कामाचा अजेंडा घेऊन सर्वसामान्य जनतेकडे न्याय मागणार -बबनराव लोणीकर

तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी

परतूर विधानसभा मतदारसंघात शेगाव पंढरपूर दिंडी महामार्ग या सह प्रमुख राज्य मार्ग महामार्ग जिल्हा मार्ग गावा गावाला जोडणारे रस्ते, प्रत्येक रस्त्यावर पूल, गावागावातील तांडे वाड्या वस्त्यावरील पाणंद रस्ते परतुर शहरातील उड्डाणपूल, स्वर्गीय भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वातानुकूलित नाट्यगृह, वंदनीय विश्वरत्न परम पूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह तालुका व जिल्हा सत्र न्यायालयाच्या इमारती, क्रीडा संकुल, गावा गावात २४ तास वीज उपलब्ध होण्यासाठी नवीन पोल व डिप्या करीता आणी मतदार संघाच्या सर्वांगीन विकासासाठी आपण केंद्र व राज्य सरकार च्या माध्यमातून गेल्या पाच वर्षात सात हजार कोटी रुपये निधी उपलब्ध करून आणला असल्याची माहिती माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली. कोकेश्वरी मंगल कार्यालय कोकरसा ता.मंठा जि.जालना येथे दिनांक २१ ऑक्टोबर २०२४ सोमवारी भारतीय जनता पार्टी तर्फे आयोजित तळणी व जयपूर या दोन जिल्हा परिषद सर्कल मधील कार्यकर्त्यांच्या बैठकीत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की मुख्यमंत्री लडकी बहीण योजना, दिव्यांग बांधवांच्या योजना, मुख्यमंत्री लाडकी लेक योजना, सावित्रीबाई फुले स्वातंत्र्य स्वयं योजना, अनाथ बालकांच्या योजना आशा केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून राज्यभरात राबविलेल्या शेकडो योजनांचा लाभ तळागाळातील सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याकरिता आपण परतूर मंठा जालना या तहसील कार्यालया सह जिल्हा अधिकारी जालना यांच्या दालनात आढावा बैठक घेऊन परतुर मंठा वनेर सेवली सर्कल मध्ये भव्य जनजागृती मेळावा व कॅम्पचे आयोजन केले होते यातून मतदारसंघातील लाखो लाभार्थ्यांना याचा लाभ मिळाला असून. मोदी आवास योजना शबरी आवास योजना रमाई आवास योजना यशवंतराव चव्हाण आवास योजना पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर आवास योजना या विविध योजनेच्या माध्यमातून परतुर विधानसभा मतदारसंघातील पंचवीस हजार लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आला असल्याची माहिती यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी आवर्जून दिली. या प्रसंगी भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर, गणेशराव खवने सतीश निरवळ संदीप गोरे नाथाभाऊ काकडे नारायण काकडे विठ्ठलमामा काळे राजेश मोरे सुरेशबापू बाहेकर विलास घोडके विवेक काकडे गजानन देशमुख मनोज देशमुख तारासिंग चव्हाण नितीन सरकटे शरद पाटील रामेश्वर देशमुख भगवान देशमुख रामकिशन बोडखे नवनाथ खंदारे नवनाथ चट्टे आबासाहेब सरकटे दारासिंग चव्हाण सुभाष लाड शिवशंकर डोईफोडे बाजीराव आघाव प्रकाश गबाळे अजय जाधव भागवत देशमुख सचिन राठोड केशव येऊल दत्तराव कांगणे दिपक दवणे अशोक राठोड किशोर हनवते राहुल बाहेकर कैलास चव्हाण शंकर बांडगे गजानन शिंदे अरुण खवणे नारायण काकडे सुभाष चव्हाण जगन टकले संजय टकले नितीन चाटे आत्माराम राठोड भास्कर जाधव सिद्धेश्वर सरकटे गणेश दवणे सुंदरराव दवणे निवास देशमुख यांच्या सह हजारो भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

रामेश्वर मंदिरामध्ये गाथा पारायणास भास्कर दानवे यांची भेट

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

तालुक्यातील मौजपुरी येथील रामेश्वरी मंदिरामध्ये १०१ वे फिरते पारायण सोहळ्यानिमित्त ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज बारड यांच्या गाथा पारायण व कीर्तनास भाजपा जालना विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे यांनी भेट दिली, याप्रसंगी रामेश्वरी मंदिर कमिटीच्या वतीने आबांचे स्वागत करून सत्कार करण्यात आला. जालन्यामधून २८ गावांनी यात सहभाग घेतला असून २५० हून अधिक लोक परायणास बसले आहेत. उपस्थित सर्व भाविक भक्तांना भाजपा जालना विधानसभा प्रमुख भास्कर आबा दानवे यांच्यावतीने सफरचंद व केळीच्या प्रसादाचे वाटप करण्यात आले. अतिशय भक्तिमय वातावरणात सुरू असलेल्या या गाथा पारायण सोहळ्याप्रसंगी भागवत बावणे, कपिल दहेकर, वसंत शिंदे, बद्रीनाथ भसांडे, निवृत्ती गायकवाड, निवृत्ती लंके, राम जाधव, विष्णू डोंगरे, मुकेश चव्हाण, कैलास उबाळे, गोवर्धन कोल्हे, रामजी शेजुळ, गोपाल चौधरी, रामदास गायकवाड, दत्ता जाधव, सत्यनारायण ढोकळे, हरिभाऊ गोरे आदींसह मोठ्या संख्येने भाविक-भक्तांची व परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

भाजप कार्यकर्त्यांच्या हातात तुतारी

तभा वृत्तसेवा
घनसावंगी/प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील भारतीय जनता पार्टीच्या वैद्यकीय सेलचे तालुका अध्यक्ष तथा सर्कल प्रमुख. डॉ. अनिकेत वरखडे. यांच्यासह भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी माजी मंत्री आ.राजेश टोपे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटात प्रवेश केला. रविवारी (ता. २०) जालना येथील आ. टोपे यांच्या निवासस्थानी झालेल्या प्रवेश सोहळ्यास आबासाहेब वरखडे. नानाभाऊ उगले. बळवंतराव देशमुख. जगदीश देशपांडे. पप्पू वरखडे. संतोष कुहिरे. प्रीतम वरखडे. गोपीनाथ पाटोळे .दिलीप देवकर. प्रभाकर शिंदे आदींची उपस्थिती होती. या वेळी डॉ. अनिकेत वरखडे, राहुल काळे, रमेश देशमुख ,लक्ष्मण शिंगणे. यांनी पक्षात प्रवेश केला. त्यांचे आ. राजेश टोपे यांनी स्वागत केले.

महादेव, पार्वती, गणपती, कार्तिकेय, पूजन संकष्टी, करवा चौथ योगात रात्री ८.१७ वाजता चंद्राला दिले अर्घ्य

तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी

करवा चौथ निमित्त रविवारी रात्री ८.१७ वाजता चंद्राला अर्घ्य की अर्पण करून संकष्टी चतुर्थी व करवा व चौथ साजरी केली. विवाहित महिलांनी ची आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी हे व्रत केले. दिवसभर निर्जल राहून सायंकाळी त चंद्रदर्शनाने उपवास सोडला. याच न दिवशी संकष्टी चतुर्थी आल्याने करवा वा चौथचे महत्त्व वाढून महिलांनी मोठ्या ग प्रमाणावर हे व्रत केले.

महादेव, पार्वती, गणपती अन् कार्तिकेयसह चंद्राचे पूजन करून है. पारंपरिक पद्धतीने विविध समाजाच्या महिलांनी करवा चौथचे पूजन केले. व्रताच्या प्रार्थनेसाठी सायंकाळी पाचपासून मंठा परिसरातील मंदिर व तलाव परिसरात विवाहित महिलांसह तरुणींनी मोठी गर्दी केली होती. तलाव परिसरात दिवे वाहिले तर महिलांनी न महादेव, पार्वती, गणपती अन् कार्तिकेय आदी देवतांसह चंद्राचे पूजन करून चंद्राला अर्घ्य अर्पण केले.

कणकेचा दिवा पेटवून महादेव, पार्वती, गणपती, कार्तिकेयसह यांची पूजा करून आरती करण्यात आली. त्यानंतर चंद्राचे पूजन व चंद्रदर्शन झाल्यावर पुरोहितांकडून पूजा करत विवाहित महिलांनी उपवास सोडला. यात चाळणीतून चंद्रदर्शन घेत चंद्राला अर्घ्य अर्पण केले. त्यानंतर गोड पदाथनि महिलांनी करवा चौथच्या उपवासाची सांगता केली. सती युगापासून पतीच्या दीर्घायुष्यासाठी या व्रताची परंपरा आहे. याची सुरुवात सावित्रीच्या पतिव्रता धर्मापासून झाली. तर दुसऱ्या कथेनुसार वनवास काळात अर्जुन तपस्येसाठी नीलगिरीवर जातो तेव्हा द्रौपदीने अर्जुनाच्या रक्षणासाठी कृष्णाची मदत मागितली. यात त्यांनी द्रौपदीला माता पार्वतीने भगवान शंकरासाठी जो उपवास केला होता तो करायला सांगितला. तेव्हापासून पतीच्या दीर्घायुष्यासाठी हे व्रत करण्यात येत असते. अशी मान्यता आहे.

जालन्यात काँग्रेसला खिंडार, सहाशेहुन अधिक जणांनी खोतकरांवर विश्वास ठेऊन केला प्रवेश

तभा वृत्तसेवा
जालना । प्रतिनिधी

शिवसेनेचे नेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या नेतृत्वाखाली आज काँग्रेसह अन्य सहाशेहून अधिक जणांनी शिवसेनेत प्रवेश केला. प्रवेश कर्त्यांना उद्देशून श्री. खोतकर यांनी त्यांचे सर्व प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन यावेळी दिले.यावेळी बोलतांना शिवसेना नेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर म्हणाले की, आज एवढ्या संख्येने हा प्रवेश सोहळा पार पडत आहे, त्याचे आपण कौतूक करतो. शिवसेनेत ज्यांनी-ज्यांनी प्रवेश घेतला, त्यांचे म्हणणे आपण निश्चितच खाली जाऊ देणार नाहीत. याची जाणीव प्रत्येकाने ठेवावी. मग तो वीजेचा प्रश्न, नाल्यांचा प्रश्न असो की, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न असो. हे सर्व प्रश्न मार्गी लावणार असल्याचे श्री. खोतकर यांनी सांगितले.

प्रवेश करणार्यांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाउंडेशन चे सिद्धार्थ आंबोरे, शुभम अंभोरे, महादू पोळ अमोल गंगा तिवरे असं फाउंडेशनचे शेकडो कार्यकर्ते व अजय कुरिलिये यांच्यासह त्यांचे मित्र मंडळाचे निलेश काकडे, लखन नागरे, सागर तुरे, रिषभ मंडलेकर, कुलदिप बोरे, अमोल पायगव्हाणे, नागेश शिंदे, धरमेश प्रसाद, निखील काकडे, अनिकेत पायगव्हाणे, करण लिधोरिये, सागर मंडोले, गणेश गोरे, दिपक अंबिलढगे,प्रतिक निकम, सुरज सातपुरिये, किशन डोकठे, पियुष मंडोले, श्री. वाघमारे, कृष्णा जेठे, राहुल कुरलिये, सुमित सतपुरिये, प्रविण कुरलिये, योगेश परुकर, करण परुळकर, लंकेश पाटील, तसेच शाम अवसरमोलल राजीक शेख, अमन अवसरमोल, गोपाल खरात, दिनेश दाभाडे, जमोल भाई, सलीम भाई, अभिषेक उबाळे, शफिक शेख, इंद्रजीत खंदारे, राजूभाऊ भंडारे, विनोद जगधने, पोहकर, प्रकाश जगधने, भरत खंदारे, धोंडीराम ढोरपे, आकाश जगधने, गयाबाई अवसरमोल, जिजाबाई लोंढे, संगिताबाई जगधने, अल्काबाई लहाने, दादाराव लहाने, रंजनाबाई खंदारे, विनोद लहाने, विशाल लहाने, लिलाबाई जोगदंड, रवि पोहेकर, शहबाद बी, साबेत बी, कृष्णा ढोरपे, शांताबाई भंडारे, लक्ष्मण खंदारे, नवीन मोंढ्याया पाठीमागे आनंदनगर व संताजी नगर या मध्ये अद्यापही लाईटची सुविधा नाही, आदी अनेक समस्या असून त्याचा विचार करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. तसेच यावेळी शाकीर खान व असलम मदनी यांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेनेत पक्ष प्रवेश केला. या सर्वांचा पुष्पहार देऊन श्री. खोतकर यांनी सत्कार केला. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनच्या पदाधिकार्यांनीही यावेळी शिवसेनेत प्रवेश केला. या सर्व कार्यकर्त्यांचे माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांनी सत्कार केला.याप्रसंगी शहर प्रमुख विष्णू पाचफुले, जफर खान, अशपाक पठाण, शेख नजीर भाई, ताहेर खान, बडे खान, मुसा परसुवाले, परवेज खान, खालील के पी, एजाज भाई,सय्यद इकराम, अज्जू भाई, तसेच शेकडो शिवसैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती

चौफेर

हिंदूंनी १०० टक्के मतदान करणे का महत्त्वाचे आहे?

पंकज जगन्नाथ जयस्वाल

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीचा निकाल आणि आताच आलेला हरयाणा व जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीचा निकाल हिंदू समाजासाठी एक मोठा धडा आहे. लोकसभा निवडणुकीच्या निकालाने हिंदू समाजाला लवकरच जागृती येऊन एकत्र येण्यासाठी एक प्रकारे ईश्वरीय इशारा दिला आहे. हिंदूंनी एकत्रित होऊन १०० टक्के मतदान नाही केले तर काही घराणेशाही जोपसणारे राजकीय पक्ष, स्वार्थी बुद्धिजीवी, जागतिक मार्केट फोर्सेस आपल्यावर शरिया आणि वामपंथी संस्कृती लादून आपल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानाला नाकारतील व पाकिस्तान, बांगलादेश व अफगाणिस्तान सारखी आपली सामाजिक, आर्थिक आणि आध्यात्मिक परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न करतील. लोकसभा निवडणुकीपासून आपण बघतोय् कशा प्रकारे खोटे विमर्श रेटून समाजात पसरवले जात आहेत. त्यातले दोन खोटे कॅरेटिव्ह, ज्यामुळे हिंदू समाजात फूट पडली ते म्हणजे भाजपा सरकार पुन्हा निवडून आले तर संविधान बदलण्यात येईल व आरक्षण संपुष्टात येईल. या खोट्या नॅरेटिव्हचा काही प्रमाणात भाजपाला फटका बसला. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर जेव्हा लोकांना सत्य परिस्थिती कळली की संविधान बदलता येत नाही आणि आरक्षणही नाही तेव्हा पुन्हा त्यांनी हरयाणात भाजपाला तिसऱ्यांदा जिंकून दिले. आता संविधानाचे खोटे नॅरेटिव्ह फेल ठरल्याने तोंडावर आपटलेल्या विरोधकांकडून महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीत एक नवीन तद्दन खोटे नॅरेटिव्ह पसरवण्यात येत आहे आणि ते म्हणजे महायुती सरकार जर पुन्हा निवडून आले तर महाराष्ट्राला गुजरातच्या वेठीस बांधले जाईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जरी गुजरात राज्याशी संबंधित असले तरी ते ज्या विचारधारा व संघटनेतून घडून आज या पदावर कार्य करित आहेत तिथे जातीवाद, प्रांतवाद आणि भाषावाद या कुजलेल्या विचारांना मान्यता नाही, त्यांची घडण फक्त 'राष्ट्र प्रथम' या भावनेने व विचारांनी झाली आहे. त्यामुळे असे घाणेरडे राजकारण त्यांनी मागच्या दहा वर्षांत कधीही खेळले नाही आणि पुढे कधीही खेळणार नाहीत. जे खोटे नॅरेटिव्ह या संबंधित पसरवले जात आहे ते म्हणजे महाराष्ट्रातील कंपन्या गुजरातला पळवून नेल्या जात आहेत. हे जर खरं असतं तर मग महाराष्ट्र आर्थिक गुंतवणुकीत नंबर एक कसा राहिला असता? तोही मोठ्या फरकाने? हे सर्व खोटारडे नॅरेटिव्ह लोकांना भ्रमित करून सत्तेवर येण्यासाठी आहेत. या सर्व नॅरेटिव्हना बळी न पडता आपण होऊन १०० टक्के मतदान केले पाहिजे. एक विचित्र प्रकारची मानसिकता आपल्याला या निवडणुकीमध्ये बघायला मिळाली आणि ती म्हणजे मुस्लिम समाजाला त्यांचा विकास घडवून आणणाऱ्या सरकारशी काही घेणे देणे नाही, त्यांच्यासाठी केवळ मजहब महत्त्वाचा आहे, महत्त्वाचा असावा त्यात काही वाईट नाही. परंतु जे सरकार 'सबका साथ, सबका विकास' या धोरणाच्या अनुषंगाने मागील दहा वर्षांपासून काम करीत आहे, ज्या योजनांचा मुस्लिम समाजाने देखील मोठ्या प्रमाणात फायदा घेतला व अजूनही घेत आहेत. परंतु मतदान करताना फक्त मजहब आणि शरिया यावर त्यांना ज्या विरोधकांवर विश्वास आहे, अशा उमेदवारांना एकगठ्ठा मते देण्यात आली, जिथे हिंदू बहुसंख्येने आहे पण मतदानाच्या दिवशी बाहेरच पडला नाही किंवा कुटुंबासोबत पिकनिकला निघून गेला तिथे मुस्लिम मताधिक्यामुळे त्यांना जो उमेदवार हवा होता तो त्यांनी निवडून आणला. तो उमेदवार योग्य होता की नाही हा भाग वेगळा. हिंदूंना असे वाटत असते की मतदान न केल्याने काही फरक पडत नाही (माझ्या एका मताने काय फरक पडेल) असा अनेकांचा समज असतो. त्यामुळे शहरे आणि महानगरांमध्ये मतदानाची टक्केवारी कमी दिसते. सामाजिक, आर्थिक आणि आध्यात्मिक विकासाच्या सर्व पैलूंमध्ये राज्याला आणि भारताला एक महान राष्ट्र म्हणून पाहू इच्छिणाऱ्या प्रत्येकाला व्यापक दृष्टिकोनातून विचार करणे आवश्यक आहे. प्रत्येक मत राज्याला व देशाला बळकट करण्यासाठी आणि अंतर्गत आणि बाह्य शत्रूंशी लढण्यासाठी मदत करते. आपण आपल्या महान राज्यात आणि राष्ट्रात अनेक त्रस्त करणाऱ्या गोष्टी पाहिल्या आणि कोणालाच नको असलेल्या मानसिकतेला आपण बळी पडलो आहोत. गेल्या काही दशकांत विकसित झालेल्या औपनिवेशिक मानसिकतेचा घराणेशाही राजकीय पक्षांना व्यक्तिगत स्वार्थासाठी फायदा झाला आहे, त्यामुळे अशी मदत करणारी मानसिकता त्यांना कधीही बदलायची नाही. जर आपल्याला आपल्या अंतर्गत आणि बाह्य शत्रूंमध्ये खरोखर भीती निर्माण करायची असेल तर आपण मतदान केलेच पाहिजे. हिंदूंना मतदानाचे आवाहन म्हणजे अन्यधर्मीयांचा द्वेष नव्हे. परंतु जेव्हा जेव्हा हिंदू समाज एकत्र येऊन कार्य करतो तेव्हा तो सर्वांच्या भल्यासाठी व 'राष्ट्र प्रथम' या भावनेने कार्य करतो. जेव्हा जेव्हा देशभक्त ईव्हीएम बटण दाबतो तेव्हा तो अंतर्गत आणि बाह्य शत्रूच्या मनात शॉकवेव निर्माण करतो. काहीजण असा तर्क करू शकतात की दहा वर्षांनंतरही अजूनही बरीच आव्हाने आहेत. होय, प्रत्येकजण सहमत असेल. परंतु आपण आपल्या जीवनातील व्यक्तिगत अनुभवांचा अभ्यास केला पाहिजे. आज आपण जे काही आहोत ते आपल्या पूर्वजांच्या आणि घराण्याच्या अनेक पिढ्यांच्या प्रयत्नांचे फळ आहे. त्याचप्रमाणे, या विशाल देशात २४ कोटींहून अधिक कुटुंबे आहेत व महाराष्ट्रात जवळपास ३ कोटी कुटुंब आहेत. विविध संस्कृती, राजकीय विचारसरणी आणि सर्व स्तरांवर विविध प्रकारचे प्रशासन आणि शासन कार्यरत असते. त्यामुळे, जरी आपण जमिनीवर भरपूर विकासाचे पुरावे पाहू शकतो, परंतु महत्त्वपूर्ण बदल घडवून आणण्यासाठी आणखी काही वर्ष लागतील. महाराष्ट्र धर्म, अस्मिता, राज्याचा सामाजिक आणि आर्थिक विकास, संस्कृती रक्षण, अंतर्गत सुरक्षा मजबूत करणे, आर्थिक चक्रात सकारात्मक बदल, स्वावलंबी भारताचा एक भाग म्हणून विविध 'स्व' आधारित धोरणे आणि अंमलबजावणी 'स्व' च्या दिशेने प्रगती करीत वसाहतवादी मानसिकता काढून टाकणे. 'महाराष्ट्र धर्म' व 'देश प्रथम' विचारसरणीचा विकास आणि राष्ट्राच्या विकासासाठी आणि सुरक्षेसाठी सनातन धर्माचे महत्त्व ओळखून अशा सरकारला निवडून परत आणावे लागेल. राष्ट्र आणि राज्य विध्वंसक मानसिकतेतून विधायक मानसिकतेकडे वळले आहे आणि जर आपण ही मानसिकता तयार करत राहिलो तर एक-दोन दशकात आपण निःसंशयपणे 'विश्वगुरू' होऊ. आणि तसे होण्यासाठी, आपण निवडणुकीच्या दिवशी मतदान केले पाहिजे आणि इतरांनाही मतदान करण्यास प्रोत्साहित केले पाहिजे. लक्षात ठेवा, आम्ही मूलभूतपणे प्रत्येक व्यक्तीला वैयक्तिक जीवनातील सर्व घटकांमध्ये प्रगती करण्यास मदत करण्याचा मार्ग निवडला आहे. जिंकण्याबद्दल आश्वस्त आहोत किंवा बेजबाबदार वृत्ती बाळगून मतदान केले नाही, तर केवळ आपल्या कुटुंबासाठी किंवा पक्षासाठी काम करणारा उमेदवार आपल्याला सर्व आघाड्यांवर, अगदी अंतर्गत सुरक्षेच्या बाबतीतही सर्वांना अडचणीत आणेल.

काही लोक असा युक्तिवाद करतात की सर्व पक्ष समान आहेत आणि ते नैतिकतेने कार्य करीत नाहीत. होय, आपण सर्व काही प्रमाणात सहमत असू. परंतु जेव्हा आपण हजारो वर्षे मागे वळून पाहतो आणि जगभरातील इतर देशांशी तुलना करतो तेव्हा आपल्याला दिसून येते की जी परिस्थिती पूर्वी होती ती काही प्रमाणात आजही आहे. या सर्व परिस्थितीत सुद्धा आपल्याकडे 'सर्वोत्तम उपलब्ध' निवडण्याचा पर्याय आहे, ज्यांच्याकडे 'महाराष्ट्र धर्म व राष्ट्र प्रथम' अजेंडा आहे. संविधानाविरुद्ध तयार केलेला वक्फ बोर्ड ॲक्ट घालवणे किंवा मोठा बदल करणे, समान नागरी संहिता कायदा संविधानानुसार अमलात आणणे, सर्वांचा सामाजिक आणि आर्थिक विकास, रोजगार वाढवण्यासाठी योजना व कार्य, अंतर्गत सुरक्षा मजबूत करण्यासाठी कार्य करणारं सरकार, शेवटच्या वंचित माणसाच्या विकासासाठी कार्य करणारं, संस्कृती आणि धर्म पुनर्संचयित करण्यासाठी कार्य करणारं, आणि 'स्व' आधारित मानसिकता विकसित करण्यासाठी कार्य करणारे सरकार आपल्याला निवडायचे आहे.

आपण मतदान का केले पाहिजे आणि इतरांना मतदान करण्यास का प्रोत्साहित केले पाहिजे?

१ २०२८ पर्यंत १ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे लक्ष्य गाठले जाईल.
२. उद्योजकता आणि रोजगाराच्या संधींना प्रोत्साहन देण्यासाठी स्व आधारित अर्थव्यवस्थेला चालना दिली जाईल.
३. वक्फ बोर्ड संबंधित विधेयकाला पारित करण्यासाठी केंद्र सरकारला समर्थन.
४. शेतकरी व ग्रामीण विकासावर भर
५. महिला सशक्तीकरण व महिलांच्या सुरक्षिततेत वाढ
६. पर्यावरणास जबाबदार आणि शाश्वत विकासाचे नियोजन आणि अंमलबजावणी
७. आपल्या राज्याच्या सामाजिक-आर्थिक जडणघडणीला धोका निर्माण करणाऱ्या नक्षलवाद आणि विदेशी दलालांचा मुकाबला आणि पराभव करणे.
८. निव्वळ निर्यात साध्य करणे.
९. भारताच्या सार्वभौमत्वाला घातक असलेले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बनवलेले नसून काही राजकीय नेत्यांनी राजकीय फायद्यासाठी लागू केलेले कायदे रद्द करण्यासाठी केंद्र सरकारला मदत.
१०. मुख्य घटक म्हणून अर्धसंवाहक (ड्शाळलेपर्वीलीी) असलेले इलेक्ट्रॉनिक हब विकसित करणे.
११ गड व किल्ले संवर्धन
१२ राष्ट्रील शैक्षणिक धोरणाची प्रभावी आणि कार्यक्षम अंमलबजावणी
१३. स्टार्ट-अप, पेटंट आणि युनिकॉर्नमध्ये जलद वाढ.
१४. गरिबी दरात लक्षणीय घट
१५. व्यवसाय करण्याची सुलभता वाढेल
१६. लाडकी बहीण योजना व अशा सहाय्यक योजना चालू ठेवण्यासाठी
१७. ड्रग माफिया आणि अंमली पदार्थांच्या तस्करीचे स्त्रोत नष्ट केले जातील.
१८. ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.
१९. शेतकऱ्यांच्या प्रयत्नांना पाठिंबा देण्यासाठी अधिक शेतकरी-अनुकूल धोरणे.
२०. संशोधन आणि नवकल्पना यांना प्राधान्य दिले जाईल.
२१. आंतरराष्ट्रीय मंचांवर आपल्या सांस्कृतिक मूल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी.
२२. महान स्वातंत्र्यसैनिक आणि ऐतिहासिक व्यक्तींना पुरस्कृत केले जाईल.
२३. सर्व क्षेत्रांमध्ये स्वदेशी तंत्रज्ञानाच्या नवकल्पनांना प्रोत्साहन दिले जाईल.
२४. 'एक देश, एक निवडणूक' समर्थन
२५. घराणेशाहीचे राजकारण कमकुवत होईल

ही काही क्षेत्रे आहेत जिथे प्रगतीची अपेक्षा करू शकतो. जर आपण मतदान केले आणि इतरांना मतदान करण्यास उद्युक्त केले तरच. आता आपण आपल्या विचारांवर ठाम राहिले पाहिजे. अन्यथा, २०१४ पूर्वी आपण ज्या निराशाजनक कालावधीचा सामना केला होता, त्याचप्रमाणे आपल्याला आणखी एका निराशाजनक कालावधीला सामोरे जावे लागेल. वक्फ बोर्ड, भावी पिढ्यांचा, आपल्या मुलामुलींचा आणि स्त्रियांच्या सुरक्षेचा विषय डोक्यात ठेवा, मतदानाच्या बाबतीत नकारात्मक दृष्टिकोन आणि आळशीपणा केल्यास प्रत्येक क्षेत्रातील प्रगतीवर कसा विपरीत परिणाम होईल याचा विचार करा. प्रत्येकाने स्वतःला आणि इतरांना योग्य मार्गावर नेण्यासाठी मतदान करण्याची प्रेरणा देणारी ठिणगी बनावे. आपण कुठल्याही धर्माच्या विरोधात नाही. पण सर्व समाज आणि देशाचे भले करण्यासाठी हिंदूंनी एकत्र येणे नितांत आवश्यक आहे.

वक्फ बोर्ड

वक्फ बोर्ड हिंदू समाजासाठी किती खतरनाक आहे हे समजून घेऊन तरी मतदानाला बाहेर पडा. जे पक्ष वा उमेवदार वक्फ बोर्डचे समर्थन करतील अशा सर्वांना हरवायला नको का? आतापर्यंत जेवढी जमीन, प्रॉपर्टी वक्फ बोडनि हिंदूंकडून (यात बौद्ध, जैन आणि शीखही आले) हिसकावून घेतली आहे आणि हा धोका भविष्यात सर्वांसाठीच आहे हे प्राथमिक रीत्या लक्षात घेतलं पाहिजे. असा कायदा जगात कुठेही नाही. व्होट बँकचे लांगुलचालन करणाऱ्या पक्षांच्या उमेदवारांना आपण हिंदू म्हणून एकत्र येऊन हरवायला नको का?

७८७५२१२१६१

पंतप्रधानांच्या आर्थिक धोरणांमुळे वाढला रोजगार

जेव्हा विकसित अर्थव्यवस्थांना बेरोजगारीच्या वाढत्या दराचा सामना करावा लागत आहे, तेव्हा पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली भारत १.४ अब्ज लोकसंख्या असूनही रोजगार वाढीचा सकारात्मक कल दाखवत आहे. चला वस्तुस्थिती जाणून घेऊया.

भारतीय रिझर्व्ह बँक (आरबीआय) च्या नवीनतम क्लेम्स डेटानुसार, २०१४-१५ मधील ४७.१५ कोटींच्या तुलनेत २०२३- २४ मध्ये देशातील रोजगार ६४.३३ कोटींपर्यंत वाढला आहे. २०१४-१५ ते २०२३-२४ या कालावधीत एकूण रोजगारात सुमारे १७.१९ कोटी एवढी वाढ झाली आहे. क्लेम्स डेटा https://www.rbi.org.in/Scripts/KLEMS.aspx या लिंकवर वर उपलब्ध आहे. म्हणजे पहिल्या ६७ वर्षांच्या कारभारात ४७.१५ कोटी नोकऱ्या निर्माण झाल्या, त्या तुलनेत मोदी सरकारच्या गेल्या दहा वर्षांत १७.१९ कोटी नोकऱ्या निर्माण झाल्या. हे पंतप्रधान मोदींच्या कार्यकाळात वेगवान विकास दर दर्शवत आहे. पुढे, सरकारने २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात, ५ वर्षांच्या कालावधीत ४.१ कोटी तरुणांना रोजगार, कौशल्य आणि इतर संधी उपलब्ध करून देण्यासाठी ५ योजना आणि उपक्रमांसाठी पॅकेज जाहीर केले, ज्यासाठी केंद्रीय खर्च रु. २ लाख कोटी असणार आहे.

केंद्रीय कामगार आणि रोजगार मंत्री, तसेच युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री यांनी जुलै २०२४ साठी

इपीएफओच्या तात्पुरत्या वेतनपटाची (Payroll) आकडेवारी जाहीर केली. त्यांनी सांगितले की इपीएफओने जुलै २०२४ मध्ये १९.९४ लाख निव्वळ सदस्य जोडले. एप्रिल २०१८ पासून वेतनपट डेटा ट्रॅकिंग सुरू झाल्यापासून सर्वांत मोठी नोंद झाली आहे. इपीएफओने जुलै २०२४ मध्ये १०. ५२ लाख नवीन सदस्य जोडले. जून २०२४ च्या तुलनेत २. ६६ टक्के आणि जुलै २०२३ पासून २.४३ टक्क्यांनी वाढ झाली. नवीन सदस्यत्वातील ही वाढ नोकरीच्या संधी वाढवणे, कर्मचाऱ्यांना फायद्यांची अधिक समज आणि इपीएफओच्या यशस्वी आऊटरीच क्रियाकलापांना कारणीभूत ठरू शकते. जुलै २०२४ मध्ये ८.७७ लाख निव्वळ वाढीसह १८ - २५ वयोगटाने सर्वात जलद वाढ अनुभवली. नोंदी झाल्यापासून ही या लोकसंख्याशास्त्रातील सर्वाधिक वाढ आहे आणि हे तरुण व्यक्तींचा, प्रामुख्याने प्रथमच नोकरी शोधणाऱ्यांचा सध्याचा कल दर्शविते. संघटित कर्मचारी वर्गात प्रवेश या वयोगटात महिन्याभरात जोडलेल्या सर्व नवीन सदस्यांपैकी ५९.४१ टक्के आहेत. २०१७-१८ मध्ये १५ वर्षे वयावरील व्यक्तींसाठी बेरोजगारीचा दर ६.२ टक्के होता आणि तो २०२२-२३ मध्ये ३.२ टक्के एवढा घसरला आहे.

जुलै २०२४ मध्ये, ३.०५ लाख नवीन महिला सदस्य यामध्ये सामील झाले, जे मागील वर्षाच्या तुलनेत १०.९४ टक्के वाढीचे प्रतिनिधित्व करते. एकूण, ४.४१ लाख निव्वळ महिला सदस्य जोडले गेले, जे पेरोल ट्रॅकिंग सुरू झाल्यापासून महिलांसाठी सर्वांत मोठी मासिक जोड ठरली. जुलै २०२३ च्या तुलनेत १४. ४१ टक्के वाढ झाली. हे महिलांच्या वाढीव सहभागासह अधिक समावेशी कर्मचारी वर्ग हा बदल दर्शवते. भारतातील रोजगाराच्या वातावरणात हा बदल आहे. रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि रोजगार बाजाराला योग्य दिशा आणि अधिकृत औपचारिकता देण्याच्या उद्देशाने मोदी सरकारच्या परिवर्तनवादी धोरणांची प्रभावी अंमलबजावणी दर्शविते.

रोजगारातील ही वाढ वर्क मार्केट आणि अधिक पर्याय, विशेषतः तरुण लोक महिलांसाठी दर्शवते. भारताच्या आर्थिक वाढीसाठी आणि रोजगार निर्मितीसाठी जबरदस्त प्रयत्नांना प्रोडक्शन लिंक्ड इन्सेंटिव्ह (PLI) योजना, स्टार्टअप इंडिया, रोजगार लिंक्ड प्रोत्साहन योजना आणि महत्त्वपूर्ण भांडवली खर्च (Capex) कार्यक्रमांसारख्या महत्त्वाच्या सरकारी उपक्रमांमुळे मदत मिळाली आहे. वर्ष-दर-वर्ष निव्वळ वेतनपट वाढीमुळे होत असलेल्या प्रगतीवर प्रकाश पडतो: २०२२-२३ इपीएफओमध्ये, १३८.५२ लाख निव्वळ जोडण्या झाल्या, तर २०२३-२४ मध्ये हा आकडा १३१.४८ लाख होता. एका वृत्तसंस्थेच्या लेखानुसार, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे भारताचे माजी कार्यकारी संचालक सुरजित भल्ला यांनी दावा केला की, नरेंद्र मोदी सरकार सरासरी आधारावर अभूतपूर्व प्रमाणात रोजगार निर्माण करत आहे. गेल्या ७-८ वर्षांत ही संख्या सुमारे १० दशलक्षांपर्यंत पोहोचली आहे. ते पुढे म्हणाले की, संपुआ (यूपीए) सरकारने २००४ ते २०१३ दरम्यान सर्वांत कमी नोकऱ्या निर्माण केल्या, ज्यामुळे 'रोजगार नसलेली वाढ' या म्हणीला चालना मिळाली. मात्र, मोदी सरकारने रेकॉर्डवर सर्वाधिक नोकऱ्या निर्माण केल्या आहेत. भारतीय इतिहासात एवढ्या रोजगाराची सरासरी कधीच निर्मिती झाली नव्हती.

फॅक्टरी रोजगारात उलाढाल

आर्थिक सर्वेक्षणानुसार, संघटित उत्पादन क्षेत्राने महामारीपूर्व पातळीच्या वरची मजल मारली आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये ग्रामीण भागात मोठ्या वेतनवाढीमुळे, ग्रामीण भागात वस्तूंची मागणी वाढली आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणारे हे संकेत आहेत. ग्रामीण भागातील प्रति कामगार मजुरी शहरी भागात ६.१ टक्क्यांच्या तुलनेत वर्ष २०१५ आणि वर्ष २०२२ दरम्यान ६.९ टक्के सीएजीआर (चक्रवाढ वार्षिक वाढ दर) वर वाढली आहे. या वर्षी दहावा वर्धापन दिन साजरा करणाऱ्या 'मेक इन इंडिया' सारखे कार्यक्रम आणि उत्पादन-लिंक्ड इन्सेंटिव्ह (पीएलआय) योजना, तसेच रोजगाराला चालना देण्यासाठी अर्थसंकल्पीय उपक्रम, विशेषतः उत्पादन क्षेत्रात व्यापक भरतीला चालना देत राहतील.

अनेक नवीन संधी

वेगवेगळ्या स्रोतांकडील डेटा दर्शवितो की भारताच्या रोजगार बाजारपेठेचे भविष्य उज्ज्वल आहे. भारतातील ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स (GCCs) अलिकडच्या वर्षांत मोठ्या विस्तारले आहेत. गिग इकॉनॉमीमुळे देशाच्या कर्मचाऱ्यांच्या संख्येमध्ये लक्षणीय वाढ होताना दिसत आहे व भविष्यात अजून मोठी वाढ होण्याचे आश्वासन देते. उल्लेखनीय म्हणजे, गिग अर्थव्यवस्थेवरील निती आयोगाच्या अहवालात प्लॅटफॉर्म कामगारांमध्ये लक्षणीय वाढ होण्याचा अंदाज आहे. २०२९-३० पर्यंत हा आकडा २.३५ कोटी पर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे, जो गिग अर्थव्यवस्थेची वेगवान वाढ सिद्ध करतो. २०२९-३० पर्यंत, गिग कामगारांचा भारतातील गैर-कृषी रोजगारांपैकी ६.७ टक्के आणि एकूण उपजीविकेच्या ४.१ टक्के वाटा असेल असा अंदाज आहे. ही सर्व प्रगती भारताचा मजबूत आर्थिक मार्ग आणि वैविध्यपूर्ण रोजगार संधींची क्षमता दर्शविते.

पीएलएफएस, आरबीआय, इपीएफओ आणि इतर संस्था यांसारखे अधिकृत डेटा स्रोत गेल्या पाच वर्षांत प्रमुख श्रमिक बाजार निर्देशांकामध्ये स्थिर वाढ दर्शवत आहेत, ज्यात सुधारित लेबर फोर्स पार्टिसिपेशन रेट (LFPR)आणि कामगार लोकसंख्या गुणोत्तर (WPR)यात वाढ तसेच बेरोजगारीचा दर कमी होताना दिसतो आहे. इपीएफओ आणि एनपीएस डेटा रोजगाराच्या चांगल्या ट्रेंडला बळकटी देतात. मॅन्युफॅक्चरिंग ट्रेंड, वाढती सेवा क्षेत्रे, पायाभूत सुविधांची वाढ आणि गिग व प्लॅटफॉर्म इकॉनॉमी, तसेच जीसीसी सारख्या अनेक क्षेत्रांमध्ये उदयोन्मुख संधी, हे सर्व आशादायक भविष्याच्या वाटचालीचे निर्देश देत आहेत.?

(स्रोत : आरबीआय, पीआयबी, बिझनेस स्टँडर्ड)

आरोग्य

आवळा खाण्याचे महत्त्वपूर्ण फायदे

आवळा इतका अनोखा कशामुळे ठरतो आणि तुम्ही तुमच्या रोजच्या आहारात त्याचा समावेश करणे का आवश्यक आहे, हे आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत. आवळा खाल्याने आरोग्याला कोणते फायदे होतात, तो सेवन करण्याची सर्वोत्तम वेळ कोणती आणि तुमच्या केसांसाठी आणि एकूणच तंदुरुस्तीसाठी आवळ्याचे सेवन का आवश्यक आहे, हे जाणून घेऊ.

असंख्य पौष्टिक घटक

आवळा व्हिटॅमिन सी, अँटिऑक्सिडंट्स आणि फायटोन्यूट्रिएंट्सच्या श्रेणीमध्ये समृद्ध आहे. एका लहानशा आवळ्यात २० संत्र्याइतके व्हिटॅमिन सी असते. याव्यतिरिक्त, तो कॅल्शियम, लोह, फॉस्फरसचा एक चांगला स्रोत आहे. व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स हा पोषक घटक आवळ्याच्या उल्लेखनीय आरोग्य फायद्यांमध्ये योगदान देतो.

रोज खाण्याचे फायदे : रोग प्रतिकारशक्ती वाढते

आवळा रोज खाण्याचा सर्वात मोठघ फायदा म्हणजे रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्याची क्षमता. व्हिटॅमिन सीच्या उच्च प्रमाणामुळे संक्रमणांशी लढण्याची शरीराची क्षमता वाढते, सामान्य सर्दीची तीव्रता कमी होते आणि संपूर्ण प्रतिकारशक्ती सुधारते. आवळ्यातील अँटिऑक्सिडंट्स मुक्त रॅडिकल्सला निष्प्रभ करण्यास मदत करतात, शरीराला विविध रोगांपासून वाचवतात.

पचनास मदत

पचनसंस्थेचे कार्य सुधारण्यात आवळ्याचे महत्त्वाचे योगदान आहे. याने पचनाची समस्या दूर होते. हे जठरासंबंधी रसांचे स्राव उत्तेजित करते, पचन आणि पोषक तत्त्वांचे अवशोषण करण्यास आवळा मदत करतो. त्यातील उच्च फायबर सामग्री आतड्यांच्या हालचाली नियमित करण्यास आणि बद्धकोष्ठता टाळण्यास मदत करते. शिवाय, आवळ्याचे दाहक विरोधी गुणधर्म ॲसिड रिफ्लक्स आणि गॅस्ट्रिटिसची लक्षणे कमी करण्यास मदत करू शकतात.

रक्तातील साखरेची पातळी होते नियंत्रित

रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित होण्यास आवळा महत्त्वाची भूमिका बजावतो. त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांनी याचे सेवन अवश्य करावे. आवळ्यातील क्रोमियम इंसुलिन स्रावात मदत करते, त्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित होते. आवळ्याचे नियमित सेवन केल्याने रक्तातील ग्लुकोजची पातळी स्थिर राहण्यास मदत होते आणि मधुमेहाची गुंतागुंत होण्याचा धोका कमी होतो.

हृदयाचे आरोग्य सुधारते

आवळा हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी आरोग्यासाठी उत्तम आहे. हे खराब कोलेस्टेरॉल (एलडीएल) कमी करण्यास मदत करते आणि चांगले कोलेस्ट्रॉल (एचडीएल) वाढवते. व्हिटॅमिन सी आणि पॉलीफेनॉल सारखे ॲंटिऑक्सिडंट्स हे ऑक्सिडेटिव्ह तणाव आणि रक्तवाहिन्यांमधील जळजळ प्रतिबंधित करते. यामुळे हृदयरोगाचा धोका कमी करते.

केसांच्या वाढीस प्रोत्साहन

केसांसाठी आवळा खाण्याचे फायदे खूप आहेत. त्यातील उच्च व्हिटॅमिन सी सामग्री कोलेजनचे उत्पादन वाढवते, जे केसांच्या मुळांना मजबूत करते आणि केसांच्या वाढीस प्रोत्साहन देते. आवळा लोहाचे अवशोषण देखील वाढवते, जे निरोगी केस राखण्यासाठी महत्त्वाचे आहे. अकाली धूसर होण्यासाठी आवळा हा नैसर्गिक उपाय आहे. त्यातील अँटिऑक्सिडंट्स आणि व्हिटॅमिन सी ऑक्सिडेटिव्ह तणाव कमी करून केसांचा नैसर्गिक रंग राखण्यास आणि केसांच्या मुळातील मेलेनिन रंगद्रव्य टिकवून ठेवण्यास मदत करतात.

केसातील कोंडा कमी होण्यास मदत

आवळ्याचा दाहक-विरोधी आणि बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ गुणधर्म कोंडा आणि टाळूच्या इतर संक्रमणांवर उपचार करण्यास मदत करतात. आवळ्याच्या नियमित संवनाने टाळूला निरोगी बनवता येते आणि डोक्यातील कोंडा आणि खाज कमी होते.

सकाळी आवळा खाणे फायदेशीर

रिकाम्या पोटी आवळा खाण्याचे फायदे विशेषतः लक्षात घेण्यासारखे आहेत. सकाळी सर्वप्रथम आवळा खाल्याने त्याचे 'डिटॉक्सिफायिंग इफेक्ट्स' वाढू शकतात. हे विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत करते, पचन सुधारते आणि चयापचय वाढवते. उत्तम परिणामांसाठी आवळ्याचा रस किंवा कच्चा आवळा रिकाम्या पोटी खाणे फायदेशीर ठरते. सकाळचे सेवन फायदेशीर असले तरी दिवसाच्या कोणत्याही वेळी आवळ्याचे सेवन केले जाऊ शकते. तुमच्या जेवणात किंवा स्नॅक्समध्ये आवळ्याचा समावेश केल्याने आरोग्याचे अनेक फायदे मिळू शकतात. आवळा पावडर, आवळा कँडीज किंवा सुका आवळा हे रोजच्या सेवनासाठी सोयीचे पर्याय आहेत.

त्वचेचे आरोग्य सुधारते

आवळ्यामधील उच्च व्हिटॅमिन सी सामग्री आणि ॲंटिऑक्सिडंट्स त्वचेच्या आरोग्यासाठी वरदान ठरतात. बनवतात. याच्या नियमित सेवनाने कोलेजन उत्पादनास प्रोत्साहन मिळते, जे त्वचेची लवचिकता राखते आणि वृद्धत्वाची लक्षणे कमी करते. हे शरीराला डिटॉक्सिफाय करून आणि जळजळ कमी करून मुरुम आणि इतर त्वचा विकार दूर करण्यास मदत करते.

डोळ्यांसाठी फायदेशीर

आवळ्यात व्हिटॅमिन ए आणि कॅरोटीनचे प्रमाण जास्त असल्यामुळे डोळ्यांच्या आरोग्यासाठी तो फायदेशीर आहे. व्हिटॅमिन ए आणि कॅरोटीन पोषक दृष्टी सुधारतात आणि मोतीबिंदूचा धोका कमी करतात. आवळ्याचे नियमित सेवन केल्याने डोळ्यांचे संपूर्ण आरोग्य राखण्यास आणि डोळ्यांचा ताण कमी होण्यास मदत होते.

मानसिक आरोग्यास चालना

आवळ्याचे समृद्ध पौष्टिक घटक मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत करतात. त्यातील ॲंटिऑक्सिडंट्स मेंदूतील ऑक्सिडेटिव्ह ताण कमी करण्यास मदत करतात, संज्ञानात्मक कार्य सुधारतात आणि न्यूरोडीजेनेरेटिव्ह रोगांचा धोका कमी करतात. आवळ्यामध्ये फायटोन्यूट्रिएंट्स देखील असतात, ज्यामुळे एकाग्रता आणि स्मरणशक्तीत वाढ होते.

कसा करावा आहारात समावेश?

कच्चा आवळा

कच्चा आवळा खाणे हा आपल्या आहारात समाविष्ट करण्याचा सर्वात सोपा मार्ग आहे. तो जसा आहे तसा सेवन केला जाऊ शकतो किंवा त्याची चव वाढविण्यासाठी आपण थोडे मीठ किंवा मध शिंपडू शकता.

आवळा रस

आवळा रस हा आणखी एक सोयीस्कर पर्याय आहे. ताजा आवळा पाण्यात मिसळून आणि मिश्रण गाळून घरी बनवता येते. आवळ्याचा रस रोज प्यायल्याने त्याचे आरोग्य फायदे मिळू शकतात.

पावडर

आवळा पावडर बहुगुणी आहे. ती ज्यूस किंवा सॅलडवर शिंपडता येते.

आवळा कँडी आणि सुका आवळा

ज्यांना गोड पदार्थ आवडतात त्यांच्यासाठी आवळा कँडी आणि सुका आवळा हे उत्तम पर्याय आहेत. ते स्टोअरमध्ये उपलब्ध आहेत आणि स्नॅक म्हणून वापरले जाऊ शकतात. तुमच्या दैनंदिन आहारात आवळा समाविष्ट केल्याने रोगप्रतिकारशक्ती आणि पचनशक्ती वाढवण्यापासून केस आणि त्वचेच्या आरोग्याला चालना देण्यापर्यंत अनेक आरोग्य फायदे मिळू शकतात. कच्चा, रस म्हणून किंवा चूर्ण स्वरूपात, आवळा हे एक बहुगुणी आणि प्रभावी फळ आहे जे आपल्या एकूण आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहे. त्यामुळे आवळा हा तुमच्या दैनंदिन आहाराचा भाग बनवा.

सोलापूर तरुण भारत Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. २२ ऑक्टोबर २०२४

धार्मिक कार्यक्रमात सोन्याचे मंगळसूत्र हिसकावले

छत्रपती संभाजीनगर, : सिडको परिसरातील एका लॉन्समध्ये सुरू असल्या धार्मिक कार्यक्रमातून महिलेचे २ लाख ४० हजार रुपयांचे मंगळसूत्र लंपास झाल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी सिडको एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सुभद्रा जयनारायण मंत्री रा. वसुंधरा कॉलनी सिडको एन ७ यांनी फिर्याद दिली. २० ऑक्टोबर रोजी सकाळी दहा ते दुपारी एक च्या दरम्यान त्या सिडको जालना रोड परिसरातील एका लॉन्सवर सुरू असलेल्या गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज यांच्या कथेच्या कार्यक्रमात गेल्या होत्या. महिलांच्या गर्दीत अज्ञात चोरट्याने २ लाख ४० हजार रुपये किंमतीचे मंगळसूत्र लबाडीने चोरून घेतले. याप्रकरणी सिडको एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

६० वर्षीय वृद्धाने केला महिलेचा विनयभंग

छत्रपती संभाजीनगर : वाईट उद्देशाने महिलेला स्पर्श करीत एका ६० वर्षीय वृद्धाने विनयभंग केल्याची घटना बायजीपुरा परिसरात घडली. या प्रकरणी आरोपीवर जिन्सी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अब्दुल माजीद अब्दुल हाफिस (वय ६०) रा. बायजीपुरा असे आरोपीचे नाव आहे. या प्रकरणी महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार १८ सप्टेंबर रोजी रात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास आरोपीने महिलेच्या अंगाला स्पर्श करून वाईट उद्देशाने विनयभंग केला. हात पकडून तू मुझे खुश कर दे असे म्हणत अश्लील संभाषण केले. या प्रकरणी जिन्सी पोलीस पुढील तपास करीत आहेत.

सहकारी महिलेचा विनयभंग

छत्रपती संभाजीनगर : ड्युटीवर का आल्या नाही असे म्हणत पीडित महिलेच्या सहकाऱ्याने पीडितेशी अश्लिल चाळे करुन दमदाटी केल्याची घटना १६ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा वाजेच्या सुमारास घाटी रुग्णालयातील विकृतिशास्त्र विभागाच्या ओपीडीत घडली. योगेश पाटील (रा. गणेश टेकडी, पहाडसिंगपुरा) असे दमदाटी करणाऱ्याचे नाव आहे. प्रकरणात पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीनूसार, पीडिता व आरोपी हे दोघे सुरक्षा सहाय्यक म्हणून घाटी महाविद्यालय व रुग्णालयात कर्तव्यावर आहेत. १६ ऑक्टोबर रोजी पीडिता ही कर्तव्यावर हजर असतांना तेथे योगश पाटील आला व त्याने पीडितेकडे विक्षीप्त नजरेने बघून अश्लिल पद्धतीने स्पर्श केला. व दंड धरुन मोठ्या आवाजात सोमवारी तुमची ड्युटी होती, तुम्हाला समजत नाही का, तुम्ही ड्युटीसाठी का आला नाहीत, असे म्हणून दमदाटी केली. प्रकरणात बेगमपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

देशी दारुची चोरटी विक्री

छत्रपती संभाजीनगर : अवैधरित्या देशी दारूची विक्री करणारी मिना सुनील गायकवाड वय ३० रा. मुकुंदनगर, मुकुंदवाडी हिला पोलिसांनी पकडले असून तिच्याकडून १६८० रूपये किंमतीची दारू हस्तगत करण्यात आली आहे. ही कारवाई १९ ऑक्टोबर रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास करण्यात आली.

खट्याळ पिट्या...

१०८ औरंगाबाद(पश्चिम) विधानसभा स्वीप उपक्रम

मतदान करणे हे आपले आद्यकर्तव्य- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.२१(जिमाका):- देशाचे युवक हे देशाचे भविष्य आहेत. तेव्हा आपले भवितव्य ठरवणारे आपले लोकप्रतिनिधी कोण असणार याची निवड करण्याची संधी ही आपल्याला निवडणूकीच्या निमित्ताने मिळते. यासंधीचे सोने करीत आपण आपला मतदानाचा हक्क बजावावा,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज एमआयटी महाविद्यालयात केले.

एमआयटी येथे आज १०८ औरंगाबाद (पश्चिम) विधानसभा मतदार संघा अंतर्गत स्वीप अर्थात मतदार जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी उमाकांत पारधी, एमआयटीचे महासंचालक मुनिश शर्मा, उपकुलसचिव मकरंद वैष्णव, स्वीप नोडल अधिकारी दीपाली थावरे आदी यावेळी उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या संगित विभागाच्या विद्यार्थ्यांनी मतदार जनजागृतीपर भारुड व गीते सादर करुन उपस्थितांना मतदानाचे महत्त्व पटवून दिले. तसेच मतदार जनजागृतीनिमित्त आयोजित विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरणही जिल्हाधिकारी स्वामीयांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या संबोधनात जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, आपले मतदान करणे हे जिवंतपणाचे लक्षण आहे. युवकांनी आपला मतदानाचा हक्क अवश्य वापरायला हवा. मतदानाप्रति युवकांमध्ये उत्साह असायला हवा. त्यांनी आपल्या मताचा हक्क वापरतांना आपल्या सभवतालच्या लोकांनाही मतदानासाठी प्रेरित करावे,असे आवाहन त्यांनी केले.

टपाली मतदानासाठी सुविधा उपलब्ध करून द्याव्या-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.२१(जिमाका):- जेष्ठ नागरिक वय वर्षे ८५ पेक्ष जास्त, निवडणूक कर्तव्यावर असणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांना टपाली मतदान प्रक्रियेची सुविधा सहज आणि सोपी पद्धतीने उपलब्ध व्हावी यासाठी नियुक्त अधिकारी कर्मचाऱ्यांनी एकाही मतदाराचे मतदान राहणार नाही याची काळजी घेऊन सुविधा उपलब्ध करून द्यावी,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.

जिल्ह्यातील नऊ विधानसभा मतदार संघातील टपाली मतदान प्रक्रियेतील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाचे आयोजन नियोजन समिती सभागृहात करण्यात आले. उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके, नोडल अधिकारी चंद्रकांत पाटील, प्रादेशिक पर्यटन अधिकारी प्रभोदय मुळे, राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक संतोष झगडे यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, टपाली मतदान प्रक्रियेतील फॉर्म, विविध नमुने व त्यातील माहिती भरणे, गृह मतदानाच्या दरम्यान मतपत्रिकांचे नियोजन करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे पोलीस, होमगार्ड, रेल्वे यामध्ये नियुक्त कर्मचारी व अधिकाऱ्यांचे टपाली मतदान प्रक्रिया करण्यासाठी सर्व संबंधित माहितीचे संकलन करून संबंधितांना टपाली मतपत्रिका वाटप आणि त्यांचे मतदान करून घेणे आवश्यक आहे. गृह मतदान करून घेत असताना निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे सर्व कार्यवाही पार पाडावी.पोलीस अधीक्षक ग्रामीण आणि पोलीस आयुक्त कार्यालयाने पोलीस विभागातील नियुक्त अधिकारी कर्मचाऱ्यांचे टपाली मतदान प्रक्रियेचा संकलित माहिती करून मतदानाच्या नियोजनासाठी डेटा उपलब्ध करून द्यावा,असेही निर्देश देण्यात आले.

विधानसभेनंतर पदवी परीक्षा जाहीर

दिवाळीच्या सुट्ट्या २६ ऑक्टोबरपासून: पदवी परीक्षाही निवडणुकीनंतर

छत्रपती संभाजीनगर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमांच्या सत्र परीक्षा आता विधानसभा निवडणूक निकालानंतर म्हणजेच २६ नोव्हेंबरपासून घेण्यात येणार आहेत. अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. भारती गवळी यांनी दिली. कुलगुरु डॉ. विजय फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाचे संपूर्ण वेळापत्रक यंदा एप्रिलमध्येच जाहीर करण्यात आले.

१५ जून ते २५ ऑक्टोबर या काळात प्रथम सत्र असणार आहे. विद्यापीठातील पदव्यूत्तर विभाग व संलग्नित महाविद्यालयांना येत्या २६ ऑक्टोबरपासून दिवाळी सुट्ट्या जाहीर करण्यात आल्या आहेत. अशी माहिती शैक्षणिक विभागाचे उपकुलसचिव डॉ. गणेश मंझा यांनी दिली. विद्यापीठातील पदव्यूत्तर विभाग व धाराशिव उपपरिसरास २६ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर या दरम्यान सुट्ट्या राहतल. हे विभाग ११ नोव्हेंबर रोजी सुरु होणार असून १ मे पर्यंत द्वितीय सत्र असणार आहे. तर संलग्नित महाविद्यालयांच्या २६ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर या दरम्यान दिवाळी सुट्ट्या असणार आहेत. तर १६ नोव्हेंबर ते १ मे २०२५ या काळात द्वितीय सत्र असणार आहे.

पदवी परीक्षा विधानसभेनंतर पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षाही दिवाळीनंतर तसेच विधानसभा निवडणुकीनंतर होणार आहेत. पुर्वी या परीक्षा १२ नोव्हेंबर रोजी सुरु होणार होत्या. मात्र आता या परीक्षा निवडणुक निकालानंतर होणार आहेत. पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा २६ नोव्हेंबर पासून सुरु होणार आहेत. यामध्ये सर्व परंपरागत अभ्यासक्रमांच्या परीक्षा असणार आहेत. तर पदव्यूत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात होणार आहेत, अशी माहिती परीक्षा विभागातील कोऑडिनेशन युनिटचे सहायक उपकुलसचि भगवान फड यांनी दिली.

नोव्हेंबर महिन्यात विभागीय लोकशाही दिनाचे आयोजन नाही

छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ ची आदर्श आचारसंहिता १५ ऑक्टोबर, २०२४ पासून लागू केलेली असून ती विधानसभा निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत म्हणजे २५ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत लागू राहणार असल्याचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत. आचारसंहिता कालावधीत निवडणुकीचे वेळापत्रक घोषित केल्याच्या दिनांकापासून ते निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत विभागीय आयुक्त कार्यालयात प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आयोजित करण्यात येणारा विभागीय लोकशाही दिन शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार आयोजित करण्यात येणार नाही याची नोंद घेण्याचे आवाहन सामान्य प्रशासन विभागाचे अपर आयुक्त जगदिश मिनीयार यांनी केले आहे.

पोलीस आयुक्तालयात पोलीस स्मृतिदिन

छत्रपती संभाजीनगर : येथील पोलीस आयुक्तालयात पोलीस स्मृतीदिनानिमित्ताने दिवंगत पोलीस शहिदांना आणि जवानांना अभिवादन करण्यात आले. २१ ऑक्टोबर १९५९ रोजी लडाख येथे चीनच्या सैनिकासोबत लढतांना केंद्रीय राखीव दलाच्या दहा जवानांनी प्राणाची आहुती दिली होती.

देशासाठी आपले कर्तव्य बजावताना आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शूर पोलिसांचे स्मरण ठेवण्यासाठी हा दिवस स्मृती दिन म्हणून आयोजित केला जातो. वर्षभरात जे जवान देशात आणि राज्यात शहीद होतात, अशा जवानांना या दिवशी श्रद्धांजली वाहिली जाते. यानिमित्ताने छत्रपती संभाजी नगर पोलीस आयुक्तालयातील पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी

विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा, पोलीस अधीक्षक विनय कुमार राठोड, राज्य राखीव पोलीस दलाचे विक्रम साळे, पोलीस उपायुक्त प्रशांत स्वामी, पोलीस उपयुक्त नवनीत कांवत, सहाय्यक पोलीस आयुक्त रणजीत पाटील, अविनाश आघाव व इतर पोलीस अधिकाऱ्यांनी पुष्पचक्र अर्पण केले. यावेळे माजी खासदार चंद्रकांत खैरे माजी महापौर नंदकुमार घोडेले, गजानन बारवाल माजी नगरसेविका प्रीती शिंदे यांनीही स्मृतिसंभाला पुष्पचक्र अर्पण करून मानवंदना करण्यात आली. पोलीस जवानांनी हुतात्म्यांना हवेत बंदुकीच्या तीन फेऱ्या धाडून श्रद्धांजली अर्पण करुन शहिदांना अभिवादन केले.

अ.भा. पूर्व सैनिक सेवा परिषदेचे अधिवेशन उत्साहात

छत्रपती संभाजीनगर : अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेच्या महाराष्ट्र व गोवा राज्याचे वार्षिक अधिवेशन छत्रपती संभाजीनगर येथील समर्पण या संघाच्या प्रांत कार्यालयात रविवारी संपन्न झाले. याचे उद्घाटन भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेच्या महाराष्ट्र व गोवा राज्याचे अध्यक्ष एअर मार्शल प्रदीप बापट (निवृत्त) यांचे हस्ते झाले. समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून देवगिरी प्रांत संघ चालक अनिल भालेराव आणि प्रांत कार्यवाह धनंजय धामणे यांची मुख्य उपस्थिती होती.

उद्घाटनपर भाषणात अध्यक्ष प्रदीप बापट यांनी संपर्क, आंतरिक सुरक्षा, वीर ग्राम योजना, सदस्य संख्या वाढविणे यावर भर दिला. त्यांनी पंचकर्म म्हणजे कुटुंब प्रबोधन, समरसता, नागरिक शिष्टाचार आणि स्वबोध जागरण, पर्यावरण याचे महत्व सांगितले. जीवन मूल्यावर आधारित परिवार व्यवस्था उभी करणे, पर्यावरणाला

पोषक जीवनशैलीचा प्रसार, व्यक्तिगत परिवारात सामाजिक जीवनात समता - समरसतेचा अवलंब, सर्वप्रकारे स्वदेशीचा अर्थात जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात' स्व 'चे प्रकटीकरण, तसेच दैनंदिन जीवनात नागरिक कर्तव्याचे पालन या पंचकर्म पाच विषयावर पुढील काळात काम करावे असे आवाहन यावेळी केले.प्रमुख पाहुणे म्हणून देवगिरी प्रांत चे संघचालक अनिल भालेराव यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषद यांच्या समन्वयाविषयी विचार थोडक्यात विषद केले. तसेच राष्ट्रीय कार्यात अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेचे महत्व यावर पण भाष्य केले. दुपारच्या सत्रामध्ये विदर्भ, मराठवाडा, मुंबई, गोवा मधील प्रांताध्यक्ष यांनी आपल्या भागातील कार्याचा अहवाल सादर केले. मातृशक्ती अंतर्गत पूनम कुमारी यांनी विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेजर विनय देवगावकर यांनी केले. सर्जन कॅप्टन मोहन रोटे यांनी सर्वांचे आभार मानले. राज्याचे संघटन मंत्री रमेश देसाई यांनी समारोप भाषण केले. राष्ट्रगीताने एक दिवसीय अधिवेशनाची सांगता झाली.

शिक्षकांनो,मुलांचे पालक व्हा : रमेश ठाकूर

मूलभूत वाचन क्षमता विकास प्रशिक्षण संपन्न

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२१ ऑक्टोबर - वाचन माणसाचा आत्म सन्मान आहे.ज्याला वाचता आलं त्याला शिक्षकांची गरज नाही तो आपोआप शिकतो. त्याचे पराअलंबित्व कमी होत. ज्याला वाचता येत त्याला लिहणं अवघड नाही.वाचता येन म्हणजे डिकॉडिंग आहे. मुलाला वाचणापर्यंत घेऊन जाण्याचे ध्येय शिक्षकांनी ठेवावे. जादूची कांडी फिरवी तसें वाचता येत नाही. मला वाचता आलं पाहिजे अशी उत्सुकता शिक्षकांनी मुलानंमध्ये निर्माण केली पाहिजे.ज्या पालकांना मुलांकडे लक्ष देता येत नाही,त्यांचे तुम्ही पालक व्हा असे आवाहन छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचे शिक्षण विस्तार अधिकारी रमेश ठाकूर यांनी केले.

छत्रपती संभाजीनगर येथील महात्मा गांधी स्मारक निधी सभागृहात कन्नड व सिल्लोड तालुक्यातील शिक्षकांनी

स्वयप्रेरणेने आयोजित केलेल्या 'मूलभूत वाचन क्षमता विकास प्रशिक्षण' मध्ये उदघाटक म्हणून ते बोलत होते. यावेळी प्रशिक्षक स्मिता तलवारे व अनुराधा पाटील, महात्मा गांधी स्मारक निधी समितीचे व्यवस्थापक प्रा. डॉ. मच्छिन्द्र गोर्डे,महात्मा फुले हायस्कुलचे मुख्याध्यापक डॉ. रुपेश मोरे, सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्रवण, भाषण संभाषण व नंतर वाचन असे वाचनाचे टप्पे असून प्रत्येक टप्प्यात शिक्षकांनी काय करणे अपेक्षित आहे या बाबत प्रशिक्षक स्मिता तलवारे व अनुराधा पाटील यांनी सकाळी नऊ ते सायंकाळी चार वाजे पर्यंत विविध खेळणी, भाषा पट्टी, चित्रे यांचा उपयोग करून सविस्तर प्रशिक्षण दिले.या प्रकारे विद्यार्थ्यांना शिकवले तर मुलांना ४० ते ९० दिवसात १०० टक्के वाचन करता येईल असे त्यांनी सांगितले. शिक्षकांनी आपल्या प्रदीर्घ सेवेत अनेक विद्यार्थी घडवले असतील, त्यांचे यश आपण टक्क्यात मोजतो,मात्र त्यातील एक विद्यार्थी जरी वाचता न येणारा राहून गेला तर त्याच्या कुटुंबाचे १०० टक्के नुकसान आहे. अशा विद्यार्थ्यांची वाचन क्षमता विकसित करण्यात मोठे समाधान मिळते,या प्रशिक्षणाचा वापर करून सर्व शिक्षकांनी मुलांची वाचन क्षमता, एक चळवळ म्हणून विकसित करावी अशी अपेक्षा श्री ठाकूर यांनी व्यक्त केली.कन्नड, सिल्लोड व छत्रपती संभाजी नगर तालुक्यातील ५५ शिक्षक व शिक्षिका प्रशिक्षणाला उपस्थित होते.महात्मा फुले प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अफसर शेख यांनी मनोगत व्यक्त केले.संजय त्रिभुवन यांनी आभार मानले.

अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेच्या महाराष्ट्र व गोवा राज्याचे वार्षिक अधिवेशन संपन्न

छत्रपती संभाजीनगर : आज दिनांक २० ऑक्टोबर रोजी सकाळी नऊ वाजता अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेच्या महाराष्ट्र व गोवा राज्याचे वार्षिक अधिवेशन छत्रपती संभाजीनगर येथील समर्पण या संघाच्या प्रांत कार्यालयात संपन्न झाले. याचे उद्घाटन भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेच्या महाराष्ट्र व गोवा राज्याचे अध्यक्ष एअर मार्शल प्रदीप बापट (निवृत्त) यांचे हस्ते झाले. समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून देवगिरी प्रांत संघ चालक अनिल भालेराव आणि प्रांत कार्यवाह धनंजय धामणे यांची मुख्य उपस्थिती होती.

उद्घाटनपर भाषणात अध्यक्ष प्रदीप बापट यांनी संपर्क,आंतरिक सुरक्षा, वीर

ग्राम योजना,सदस्य संख्या वाढविणे यावर भर दिला. त्यांनी पंचकर्म म्हणजे कुटुंब प्रबोधन,समरसता, नागरिक शिष्टाचार आणि स्वबोध जागरण,पर्यावरण याचे महत्व सांगितले.जीवन मूल्यावर आधारित परिवार व्यवस्था उभी करणे,पर्यावरणाला पोषक जीवनशैलीचा प्रसार, व्यक्तिगत-परिवारात - सामाजिक जीवनात समता- समरसतेचा अवलंब, सर्वप्रकारे स्वदेशीचा अर्थात जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात ' स्व 'चे प्रकटीकरण,तसेच दैनंदिन जीवनात नागरिक कर्तव्याचे पालन या पंचकर्म पाच विषयावर पुढील काळात काम करावे असे आवाहन यावेळी केले.प्रमुख पाहुणे म्हणून देवगिरी प्रांत चे संघचालक अनिल भालेराव यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषद यांच्या समन्वयाविषयी विचार थोडक्यात विषद केले. तसेच राष्ट्रीय कार्यात अखिल भारतीय पूर्व सैनिक सेवा परिषदेचे महत्व यावर पण भाष्य केले. दुपारच्या सत्रामध्ये विदर्भ,मराठवाडा,मुंबई,गोवा मधील प्रांताध्यक्ष यांनी आपल्या भागातील कार्याचा अहवाल सादर केले.मातृशक्ती अंतर्गत पूनम कुमारी यांनी विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेजर विनय देवगावकर यांनी केले.सर्जन कॅप्टन मोहन रोटे यांनी सर्वांचे आभार मानले.राज्याचे संघटन मंत्री रमेश देसाई यांनी समारोप भाषण केले.राष्ट्रगीताने एक दिवसीय अधिवेशनाची सांगता झाली.

पेट- च्या ओ.एम.आर. शिट्स देण्याची विद्यापीठाकडे प्रा. गोपनारायण यांची मागणी

छत्रपती संभाजीनगर : त्यागमूर्ती रमाई बहुउद्देशीय प्रतिष्ठान चे अध्यक्ष प्रा. शिलवंत गोपनारायण यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू, प्र-कुलगुरू व कुलसचिव, उपकुलसचिव यांना ई मेल द्वारे मागणी केली की, ०३ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या शेवटच्या पेट परीक्षा-२०२४ परीक्षार्थीना दिली जाणारी ओ. एम.आर. सीट ने दिल्याने अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने परीक्षार्थीना हरकती नोंदवण्याकरिता नेमक्या कोणत्या प्रश्नाबद्दल हरकत नोंदवायची हे कळणे मुस्किल होत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे उपकुलसचिव मोरे व डॉ. प्रविण यन्नमवार यांचेशी प्रा. गोपनारायण यांनी दूरध्वनीवरून संपर्क केला असता त्यांनी सांगितले की, परीक्षार्थीना प्रश्न पत्रिका, उत्तरपत्रिका व ग्रीवीयन्स फॉर्म आम्ही दिलेले आहेत त्यावरून परीक्षार्थी उत्तरांसंदर्भात हरकती नोंदवू शकतात परंतु वास्तविक पाहता जचठ शिवाय हरकती नोंदवणे शक्यच नसल्याचे आहे. परीक्षार्थीचे म्हणणे करीता प्रा.गोपनारायण यांनी ई-मेल द्वारे मागणी केली की, जचठ देऊन परिक्षार्थीना दिलासा द्यावा व पेट परीक्षा-२०२४ अधिक पारदर्शक व्हावी. जचठ शीट दिल्यानंतर हरकती नोंदवण्याकरिता किमान १० दिवसांचा कालावधी वाढवून देणून उपकृत करावे अशी सुद्धा रास्त मागणी ईमेल द्वारे केली आहे.

www.tarunbharat.net
तरुण भारत
छोटे उस्ताद
मंगळवार, दि. २२ ऑक्टोबर २०२४

तुम्हाला माहिती आहे का?

- सामान्य प्रौढ व्यक्तीच्या हृदयाचे दर मिनिटाला ७२ ठोके पडतात.
- जागतिक पोलिओ दिवस २४ ऑक्टोबरला साजरा केला जातो.
- शुभमन गिल हा एकदिवसीय क्रिकेटमध्ये द्विशतक करणारा सर्वाधिक युवा खेळाडू आहे.
- आपल्या देशात फक्त तेलंगणामध्ये शेतीक्षेत्राला २४ तास अखंड वीजपुरवठा केला जातो.

अशी पाखरे येती

निशिकांत मायी / ९८८११५२४३९

शिकारी पक्षी 'शिकरा'

झाडाच्या एखाद्या फांदीवर बसून टेहळणी करीत, काही कळायच्या आत झडप घालून भक्ष्याला धोक्याची जाणीवही होऊ न देता पकडतात आणि डोळ्यांची पापणी लवते न लवते तोच आपले सावज घेऊन झाडावरील घरट्याकडे पलायनही करतात. हेच शिकारी पक्षी शिकरा या नावाने ओळखले जातात. विरळ झाडाझुडुपांनी वेढलेल्या ठिकाणी किंवा मानवी वस्तीतसुद्धा आढळून येणारा शिकरा, लहानसहान पक्षी, सरडे आणि पालींवर तुटून पडतो. इतकंच काय, इतर पक्ष्यांची अंडीही पळवतो. शिकरा वरतून गडद तपकिरी आणि फिकट करड्या रंगाचा दिसतो. पोटाकडून पिवळट असून, त्यावर अधून-मधून काळे पट्टेही दिसतात. 'ॲक्सिपिटर बॅडियस' असं शास्त्रीय नाव असलेल्या, शिकराच्या सहा प्रजाती असून, त्यातली एक जात भारतात कायम निवासी आहे. त्याचमुळे, भारतात तो सर्वत्र आणि हिमालयातही आढळतो. त्याला पाहताच ससाणा या पक्ष्याची आठवण यावी, इतके त्यांच्यात साम्य आहे. पण, कर्कश्श अशी दुहेरी शीळ आणि पंखांची फडफड यामुळे तो सहज ओळखता येतो. हा पक्षी साधारण २६ ते ३० सेंमी लांबीचा असून शेपटी अरुंद आहे. त्यावर काळसर पट्टे दिसतात. पाठीचा भाग राखडी असतो. हनुवटी व गळा पिवळसर असून, त्यांच्यावर मध्यभागी गडद पट्टा असतो. आकारमानाने मादी नरापेक्षा मोठी असते. नराची बुबुळे लाल तर मादीची नारिंगी असतात. विरळ वनांमध्ये, जंगलात तसेच झाडीत राहणारे शिकरा घनदाट वनात राहणे टाळतात. कधी एकटे तर कधी जोडीने विहार करून लहान पक्षी, सरपटणारे प्राणी, उंदीर, बेडूक, टोळ इत्यादींना आपले भक्ष्य बनवतात. शिकरा दिसला की, जवळपासच्या खारी आणि इतर पक्षी भीतीने ओरडून इतरांना सूचना देतात. कारण, शिकरा अतिशय धाडसी आणि तेवढाच क्रूर आहे. उन्हाळ्यामध्ये त्यांचा वीणीचा हंगाम असतो. नर आणि मादी या कालावधीपूर्वी घरटे करतात. आंबा, वड किंवा एखाद्या झाडाच्या शेंड्याजवळ दाट पानांत बांधलेले हे घरटे धातूच्या तारांचा वापर करून, मजबूत केलेले असते. त्याच ठिकाणी मादी शिकरा तीन ते चार अंडी देते. साधारणपणे दोन ते आठ वर्षांपर्यंत या पक्ष्याचे आयुर्मान असते. महाराष्ट्रातही या शिकरा पक्ष्यांचं वास्तव्य असून, खेडेगावात तर तो कोंबडीची पिल्लंही उचलून नेतो. या पक्ष्यांना प्राचीन इतिहास असून राजेमहाराजे शिकरे पाळून, त्यांना शिकारीसाठी तयार करायचे, असे उल्लेख आढळतात.

बंडूचे स्वप्न

नेहमीप्रमाणे एकदा, गाढ झोपला बंडू
स्वप्नात आल्या फळभाज्या, लागल्या त्याला भांडू
गोल गोल आकाराचे, रागावून म्हणाले बीट
रक्त वाढते माझ्यामुळे, खात जा मला निट
एकत्र येऊन बोलला, गाजर नि मुळा
आम्हाला तू खात नाही, किती रे तू खुळा ?
कारले म्हणाले, चव माझी कडू
म्हणून का रे येते, मला पाहून रडू ?
लाल टोमॅटो म्हणाले, ताटात असाव्यात फोडी
जेवतांना येते मग, न्यारीच गोडी
काकडी,कोबी म्हणाल्या, खात जा आमची कोशिंबीर
विविध जीवनसत्त्व आमच्यात, नको जेवतांना किरकिर
जाग आल्यावर बंडू , थोडा गोंधळून गेला
हात पाय धुवून, जेवायला बसला
ताटातील सर्व भाज्या, बंडूने केल्या फस्त
गोड हसत म्हणाला, जेवण झाले मस्त

- रवींद्र चालीकवार/९०११५५९१०६

आभाळातील रात्रशाळा

काळ्याकुट्ट धूळ पाटीत, केली लिखापढी
चमचमीत अक्षरांची, लिहिली बाराखडी
भरली मोठ्ठी रात्रशाळा, आभाळाच्या गावी
नाही त्याला दार कुलूप, नाही त्याला चावी
उजाडूनी दिवस येता, फळा होतो निळा
मावळूनी सूर्य जाता, रंग लेतो काळा
बिना दप्तराचा पायी, येई चांदो बाळा
कुणा अशी नवलाची, नको वाटते शाळा
कोण तिथे वठवी जाणे, गुरुजींचा हुद्दा
अजून कोणी उपस्थित, केला नाही मुद्दा

- भानुदास धोत्रे/७९७२६२५०८६

चित्र बोध कोडे

वंडर गर्ल
जीविका मयूर येंडे

बालमित्रांनो, आजची वंडर गर्ल अवघी सहा वर्षांची आहे. लहानपणापासूनच स्वप्न बघताना ती मोठी स्वप्न बघते. आजोबा पद्माकर हे तिचे प्रेरणास्थान आहेत. वडील महेंद्र कंपनीत जॉब करतात. जीविका स्कूल ऑफ स्कॉलर्स या शाळेची विद्यार्थिनी आहे. जेमतेम पाच वर्षांची असतानाच तिने वडिलांच्या ऑफिसमध्ये 'मी हाय कोळी' या गाण्यावर नृत्य केलं. त्याची तयारी तिने युट्यूब वर बघून केली होती. या सादरीकरणासाठी तिला भरघोस बक्षीस मिळाली. नृत्यामध्ये तिचे मार्गदर्शक मनीष पाटील सर आहेत. कविवर्य सुरेश भट सभागृहामध्ये अखिल भारतीय सांस्कृतिक नृत्य महोत्सवातदेखील तिने बक्षीस प्राप्त केलं. आता तर 'विदर्भ टॅलेंट आयकॉन' या स्पर्धेच्या पाच ते दहा वर्षे वयोगटातील ती पहिली मानकरी ठरली आहे. जीविका उत्तरोत्तर नृत्यामध्ये प्रगती करते आहे. पण, ती फक्त नृत्य करत नाही तर योग, पोहणे, असे सगळे धाडसी उपक्रम त्यात ती सहभागी होते जीविका चांगली चित्रकार देखील आहे तिच्या वडिलांना वॉल पेंटिंग मध्ये ती मदत करते, अतिशय धाडसी अशी जीविका तिला सोनाली शाळेतील शिक्षिका प्रोत्साहन देतात म्हणून त्या तिला खूप आवडतात फक्त सहाव्या वर्षापर्यंत एवढी प्रगती करणारी जीविका यांनी अशीच प्रगती करत राहो, तिला यश मिळो याकरिता वडील मयूर आणि आई रजनी हे दोघेही उत्साहाने प्रत्येक स्पर्धेमध्ये तिला भाग घेण्यास सहकार्य करतात, तरुण भारतचा छोटा उस्ताद तिला प्रोत्साहन देतो आणि शुभेच्छा देखील देतो.

संजय पेंडसे/९४२२४४३२९५

'विदर्भ टॅलेंट आयकॉन' या स्पर्धेच्या पाच ते दहा वर्षे वयोगटातील ती पहिली मानकरी ठरली आहे. जीविका उत्तरोत्तर नृत्यामध्ये प्रगती करते आहे. पण, ती फक्त नृत्य करत नाही तर योग, पोहणे, असे सगळे धाडसी उपक्रम त्यात ती सहभागी होते जीविका चांगली चित्रकार देखील आहे

एक लिंबू झेलू बाई...

अलका मोकाशी/९९६७८१७८७६

पखा मी लिंबू कापता कापता गाणं गुणगुणत होते,

एक लिंबू झेलू बाई,
दोन लिंबू झेलू

गाण्यातला उत्साह पाहून लेक म्हणाली, काय गं आई ! लिंबू पाहिल्याबरोबर भुलाबाईचं गाणं आठवलं का? मी म्हणाले, हो गं, आता कोजागिरी पौर्णिमा आलीय ना जवळ! आपोआप भुलाबाईची गाणी ओठावर यायला लागतात. तर ती म्हणाली, आपण नेहमी भुलाबाई बसवतो. पण, ही भुलाबाई का बसवायची आणि ही गाणी कशासाठी गायची? मला कळतंच नाही.

'अगं पूर्वी म्हणजे आमच्या लहानपणी भाद्रपद पौर्णिमेपासून ते अश्विन पौर्णिमेपर्यंत अशी महिनाभर कोजागिरी साजरी व्हायची. त्याला भोंडला असेही म्हणतात. हा सण फक्त महाराष्ट्रातच साजरा केला जातो हे विशेष! काही वर्षांपासून महिना म्हणता म्हणता पाच दिवस आणि आता तर एक दिवसही हा सण साजरा करणं लोकांना कठीण झालं आहे. कारण, कुणाला वेळच नसतो. जुनी, मोठी मंडळी घरी असतील तर भुलाबाई म्हणजे मातीची शंकरपार्वतीची मूर्ती! त्यात पार्वतीच्या मांडीवर गणपती बसलेला अशी मूर्ती विकत आणून घरोघरी तिची पूजा केली जाते .

भुलाबाई म्हणजे पार्वती आणि भूलोजी म्हणजे भगवान शिव! याच्यामागे पौराणिक कथा आहे. एकदा महादेव आणि पार्वती दोघे सारीपाट खेळत होते आणि महादेव हरले. पण, ते मान्य न करता, तू कट करून जिंकलीस म्हणून ते माता पार्वतीला दोष देऊ लागले. देवी शक्तीवर रुसून ते धरतीवर येतात. तेव्हा पार्वती त्यांचा राग शांत करण्यासाठी भिल्लीणीचं रूप घेऊन त्यांच्यासमोर येते. भगवान शिव माता पार्वतीच्या त्या रुपाला भाळतात किंवा भुलतात. म्हणून त्याना भुलोजी राणा असं म्हणतात.

पूर्वीच्या काळी स्त्रिया, मूली घराबाहेर निघत नसत. या निमित्ताने त्या घरकामातून वेळ काढून एकत्र यायच्या. भुलाबाईची पूजा करून शंकर पार्वतीचे नामस्मरण आणि आराधना करायच्या. त्यावेळी त्या वेगवेगळे खेळ खेळायच्या. त्यामुळे, देवीच्या नामस्मरणाबरोबर त्यांची करमणूकसुद्धा होत असे.

एक लिंबू झेलू बाई, अक्कण माती चिक्कण माती अशी माती सुरेख बाई, यादवराया राणी रुसून बैसली कैशी अशी अनेक गाणी त्या गायच्या. त्यावेळी, सासुरवाशीणी फार बंधनात असायच्या. सासरच्या मंडळींना त्या उघड-उघड बोल लावू शकत नसे. मग मनाचा निचरा करण्यासाठी त्या गाण्याच्या माध्यमातून मन मोकळं करायच्या.

एके दिवशी काऊ आला बाई काऊ आला, झिपरं कुत्र सोडा गं बाई कोण पाहुणा आला गं बाई, सासरच्या वाटे कुचुकुचू काटे, कारल्याचं बी पेर गं सूनबाई, मग जा आपल्या माहेरा, अशी अनेक गाणी त्या नाचत गायच्या.

अडकित जाऊ खिडकीत जाऊ खिडकीत होता बत्ता,

भुलोजीला मुलगा झाला नाव ठेवा दत्ता... अशाप्रकारे यमक जुळवून गाण्याच्या रूपात भुलोजीच्या मुलाचं नाव ठेवलं जायचं. रोज वेगवेगळे पदार्थ बनवले जायचे. त्याला खिरापत म्हणतात.

बाणा बाई बाणा, गाणी संपली खिरापत आणा... असं म्हंटलं की, बंद डब्यात ठेवलेला खाऊ सगळे ओळखायचे. यादिवशी रात्री दूध आटवतात. चंद्राचे पवित्र प्रतिबिंब त्यात पडून चंद्राचा आशीर्वाद आणि चंद्रासारखी शीतलता प्राप्त व्हावी, असा त्यामागचा उद्देश असतो.

आपलं लक्ष्य गाठा!

स्वामी विवेकानंद यांनी विविध प्रसंगांमधून यशस्वी जीवनाची सूत्रं युवावर्गासाठी सांगितली आहेत. आम्ही खूप श्रम केले पण, यश मिळालं नाही, असं म्हणणाऱ्यांसाठी स्वामीजींनी एका प्रसंगी प्रभावी मार्गदर्शन केलं. काही लोक खूप मेहनत करतात पण, यशस्वी होत नाहीत. काय म्हणाले स्वामीजी?

एके दिवशी स्वामी विवेकानंदांच्या आश्रमात एक तरुण आला. तो खूप दुःखी दिसत होता. त्याने स्वामीजींना सांगितलं की,'मी जीवनात खूप दुःखी आहे. मी खूप मेहनत करतो पण, कधीच यशस्वी होत नाही. देवाने मला असे नशीब का दिले? मी सुशिक्षित आणि मेहनती असूनही यशस्वी का नाही? त्यावेळी, स्वामीजींकडे एक कुत्रा होता. स्वामीजी तरुणाला म्हणाले की, तू या कुत्र्याला फिरवून आण. मग, मी तुझ्या प्रश्नाचे उत्तर देतो.भारावल्यासारखा तरुण कुत्र्याला घेऊन गेला आणि जरा वेळाने परत आला. स्वामीजींनी त्याच्याकडे निरखून पाहिलं. तरुणाच्या चेहऱ्यावर उत्सुकता आणि उत्साह ओसंडून वाहत होता. तर, कुत्रा खूप थकलेला होता. स्वामीजींनी तरुणाला विचारलं की, कुत्रा एवढा थकलेला आणि तू मात्र उत्साही दिसतोयस. काय झालं?

तरुणाने सांगितले, मी तर सरळ आपल्या मार्गावरून चालत होतो. परंतु, हा तुमचा कुत्रा मात्र, इतर कुत्र्यांवर सतत भुंकत होता आणि त्यांच्यावर धावून जात होता. आम्ही दोघांनी सारखंच अंतर ओलांडलं. पण, या कुत्र्याने माझ्यापेक्षा जास्त धावपळ केली, आरडाओरडा केला आणि तो थकला.स्वामीजी हसत म्हणाले की, हेच तुझ्या प्रश्नांचे उत्तर आहे. तुझे लक्ष्य तुझ्या जवळपासच आहे. पण, तू लक्ष्यापर्यंत पोहचायचे सोडून इतर लोकांच्या मागे धावत राहतो आणि आपल्या लक्ष्यापासून दूर जातो. बहुतांश लोक इतरांच्या चुका शोधात राहतात आणि यशावर जळतात. आपले थोडेसे ज्ञान वाढवण्याचा प्रयत्न करत नाहीत आणि अहंकारात इतरांना महत्त्व देत नाहीत. याच विचारांमध्ये स्वतःचा अमूल्य वेळ आणि क्षमता दोन्ही गमावून बसतात. त्यांचे जीवन फक्त एक संघर्ष बनतो. आपल्या जीवनाचे लक्ष्य निर्धारीत करून, वाटचाल करत रहावी. हेच यशाचं गमक आहे.

बंटीची बंडखोरी

(भाग २५)

प्रीती वडनेरकर /९८२३९९४७९२

नवरात्रीची धूम संपली. सगळं रूटीन सुरू झालं. 'बंटी, नवरात्र, दसरा संपला की वेध लागतात दिवाळीचे! पण, मध्ये येते आश्विन पौर्णिमा म्हणजे कोजागिरी पौर्णिमा!' प्रेसला द्यायच्या कपड्यांच्या घड्या घालून बॅगमध्ये भरता भरता आई म्हणाली. 'हो नं... आपल्याकडे सणांची नुसती रेलचेल असते. पण, आता आमचं दहावीचं वर्ष संपलं की, आम्ह ज्युनिअर कॉलेजियन्स होणार. मग आम्हाला लहान मुलांचे खेळ खेळता येणार नाहीत. त्यामुळे याचवर्षी काय ते खेळ खेळून घ्यावे लागतील,' लॉन्ड्रीच्या कपड्यांच्या डायरीत डिटेल्स लिहिताना बंटी बोलत होता. 'तसं नाही हं बंटी...अरे, दहावीतून अकरावीत गेलात की, एकदम मोठं वगैरे होत नाही. दहावी झाल्यावर, बारावीचा एक मोठा टप्पा ओलांडावा लागतो. मग तुमची दिशा ठरते. उच्च शिक्षण, मग नोकरी, बिझनेस! खूप पल्ला गाठावा लागतो. जाऊ दे... इतक्यात कशाला त्याची चिंता? आता मस्त खा, प्या, अभ्यास करा आणि खेळा.'

'ओके आई ऽऽ आमची फुटबॉलची वेळ झाली. निघतो,' बंटीनं स्पोर्टस्चे कपडे आणि बूट चढवले. सायकलची किल्ली बोटानं फिरवत तो खाली गेला. फुटबॉल ग्राऊंडवर पहिल्यांदा वॉर्म अप आणि नंतर मॅचेस...अगदी सर्वांगसुंदर व्यायाम!

'यश, युग, शिरीष, स्वानंद, नंदू, चंदू... सगळ्यांनी थोडा वेळ थांबा. महत्त्वाच्या विषयावर बोलायचं आहे,' बंटीनं आपली सायकल आपल्या पार्किंग लॉटमधे ठेवता ठेवता म्हटलं. 'हे थांबलो सगळे... सांग आता काय सांगायचं आहे ते,' यश म्हणाला.

'दोस्तांनो, कोजागिरी पौर्णिमा जवळ आली आहे. त्यादिवशी आपण काय करतो, याची आठवण आहे का?' बंटीनं विचारलं. 'अं... मसाला दूध आणि कच्चा चिवडा खातो,' यशनं सांगितलं. 'हो बरोबर आहे आणि मुख्य म्हणजे रात्रभर जागरण करतो. गाणी, गप्पा, गोष्टी, गेम्स खेळतो. जिंकणाऱ्यांना बक्षीसेही देतो. राईट?' बंटीनं विचारलं.

'तर यावर्षी आपण इन्द्रप्रस्थसाठी खास कोजागिरी स्पेशल काही प्रोग्रॅम करू या का?' बंटी म्हणाला.

'हो चालेल! गुड आयडिया! करू या आपण,' शिरीषनं आपलं मत मांडलं. 'हो, तसे तर आपण पुष्कळ खेळ खेळू शकतो. पण, टेरेसवर साजरी करायची की, क्लब हाऊसमध्ये, त्यावर अवलंबून आहे,' स्वानंद म्हणाला. 'पण आधी सोसायटीच्या सेक्रेटरींना विचारायला पाहिजे. त्याची लेखी परवानगी घेणं आवश्यक आहे,' बंटी म्हणाला.

बंटी ग्रुपनं एक अर्ज लिहिला. त्यावर, बहुतांश सभासदांच्या सह्या घेतल्या आणि सेक्रेटरी काकांच्या हातात सुपूर्द केला. आश्चर्य म्हणजे, दुसऱ्या दिवशी क्लब हाऊसच्या नोटीस बोर्डावर त्यासंबंधी नोटीसही लागली. सोसायटीमध्ये कोजागिरी पौर्णिमा साजरी करण्यासाठी मनाई केल्याची नोटीस होती ती! बंटी ग्रुप ती नोटीस पाहून हिरमुसला. सारे जण सेक्रेटरीच्या घरी गेले. त्यांना तातडीची मिटिंग घेण्याची विनंती केली. 'हे बघा मुलांनो, गेल्याच वर्षी आपल्या शेजारच्या सायंतारा सोसायटीत, कोजागिरीला खूप गडबड झाली होती.' सेक्रेटरीकाका सांगू लागले. बंटी ग्रुपच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह उमटलं. 'तिथल्या मुलांच्या ग्रुपनं, टेरेसवर दारूच्या बाटल्या नेल्या. डी.जे. लावून खूप धिंगाणा केला. सोसायटीच्या सभासदांनी पोलिसात तक्रार करून, त्यांना चांगली समज दिली. तेव्हापासून, आपणही कोजागिरी साजरी करण्यासाठी मनाई करतो आहोत,' ते बोलत होते.

'पण, आम्ही लिहून दिलं की, आम्ही कोजागिरीच्या नावाने कुठलाही गैरप्रकार करणार नाही. डीजे लावून धिंगाणा करणार नाही. कुठलाही तमाशा करणार नाही आणि त्यावर आमच्या आईबाबांच्या सह्या आणल्या तर?' बंटीनं विचारलं. 'तर...? तर परवानगी देऊ. पण, टेरेसवर नाही. खाली क्लब हाऊसमध्ये देऊ. चालेल?' 'हो चालेल, चालेल...' बंटी ग्रुप आनंदानं ओरडला. 'शशऽऽ आरडाओरडा नाही.' बंटीनं सगळ्यांना सावध केलं. 'थँक्यू...काका... थँक्स अ लॉट!'

'टेरेस नाही तर नाही, क्लब हाऊसमध्ये करू या कोजागिरी,' बंटी ग्रुप आपापसात गप्पा मारत क्लब हाऊसमध्य गेला. तिथे वाचनालय, टेबल टेनिस, बॅडमिंटन चालू होतं. त्या सर्वांना एकत्र करून, बंटी ग्रुपनं कोजागिरी पौर्णिमा साजरी करण्याची कल्पना सांगितली. सर्वांनी ती उचलून धरली.

पुढची चक्रं भराभर फिरली. दादा लोकही बंटी ग्रुपमधे मिसळले. सोसायटीच्या प्रत्येक सभासदाकडून, प्रत्येकी रुपये शंभर याप्रमाणे वर्गणी जमा झाली. पाच पाच आई लोकांचा एक ग्रुप याप्रमाणे ग्रुप जमवले. पाच ग्रुपकडे चिवडा तर उरलेल्या ग्रुपकडे आटवलेलं मसाला दूध अशी विभागणी केली. दादा लोकांनी डिस्पोजेबल डिशेस, ग्लासेस, गार्बेज बॅग्ज जमा केल्या. सर्वांच्या सोयीसाठी शनिवारी रात्री पौर्णिमेचं जागरण ठरलं.

खाली क्लब हाऊसमध्ये सारी जय्यत तयारी झाली होती. बंटीनं सोसायटीच्या प्रत्येक सभासदाला भाग घेता येईल, असे खेळ शोधून काढले होते. सर्वांचा मिळून एक मोठा राउंड बनवला. 'मंडळी ऽऽ आज आपल्या खेळात हनुमान, प्रभुश्रीराम, काली माता, वामन, कंस, गोवर्धना गिरीधारी हेसुद्धा खेळणार आहेत. आपले सेक्रेटरीकाका म्युझिक वाजवतील. म्युझिक ज्याच्याजवळ थांबेल, त्याला सेक्रेटरीकाका या देवांपैकी एकाची ॲक्शन घ्यायला सांगतील. त्यानं ॲक्शन केली की, त्याच्या बाजूच्या दोघांनी त्याला नमस्कार करायचा. ज्यांना जमणार नाही, ते आऊट होऊन बाहेर जातील. कळलं?' बंटीनं सागितलं. खेळ सुरू झाला आणि सर्वांची पोटं हसून हसून दुखू लागली. प्रत्येकाकडून काहीतरी चूक होतच होती. एकेक जण आऊट होत, पाऊण तासानंतर फक्त जोशी आजोबा आणि परांजपे आजोबा राहिले. सर्वानुमते दोघांना मिळून विभागून बक्षीस देण्यात आलं.

परत एक मोठा राऊंड तयार केला. यात प्रत्येकानं मोठ्याने, एक, दोन, तीन, चार असे आकडे म्हणायचे. मात्र, पाच आणि शून्यच्या ऐवजी मोठ्याने टाळी वाजवायची. जो ते आकडे तोंडाने म्हणेल तो आऊट! या खेळातही खूपच धमाल झाली. पुन्हा जोशी आजोबाच विनर ठरले. खेळातून ब्रेक घेऊन, चिवडा आणि मसाला दूध खाणंपिणं झालं. सारे ग्लासेस, डिशेस, गार्बेज बॅगमधे टाकल्यामुळे कुठेही कचरा, सांडलवंड झाली नाही. जसजशी रात्र चढत गेली, तसतसे गेम्स जास्त रंगत गेले. एरवी, नऊ-दहा वाजता झोपेच्या आधीन होणारी मंडळी आज रात्रीचे दोन वाजले तरी टक्क जागीच होती. सेक्रेटरी काकांनी बंटी ग्रुपचे आभार मानले.'आज परवानगी दिली नसती तर, एका महत्त्वाच्या समारंभाला मुकलो असतो,' सर्वांनी टाळ्या वाजवून जल्लोष केला आणि सारे आपापल्या घरी पांगले.

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

प्रत्येकांनी धम्म आत्मसात करून आपले जीवन सुखी समृद्ध करावे : भंते धम्मसार थेरो

तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.२१ ऑक्टोबर -

तथागतांनी संबंध मानव जातीच्या उत्थानासाठी बहुजन हिताय बहुजन सुखायचा महामंत्र दिला. मानवाची दुःखातून मुक्तता करून प्रज्ञा शील करुणेची शिकवण दिली असून या शील पालनात मानवाचे कल्याण सामावले आहे. प्रत्येकांनी धम्म आत्मसात करून आपले जीवन सुखी समृद्ध करावे, असे मत भंते धम्मसार थेरो यांनी व्यक्त केले.

तालुक्यातील येळी येथील वैशाली बुद्ध विहारात रविवारी वर्षावास समारोप कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास भन्ते सुमंगल, आमदार ज्ञानराज चौगुले, कैलास शिंदे, एस.के. कांबळे, आनंदकुमार कांबळे, संतोष सुरवसे, दिलीप गायकवाड यांची उपस्थिती होती.

पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण भन्ते धम्मसार थेरो व भन्ते सुमंगल यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद कांबळे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. विनोद कांबळे यांनी केले. तर आभार प्रमोद कांबळे यांनी मानले.

संक्षिप्त वृत्त...

वाचन स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीसांचे वितरण

तेर, दि.२१ ऑक्टोबर -

धाराशिव तालुक्यातील तेर येथील जि.प. कन्या प्राथमिक शाळा येथे ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती वाचन प्रेरणा दिनानिमित्त प्रथम एज्युकेशन फाऊंडेशनकडून वाचन स्पर्धा घेण्यात आली. धनश्री मगर, समृद्धी पवार, अनुष्का भातभागे, सृष्टी नाईकवाडी, आचल देवकुळे, वैष्णवी कावळे या यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशालेच्या मुख्याध्यापिका सुरेखा कदम यांच्या हस्ते प्रथम एज्युकेशन फाऊंडेशनने प्रमाणपत्र व अवांतर वाचनाची पुस्तके देवून गौरविण्यात आले. यावेळी प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन तालुका प्रमुख मनोज राठोड, प्रतिभा जोगदंड, मालोजी वाघमारे, काशिनाथ नरसाळे, पल्लवी पवार, ज्योती गाढवे, किरण फंड उपस्थित होते.

राजेंद्र माळी यांचा सत्कार

लोहारा, दि.२१ ऑक्टोबर -

लोहारा तालुक्यातील फणेपुर येथील शिवसेना नेते राजेंद्र माळी यांच्या वाढदिवसानिमित्त मित्र परिवाराच्या वतीने यांचा यथोचित सत्कार करुन वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी शिवसेना तालुका प्रमुख जगन्नाथ पाटील, कृ.उ. बाजार समिती माजी सभापती दिनकरराव जावळे पाटील, नगरसेवक अमिन सुंबेकर, उपनगराध्यक्ष आयुब हबीब शेख, माजी गटनेते अभिमान खराडे, नगरसेवक अविनाश माळी, भाजपा तालुका सरचिटणीस इकबाल मुल्ला, मेडिकल असोसिएशन तालुकाध्यक्ष प्रमोद बंगले, पं.स. माजी सदस्य दिपक रोडगे, शिवसेना शहर प्रमुख श्रीकांत भरारे, सहदेव गोरे, सुनिल सुर्यवंशी, हामीद पठाण, संजय दरेकर, नयुम सवार, अदि उपस्थित होते.

सोयाबीन उत्पादक शेतकरी कमी दरामुळे हतबल... शेतकऱ्यांचे पिवळे सोने संकटात...

खत, औषधांचे भाव गगनाला अन् सोयाबीनचे भाव तळाला

तभा वृत्तसेवा / सुधीर घोलप
तेरखेडा, दि.२१ ऑक्टोबर -

देशात मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र ही दोन राज्य सोयाबीन उत्पादन घेण्यासाठी आघाडीवर असल्याचे बोलले जाते. शेतकरी मोठ्या प्रमाणात सोयाबीन पेरणी करता जास्तीत जास्त उत्पादन देणारे नगदी पीक म्हणून सोयाबीन पिकाची ओळख झाली आहे. सोयाबीन पासून तेल, पशुखाद्य, पोल्ट्रीखाद्य, पेंड तसेच रोजच्या जीवनातील खाद्यपदार्थ तयार केले जाते, मात्र राज्यातील सोयाबीन बाजार भावांमध्ये गेले अनेक दिवसांपासून मोठी मंदी पाहायला मिळत आहे.

शेतकऱ्यांचे पिवळे सोने म्हणून ओळखले जाणारे सोयाबीन पीक सध्या संकटात सापडले आहे. खर्चाचा ताळमेळ जुळत नसून उत्पादन खर्चही वसूल होत नाही शेतकरी सांगत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मिळणाऱ्या भावाचे आणि उत्पादनाचे गणित जुळत नसल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत.

बँकेचे कर्ज कसे फेडायचे, घरखर्च, मुलांच्या शिक्षणासाठी पैसे कुठून आणायचे असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर निर्माण झाला आहे. त्यात खता, औषधांचे भाव गगनाला भिडले आहेत. सोयाबीनचे भाव मात्र तळालाच आहेत. सोयाबीन दरामध्ये वाढ होत नसल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. २०२१ मध्ये सोयाबीनला सर्वाधिक दर १० हजार ते ११ हजार रुपये प्रति क्विंटलपर्यंत पोहोचले होते.

केंद्र सरकारने २०२३-२४ च्या खरिप हंगामात सोयाबीनला प्रती क्विंटल ४ हजार ६०० रुपये इतका हमीभाव जाहीर केला होता.

यावर्षी चालू २०२४-२५ मध्ये हमीभावात वाढ करुन तो ४ हजार ८९२ एवढा हमीभाव सरकारकडून किमान आधारभूत किंमत (एम एसपी) जाहीर केला असला तरी व्यापाऱ्यांकडून ग्रामीण भागात ४ हजार ८९२ रुपयांपेक्षाही कमी दराने सोयाबीनची खरेदी केली जात आहे. मात्र सातत्याने २०२१ पासून बघितले तर भावात मोठी घसर झालेली दिसून येत आहे.

याचाच फटका काही महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत बसला, असे शेतकरी वर्ग व राजकीय अभ्यासक सांगतात. दरम्यान धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात सद्या शेतकऱ्यांचे सोयाबीन काढून झाले आहे. बऱ्याच शेतकऱ्यांनी मळणी सुरु केली आहे.

तर बहुतांश शेतकऱ्यांनी पैशाची तारांबळ असल्याने नाईलाज म्हणून सोयाबीन बाजारात विक्रीसाठी घेऊन जात आहेत. मात्र खाजगी व्यापाऱ्यांकडून आधारभूत किंमत (एमएसपी) ४ हजार ८९२ रुपयांपेक्षाही कमी दराने सोयाबीनची खरेदी केली जात आहे. सरकारने हमीभाव केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेऊन अनेक दिवस उलटले, तरी अद्याप वाशी तालुक्यात सोयाबीन हमीभाव केंद्र सुरू करण्यात आले नाही. का? सरकारचा हा निर्णय कागदावरच राहतो, अशी चर्चा शेतकरी वर्गात आहे. सरकारने लवकरात लवकर सोयाबीन हमीभाव खरेदी केंद्र गावागावात सुरू करावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

तसेच लोकसभा निवडणुकीत सोयाबीन, कांदा भाव प्रश्न गाजला होता तसा आता विधानसभा निवडणुकीत ही गाजणार का? हे बघणे गरजेचे आहे.

शेतकऱ्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागत आहे. त्यात खाजगी व्यापाऱ्यांकडून सोयाबीन कवडीमोल भावाने घेतले जात आहे. तरीही देखील अद्याप वाशीम ध्ये हमीभाव केंद्र सुरू झाली नाहीत. दिवाळी सण तोंडावर आला असून आज शेतकरी अडचणीत आहे. सरकारने तात्काळ उपाययोजना कराव्यात शासनाने शेतकऱ्यांसाठी आचारसंहिता शिथील करावी.

- बाळकृष्ण बारगजे
शेतकरी, वाशी

सरकारने जरी सोयाबीनला ४ हजार ८९२ रुपये प्रतिक्विंटल हमीभाव जाहीर केला असला तरी शेतातील मिळणारे उत्पन्न आणि होणाऱ्या खर्चाचा ताळमेळ जुळत नाही त्यामुळे सरकारे हमीभावात वाढ करून आमच्या सोयाबीनला प्रतिक्विंटल ६ हजार रुपये भाव द्यावा.

- ऋषिकेश उमरदंड,
शेतकरी, तेरखेडा

केंद्र सरकारने २०२४-२५ चालू हंगामात हमीभाव ४ हजार ८९२ (एमएसपी) जरी जाहीर केला असला तरी हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्यात आले नाहीत आणि जरी केले तरी सोयाबीनला मिळणाऱ्या भावाचे आणि शेतीतील खर्चाचे गणित जुळत नाही. त्यामुळे सरकारने आमच्या सोयाबीन पिकाला ७ हजार रुपये प्रतिक्विंटल भाव द्यावा.

- संजय कोळगे,
शेतकरी, सटवाईवाडी

खत, औषधाचे भाव मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. परंतु सोयाबीनचे भाव वाढले नाहीत उलट कमी झाले आहेत. त्यामुळे सर्व हिशोब केला तर खाली काहीच शिल्लक राहत नाही. त्यामुळे सरकारने आमच्या सोयाबीन पिकाला ९ हजार रुपये क्विंटल भाव जाहीर करावा.

- सज्जन दळवे,
शेतकरी, दळवेवाडी

सोयाबीन बाजारपेठेत जाईपर्यंत एकरी खर्च...

नांगरणी २ हजार रुपये, मोगडणी १ हजार रुपये, कुळवणी १ हजार रुपये, पेरणी १ हजार रुपये, खत पोते १ हजार ५०० रुपये, सोयाबीन पिशवी ३ रुपये, कोळपणी १ हजार रुपये, फवारणी २ हजार ५०० रुपये, काढणी ६००० हजार रुपये, एकरी सरासरी १० कट्टे निघाले असून १२० रुपये प्रति कट्टा प्रमाणे १ हजार २०० रुपये मळणी खर्च. एकूण एकरी खर्च २० हजार २०० रुपये आला आला. एकरी सोयाबीन ६ क्विंटलचा निघाले असून सध्या बाजारात चांगला माल ४ हजार ३०० रुपये प्रतिक्विंटल गेले तर २५ हजार ८०० रुपये शेतकऱ्यांना आले. एकून सर्व खर्च वजा जाता खाली फक्त ५ हजार ६०० रुपये शिल्लक राहिले. आता रब्बीच्या पेरणीसाठी खत, बी, मशागत एवढ्या पैशात कशी करायची असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे पडला आहे. शेतकऱ्यांचा लागवड खर्चही निघत नसल्याचे गंभीर वास्तव आहे.

सचिन पाटील यांची सदस्यपदी नियुक्ती

तभा वृत्तसेवा
येरमाळा, दि.२१ ऑक्टोबर -

विद्यानिकेतन विद्यालयाचे संस्थापक सचिन पाटील यांची विभागीय शिक्षण मंडळ लातूर विभाग व्यवस्थापन समिती सदस्यपदी निवड करण्यात आहे.

जागजीच्या महालक्ष्मी मंदिरावरील शिखरावर झाडाचे साम्राज्य

विटांनी बांधलेल्या शिखराला धोका होण्याची शक्यता...

तभा वृत्तसेवा
तेर, दि.२१ ऑक्टोबर -

धाराशिव तालुक्यातील जागजी येथील श्री महालक्ष्मी मंदिरारील शिखरावर झाडाचे साम्राज्य वाढल्याने शिखराला भेगा पडल्या असून शिखर पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

धाराशिव तालुक्यातील जागजी येथे उत्तर चालुक्यांच्या आधिचे असलेले श्री महालक्ष्मी मंदिर असून दगडी मंदिरावर असलेले विटांनी बांधलेले शिखर आहे. हे शिखर नागरशैलित मोडणारे आहे.

महालक्ष्मी मंदिर पश्चिमाभिमुख असून ते एक मिटर उंच अधिष्ठानावर उभे आहे. मंदिराचे गर्भगृह ४ मिटर बाय चार मिटर आहे. संपूर्णपणे विटांनी बांधलेल्या या शिखरावर कांही नक्षी आहेत.

यामध्ये कांहीं अलंकृत विटाही आहेत. मंदिराच्या पायापासून निघणाऱ्या रेषा थेट शिखराच्या वरपर्यंत मिळतात. शिखरावर लहान लहान शिखराच्या प्रतिकृती आहेत. कूटशाळा प्रकारात मोडणारे हे शिखर १४ मिटर उंच आहे. याच मंदिराच्या शिखरावर मोठ मोठी झाडे उगवलेली असून या झाडांमुळे शिखराला भेगाही पडलेल्या आहेत. हे मंदिर पुरातत्व विभागाच्या अधिपत्याखाली येते.

पुरातत्व विभागाच्या वरिष्ठांनी याबाबतीत लक्ष घालून वेळीच शिखरावर उगवलेली झाडे काढली नाहीत तर विटांनी बांधलेले शिखर पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तुळजापूर मतदार संघासाठी वंचितकडून डॉ. स्नेहा सोनकाटे यांना उमेदवारी जाहीर

तभा वृत्तसेवा
नळदुर्ग, दि.२१ ऑक्टोबर -

तुळजापुर विधानसभा मतदार संघातुन वंचित बहुजन आघाडीची उमेदवारी ओबीसी नेत्या डॉ. स्नेहा सोनकाटे यांना जाहीर करण्यात आली असुन डॉ. स्नेहा सोनकाटे यांच्या या उमेदवारीमुळे तुळजापुर विधानसभा मतदार संघातील राजकारणाला आता वेगळीच कलाटणी मिळाली आहे. स्नेहा सोनकाटे यांची उमेदवारी आता अनेकांना अडचणीची ठरू शकते.

तुळजापुर विधानसभा मतदार संघात उमेदवारी जाहीर करण्यामध्ये वंचित बहुजन आघाडीने आघाडी घेतली असुन दि. १६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी उमेदवारी डॉ. स्नेहा सोनकाटे यांना जाहीर केली आहे.

तुळजापुर विधानसभा मतदार संघात वंचित बहुजन आघाडीला मानणारा वर्ग मोठा आहे. २०१९ च्या विधानसभा सभा निवडणुकीत तुळजापुर विधानसभा मतदार संघातुन अशोक जगदाळे यांनी वंचित बहुजन आघाडीकडुन निवडणुक लढविली होती. त्यावेळी त्यांना ३७ हजार इतके मतदान मिळाले होते. या निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीमुळेच काँग्रेसचे उमेदवार माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांचा पराभव झाला होता.

तुळजापुर विधानसभा मतदार संघात धनगर समाज तसेच ओबीसीचे मतदान मोठे आहे. त्याचबरोबर या मतदार संघातील एससी समाजाचे मतदानही मोठे असुन हा समाज वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांना मानणारा आहे. त्यामुळे या मतदार संघातील धनगर, ओबीसी आणि एससी समाजाचे मतदार डॉ. स्नेहा सोनकाटे यांच्या पाठीशी राहिले तर डॉ. स्नेहा सोनकाटे यांची उमेदवारी या मतदार संघातील बलाढ्य उमेदवारांना घाम फोडु शकते.

त्याचबरोबर ओबीसी नेते व राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांचे सहकार्य डॉ. स्नेहा सोनकाटे यांना मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे या मतदार संघात डॉ. स्नेहा सोनकाटे या राजकीय क्रांती घडविणार का? हे पाहणे गरजेचे आहे.

सुरेश पाटू यांची महाराष्ट्र प्रदेश संघटकपदी निवड

तभा वृत्तसेवा
इटकळ, दि.२१ ऑक्टोबर -

तुळजापुर तालुक्यातील केशेगाव येथील सुरेश श्रीमंत पाटू यांची आइडियल पत्रकार संघटनेच्या महाराष्ट्र प्रदेश संघटकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

सदर नियुक्ती केंद्रीय संपर्क प्रमुख आबासाहेब सूर्यवंशी, राष्ट्रीय सचिव रशीद खान पठाण व महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य प्रफुल साळुंखे, विजय अग्रवाल, नितीन शिंदे यांच्या एकमताने करण्यात आली आहे.

विजेच्या कडकडाटासह जोरदार पर्जन्यवृष्टी; शेतकऱ्यांची चिंता वाढली

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२१ ऑक्टोबर -

जिल्ह्यात गेल्या वर्षी अत्यल्प पाऊस झाला होता. यामुळे काहीशा प्रमाणात पाणीटंचाई जाणवली. मात्र यंदा वरून राजा जिल्ह्यावर मेहरबान झाला आहे. पावसाळ्याच्या दरम्यान मुबलक प्रमाणात पाऊस झाल्याने शेतकरी समाधानी आहे. यातच गेल्या दहा ते पंधरा दिवसांपासून विसावा घेतलेल्या पावसाने रविवार रात्री विजेच्या कडकडाटासह पुन्हा सुरुवात केली. यामुळे काढून ठेवलेले सोयाबीन या पावसामुळे जाणार का? अशी चिंता शेतकऱ्याला सतावत आहे.

जिल्ह्यात गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात प्रचंड उष्णता जाणवली होती. मात्र, यंदा पावसाळा संपून ऑक्टोबर महिन्यांचे वीस दिवस झाले. तरीही पाऊस सुरूच आहे. यामुळे ऑक्टोबर हिट तुरळक प्रमाणात जाणवली. सप्टेंबर महिन्यात सातत्याने सुरू असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतीतील सोयाबीन पाण्यात गेले होते. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रचंड नुकसान सहन करावे लागले. यातच आता उर्वरित शेतकऱ्यांच्या सोयाबीनचे ऑक्टोबर महिन्यात होणाऱ्या पावसामुळे प्रचंड नुकसान झाले आहे. रविवारी रात्री अचानक आलेल्या पावसामुळे शहरातील जनजीवन विस्कळीत झाले. विजेच्या कडकड्यासह झालेल्या पावसामुळे शहरातील वीज गायब झाली होती.

शहरातील खड्ड्यात साचले पाणी...

दोन दिवसांपूर्वीच शहरातील रस्त्यावरील खड्ड्यात पडून एकाचा मृत्यू झाला आहे. यातच रविवारी रात्री विजेच्या कडकडाटासह झालेल्या पावसामुळे शहरातील रस्त्यात असणाऱ्या खड्ड्यात आता पावसाचे प्रचंड पाणी साचले. यामुळे दुचाकी आणि रिक्षा चालकांना वाहन चालवताना मोठी कसरत करावी लागली.

सुस्त नगरपालिकेला जाग येणार का?

शहरातील रस्त्यांची प्रचंड दुरावस्था झालेले आहे. रस्त्याच्या दुतर्फा असणाऱ्या नाल्यातून पाणी न जाता ते रस्त्यावरून वाहत आहे. या पाण्यातून पदाचारांना प्रवास करावा लागत आहे. अशा परिस्थितीत भ्रष्टाचाराच्या धुंदीत गुंग असणाऱ्या सुस्त नगरपालिकेला नागरिकांचे हे प्रश्न सोडवण्यासाठी जाग येणार का? हा प्रश्न प्रत्येक धाराशिवकर शहरवासीय विचारत आहे.

धाराशिव-कळंब : विधानसभा उमेदवारी आधीच महायुतीतील इच्छुकांनी बांधले बाशिंग?

महाविकास आघाडीकडून कैलास पाटील आखाड्यात..

तभा वृत्तसेवा / सुशिलकुमार पाटील
खामसवाडी, दि.२१ ऑक्टोबर -

महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूक जाहीर होताच राजकीय वातावरण निर्माण झाल्याने 'पुढारी रेंज'मध्ये आल्याचे दिसत आहे. कळंब-धाराशिव मतदार संघात गेल्या दोन महिन्यात अनेक राजकीय घडामोडींना वेग आला आहे.

महाविकास आघाडीमधून शिवसेना (उबाठा) चे आमदार तथा जिल्हाप्रमुख कैलास पाटील हे परत एक वेळेस रिंगणात उतरले आहेत. तर महायुतीकडून कळंब-धाराशिव जागा कोणाला सुटणार याचा पेच आहे. तरीही भाजपामधून कळंब भापजचे तालुकाध्यक्ष अजित पिंगळे, नितीन काळे, सरोजिनी राऊत तर शिवसेना (शिंदे गट) मधून सुधीर पाटील, सेना जिल्हा प्रमुख सुरज साळुंके, नितीन लांडगे, शिवाजी कापसे आणि राष्ट्रवादी (अजित पवार गट) यांचेकडून शिक्षक आमदार विक्रम काळे, सुरेश पाटील हे उमेदवार इच्छुक आहेत. कळंब-धाराशिव याठिकाणची महायुतीची जागा भाजप अजित पवार राष्ट्रवादी, शिवसेना शिंदेगट या मित्रपक्षतुन कोणाला सुटणार हे निश्चित झाले नसल्याने कैलास पाटील यांना प्रतिस्पर्धी कोण हे लवकरच कळेल.

विधानसभा निवडणूक लागण्याचे संकेत दिसल्यावर अगदी कांही महिन्यांपूर्वीच कळंब-धाराशिव मतदार संघात राजकीय घडामोडींना वेग आला. शिवसेना उबाठाचे तालुका प्रमुख शिवाजी कापसे यांनी राजीनामा देत आपल्या कार्यकर्त्यांसह शक्तिप्रदर्शन करीत परंडा येथे मुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत प्रवेश केला.

मराठा कार्डची मॅजिक क्रेज राहणार..

मराठा समाजाचे सर्वेसर्वा मनोज जरांगे पाटील यांनीं बोलावलेल्या सामाजिक बैठकीला विविध राजकीय पक्षातील कांही नेतेमंडळीनी हजेरी लावल्याचे अधिकृत रित्या कळते.ऐनवेळी याच बैठकीतील एखादा चेहरा तत्कालीन परिस्थिती पाहून उमेदवार म्हणून घोषित पण होऊ शकतो असे समजते. मराठा कार्डची जादू निर्णायक ठरणार असल्याने कांहीं मंडळी राजकीय पक्ष अधिक मराठा समाज यापैकी कोठुनही उमेदवारीसाठी इच्छुक असल्याने त्यांचा दोन डगरीवर हात आहे हे विशेष..!

भाजपा मधून शिंदे शिवसेनेत आलेले सुधीर पाटील यांनीही धाराशिवमध्ये मुख्यमंत्रीसोबत मेळावा घेऊन स्वतःचे राजकीय शक्तिप्रदर्शन केले. शिंदे शिवसेनेचे जिल्हा प्रमुख सुरज साळुंके हे मंत्री तानाजी सावंत यांचे विश्वासु असल्याने यांचे कार्यकर्तेही साळुंकेच्या उमेदवारीसाठी जोर धरत आहे.

नितीन लांडगे यांनीही आपले राजकीय वजन मुख्यमंत्री शिंदेपुढे दाखवले आहे. स्व. पवनराजे निंबाळकर यांचे एकेकाळचे निष्ठावंत सद्याला शिंदे शिवसेनेचे डॉ. तानाजी सावंत यांचे खंदे समर्थक अमोल पाटील हे पण उमेदवारीसाठी इच्छुक असल्याचे कळते. अमोल पाटील हे खामसवाडीचे लोकनियुक्त विद्यमान सरपंच आहेत. भाजपाचे जुने निष्ठावंत किसान मोर्च्याचे राज्य सचिव रामदास कोळगे यांनीही भाजपा नेते रावसाहेब दानवे यांच्याकडे प्रत्यक्ष भेटून मागणी केली आहे.

कळंब तालुकाध्यक्ष अजित पिंगळे व कार्यकर्ते यांनी कळंब ते तुळजापूर हे अंतर पायी चालून शक्तीपीठ यात्रेच्या माध्यमातून राजकीय वजन दाखवून उमेदवारीसाठी इच्छुक असल्याचे दाखवून दिले. धाराशिव भाजपाच्या जिल्हा उपाध्यक्षा डॉ. सरोजिनी राऊत यांनीही कळंब तालुक्यात सामाजिक कार्यात अग्रेसर असुन त्यांनी आपल्या सामाजिक कामाचा लेखाजोखा पक्ष श्रेष्ठींपुढे ठेवल्याने कळंबमधुन महिला उमेदवार म्हणून त्यांचही नाव पुढे येत आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे विक्रम काळे व सुरेश पाटील उमेदवारी साठी आग्रही आहेत.

विक्रम काळे हे भेटीगाठी घेत असल्याचे दिसत आहे. मात्र सहकार असलेले सुरेश पाटील आपणच इच्छुक असून आपण पक्षश्रेष्ठींना कळवल्याचे बोलत आहेत.

एकंदरीत कळंब-धाराशिव मतदार संघात आघाडीकडून आमदार कैलास पाटील हे उमेदवार म्हणून गावोगावी फिरत आहेत. मात्र महायुतीमधून कोणत्या मित्रपक्षाला जागा सुटणार त्यानंतर उमेदवार ठरणार आहे.

सोयगाव तालुक्यात अतिवृष्टी; वार्षिक सरासरी ओलांडली

घोसल्यात वीज पडून म्हैस ठार,गलवाड्यात घर कोसळले

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२१ ऑक्टोबर

सोयगाव सह तालुक्यात शनिवारी रात्री झालेल्या अतिवृष्टीमुळे कापशी,मका सोयाबीन ज्वारी व बाजरी या पिकांचे शंभर टक्के नुकसान झाले आहे तर शनिवारी रात्री विजांच्या कडकडाट सह झालेल्या पावसात घोसला गावात वीज कोसळून म्हैस ठार झाल्याची घटना शनिवारी रात्री नऊ वाजता घडली आहे प्रकाश शिवदास बावस्कर यांच्या गट क्र-१६४ मधील शेड मध्ये म्हैस बांधलेली होती शेड वर वीज कोसळून म्हैस ठार झाली असून रविवारी महसूल व पशुसंवर्धन विभागाने घटनेचा पंचनामा केला आहे दरम्यान

सलग दुसऱ्या दिवशीही सोयगाव सह जरंडी,बनोटी मंडळात अतिवृष्टी ची नोंद झाली आहे. त्यामुळे पिकांची नुकसानी मुळे शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात साजरी होणार आहे दरम्यान सलग झालेल्या अतिवृष्टीमुळे व सततच्या पावसाने ऐन दिवाळी सणाच्या तोंडावर शेतकरी मेटाकुटीला आला आहे खरिप हंगामात केवळ चवळी मूग आणि उडीद या पिकांच्या तुटपुंज्या उत्पन्न वगळता इतर पिकांची उत्पन्न घरात आले नसून निसर्गाने हिरावून घेतले आहे

गलवाड्यात घर कोसळले

दरम्यान सोयगाव जवळील गलवाडा गावात गजमल इंगळे यांचे घराची भिंत एका बाजूने ढासळली ची घटना शनिवारी रात्री अकरा वाजता घडली आहे रविवारी पंचनामा केला आहे.

माळेगाव पिंपरी रस्त्यावर पूल ढासळला

दरम्यान माळेगाव पिंपरी गावाला जोडणारा दहा कोटी रु खर्चून बांधण्यात आलेला पूल शनिवार रात्री झालेल्या अतिवृष्टी च्या पावसात ढासळला आहे त्यामुळे या रस्त्यावरून जड वाहनांची वाहतूक बंद करण्यात आली आहे.

सोयगाव,जरंडी,आणि बनोटी या दोन मंडळात सलग दुसऱ्या दिवशीही अतिवृष्टीची नोंद झाली आहे त्यामुळे पिकांमध्ये पाणीच पाणी शिरले होते कापूस लागलेल्या कपाशीच्या झाडांना कापूस लोंबलेला आहे वेचणी आधीच पावसाने थैमान घातले आहे त्यामुळे ऐन दिवाळीच्या सणात घरी येणारा कापूस भिजून शेतात खराब झाला आहे.

पावसाने वार्षिक सरासरी ओलांडून त्या पेक्षा अधिक दोनशे सात मी मी पाऊस शिल्लक झाला आहे सोयगाव तालुक्याची यंदाच्या पावसाळ्यात वार्षिक सरासरी ८०१ मी मी होती मात्र रविवारी (दि.१९) पर्यंत १००७ मी मी तालुक्यात सरासरी पाऊस झाला आहे.

गांज्याची अवैध वाहतुक करणाऱ्या इसमास कारसह अटक

जालना - जिल्हयात अवैध गांजा विक्री करणाऱ्यावर कारवाई करण्याची मा. पोलीस अधिक्षक श्री. अजय कुमार बन्सल साहेब यांनी कारवाई करणे बावत सुचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने आम्ही व आमचे अधिपत्याखाली नेमणुकीस असलेले दुय्यम अधिकारी व अंमलदार यांना अवैध गांजा विक्री करणारे इसमांची माहीती काढुन त्यांचेवर कारवाई करण्याच्या सुचना देवुन मार्गदर्शन केले.

त्याअनुषंगाने आज दिनांक १९/१०/२०२४ रोजी आम्ही पोलीस ठाणे हजर असतांना आम्हाला आमचे गुप्तबातमीदार यांचे मार्फतीने माहीती मिळाली की, मानवी आरोग्यास हानिकारक असलेला गांज्याची अवैध पणे स्वतः चे आर्थीक फायदयासाठी विक्री करण्याच्या उद्देशाने सिल्लोड वरुन कायगांव मार्गे हसनाबाद कडे एक टाटा इंडीगो कार मध्ये अवैध गांज्या घेवुन जात असल्याची खात्रीलायक माहीती मिळाली. त्यांनतर आम्ही सदर माहीती मा.पोलीस अधिक्षक सो जालना, मा.अपर पोलीस अधिक्षक सो जालना, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी सो भोकरदन यांना फोनव्दारे देवुन वरीष्ठांचे मार्गदर्शनाखाली गोषेगांव ते हसनाबाद रोडने नायब तहसिलदार, पंच, आवश्यक साहीत्यासह सापळा रचला असता गुप्तबातमीदारामार्फत मिळालेल्या माहीती प्रमाणे टाटा इंडीगो कंपनीची पांढऱ्या रंगाची कार दिसुन आली. सदर कार क्रमांक चक १२ घछ ७५९८ हिस थांबवुन त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव नारायण कृष्णा इंगळे वय २३ वर्षे रा. सिरंसगांव वाघुळ ता.भोकरदन जि.जालना असे सांगीतले त्यानंतर पंच व नायब तहसिलदार श्री. पप्पुलवाड यांचे समक्ष झडती घेतली असता त्यामध्ये ८७ किलो ४०० ग्रॅम वजनाचा अंमली पदार्थ गांज्या मिळुन आला सदर आमली पदार्थची किंमत २१ लाख ८५ हजार रुपये व कारची किंमत ४ लाख ५० हजार असे एकुण २६ लाख ३५ हजार रुपयाचा माल मिळुन आला सदरचा गांज्या हा इसम नामे नारायण कृष्णा इंगळे वय २३ वर्षे रा. सिरंसगांव वाघुळ ता. भोकरदन जि. जालना हा अवैध रित्या घेवुन जात असतांना मिळुन आला. सदर बाबत पोलीस उपनिरीक्षक श्री फकीरचंद फडे यांनी फिर्याद देवुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन गुन्हयाचा तपास श्री. संजय आहिरे हे करीत आहेत.

सदरची कारवाई मा.अजय कुमार बंन्सल, पोलीस अधीक्षक मा. आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक मा.डॉ. गणपत दराडे, उपविभागीय पोलीस अधिकारी, भोकरदन यांचे मार्गदर्शनाखाली संजय आहिरे सहा. पोलीस निरीक्षक हसनाबाद पो.स्टे., फकरीचंद फडे पोउपनि हसनावाद, पोहेकॉ सागर देवकर, पोहेकॉ भरतकुमार चौधरी मपोहेकॉ कल्पना बोडखे, पोकॉ निलेश खराट, पोकॉ प्रकाश बोर्डे, पोकॉ दिपक सोनुने, पोकॉ योगेश पाटीलपाईक, पोकॉ नितेश खरात, पोकॉ सुरेश डुकरे यांनी केलेली आहे.

उमेदवारांना नामनिर्देशन दाखल करण्याच्या कार्यपध्दतीचे आदेश जारी

जालना/प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगानेविधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी कार्यक्रम दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी घोषित केला आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये निवडणूकीच्या कालावधीत जालना जिल्ह्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून निवडणूक कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळी वाहनांच्या ताफ्यामध्ये तीन पेक्षा जास्त मोटारगाड्या, वाहने यांचा ताफ्यात समावेश नसावा. उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात तसेच दालनात पाच व्यक्ती व्यतिरिक्त कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जारी केले आहेत.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकांपासून आदर्श आचार संहिता अंमलात आली आहे. त्यामुळे जालना जिल्ह्यात विधानसभा निवडणूकीची संपूर्ण प्रक्रीया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून निवडणूक कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात वाहनांच्या ताफ्यामध्ये तीन पेक्षा जास्त मोटार गाड्या, वाहने यांचा समावेश नसावा. तसेच नामनिर्देशन पत्र दाखल करते वेळेस निवडणूक निर्णय अधिकारी यांचे दालनात पाच व्यक्ती उपस्थित राहतील. या व्यतिरिक्त कोणालाही निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात प्रवेश दिला जाणार नाही. निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक, सभा घेणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणने आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे. आदेश दि. १५ ऑक्टोबर रोजीचे ६ वाजेपासुन ते दि. २५ नोव्हेंबर २०२४ रोजीचे २४ वाजेपर्यंत संपूर्ण जालना जिल्ह्यात अंमलात राहतील. असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार प्रकरणी २ आरोपींना २० वर्षे कारावास

जालना/प्रतिनिधी - १३ वर्षाच्या अल्पवयीन मुलीचा लैंगिक छळ केल्याप्रकरणी परतुर तालुक्यातील आसनगाव येथील दोन आरोपींना २० वर्ष कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली आहे १६ ऑक्टोबर रोजी प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती वर्षा मोहिते यांनीही शिक्षा ठोठावली.

वरिल विषयी वृत्त असे की, पहिला आरोपी बालासाहेब सूर्यभान खरात ,५५ वर्ष, राहणार आसनगाव तालुका परतुर यांनी गावातीलच एका १३ वर्षाच्या मुलीला दिनांक २३ जुलै २०२३ रोजी दुपारी चार वाजेच्या सुमारास काहीतरी लालूच दाखवून आपल्या घरी बोलावले आणि तिला जीवे मारण्याच्या धमक्या देऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. हा अत्याचार होत असताना तेथीलच या प्रकरणातील दुसरा आरोपी भानुदास गणपत नाटकर वय ५७ वर्ष राहणार आसनगाव तालुका परतुर याने पाहिले. आणि तो देखील हे प्रकरण दाबण्यासाठी मुलीला बोलण्याचा प्रयत्न करू लागला. पहिली घटना घडल्यानंतर मुलगी घरी गेली आणि प्राथमिक माहिती म्हणून शेजारच्या महिलेच्या फोनवरून वडिलांना फोन लावला. वडील घरी येण्यास वेळ होता म्हणून जवळच असलेल्या वॉटर फिल्टर वरून पाणी आणण्यासाठी ही मुलगी आपल्या मैत्रिणी सोबत गेली. त्यावेळी वॉटर फिल्टर मध्ये कार्ड टाकल्यानंतर येणारे पाणी येत नव्हते कारण ते आत मधून बंद केलेले होते. नळ बंद असल्याचा बहाना करून भानुदास नाटकर यांनी मुलीला आत मधून पाणी देण्याचा बहाना करून तिला मध्ये बोलवले आणि तिच्यासोबत लैंगिक छळ केला. तिच्यासोबत असलेल्या मैत्रिणीला त्याने बाहेरच उभे केले होते. एकाच दिवशी अवघ्या दोन तासाच्या अंतरामध्ये या मुलीवर दोन वेळा लैंगिक अत्याचार करण्यात आले.

या प्रकरणानंतर आष्टी पोलीस ठाण्यामध्ये या दोघांविरुद्ध बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधात्मक कायदा अंतर्गत गुन्हा दाखल झाला आणि आष्टी पोलिसांनी जिल्हा व सत्र न्यायालयात आरोप पत्र दाखल केले. सरकार पक्षातर्फे अतिरिक्त सरकारी अभियोग्यता विधींना जयश्री सोळंके यांनी काम पाहिले त्यांनी एकूण सात साक्षीदार तपासले आणि न्यायालयात युक्तिवाद केला सरकारी अभियोगत्याचे साक्षी पुरावे ग्राह्य धरून प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती वर्षा मोहिते यांनी भानुदास नाटकर आणि बाळासाहेब खरात या दोघांना वीस वर्षं कारावास आणि बारा हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे.

पैठणला भाजपच्या संगठणात्मक बैठकीत नियुक्त्या

तभा वृत्तसेवा

पैठण दि २१ :- विधानसभा निवडणूक व संगठनात्मक विषया संदर्भात भारतीय जनता पक्षाच्या वतीने पितांबरी मंगल कार्यालय याठिकाणी बैठक आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीस जिल्हाध्यक्ष सुहास भाऊ शिरसाठ,छत्तीसगड भाजपा नेते सोमेश पांडे,औताडे,प्रदेश सदस्य रेखाताई कुलकर्णी,पैठण विधानसभा प्रमुख डॉ सुनील शिंदे, सहकार आघाडीचे जिल्हाध्यक्ष तुषार शिसोदे,तालुकाध्यक्ष लक्ष्मण औटे,नगराध्यक्ष सुरज लोळगे,

किसान आघाडीचे जिल्हाध्यक्ष बाप्पासाहेब शेळके,जिल्हा उपाध्यक्ष महेश जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीत संगठनात्मक व विधानसभा निवडणूक संदर्भात चर्चा करतांना डॉ सुनील शिंदे यांनी पैठण विधानसभा लढण्यासाठी सज्ज असल्याचे सांगितले.तसेच यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत पुढील शहर कार्यकारिणीच्या पदाधिकारी यांची निवड करण्यात आली

शहरसरचिटणीस पदी :- समीर शुक्ल , विजय आचार्य ,लक्ष्मीकांत पसारे विशाल पोहेकर , कैलास बरकसे शहर उपाध्यक्ष पदी :- रमेश वीर , ज्ञानेश्वर दहिवाल , गणेश डुकरे , आबासाहेब गिरगे ,शिवाजी तुपे , योगेश कुंडारे चिटणीस पदी :- योगेश धर्माधिकारी , सुरज घुले अनुसूचित जाती शहराध्यक्ष :- आकाश जाधव अल्पसंख्याक शहराध्यक्ष :- रशीद भाई कुरेशी याप्रमाणे नियुक्ती करण्यात आली.अनंत औटे,अतिष बारे, निखिल गुप्ता सह बैठकीला शक्तिकेंद्र, बूथ प्रमुख सह पदाधिकारी मोठया संख्येने उपस्थित होते.

शिक्षकांनी मतदार जनजागृतीत योगदान द्यावे- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.२१(जिमाका):- शिक्षक म्हणून निवडणूक प्रक्रियेतील जबाबदारी पार पाडत असतांना शिक्षकांनी मतदार जनजागृती उपक्रमातही आपले योगदान द्यावे,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज शिक्षक मेळाव्यात केले.

येथील १०७ औरंगाबाद (मध्य) विधानसभा मतदारसंघाअंतर्गत मतदार जनजागृतीसाठी स्वीप उपक्रमाचा भाग म्हणून आज मौलाना आझाद सभागृहात शिक्षक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, मनपा उपायुक्त अंकुश पांढरे, स्विप नोडल अधिकारी स्वप्निल

सरदार, संजीव सोनार आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, शिक्षक हा व्यवसाय जरी असला तरी ह्या व्यवसायाल प्रतिष्ठा आहे. आपण केवळ शिक्षणाचे काम करीत नाहीत तर एक पिढी घडवित असतात. दर पाच वर्षांनी होणाऱ्या निवडणूका ही आपल्या देशाचे, राज्याचे भवितव्य घडविण्यासाठी योग्य प्रतिनिधींची निवड करण्याची संधी असते. त्यासाठी मतदान हे कर्तव्य बुद्धीने करणे आवश्यक आहे. हे महत्त्व एक शिक्षक चांगल्या पद्धतीने मतदारांना सांगू शकतो. त्यामुळे शिक्षकांनी मतदार जनजागृतीत आपले योगदान द्यावे,असे जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले.

साजापूर येथे वर्षावासाची सांगता

वाळूज महानगर (प्रतिनिधी) : साजापूर येथील महाकरुणा बुद्धिस्ट मोनेस्ट्री येथे भिक्खू करुणानंद थेरो यांच्या वर्षावास समारोपा निमित्त कठीन चीवरदान,वर्षावासाची सांगता व संघदानाचा कार्यक्रम हजारो उपासक उपासिकांच्या साक्षीने आज रविवार दि.२० ाक्टोबर २०२४ संपन्न झाला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष पूज्य भदंत डॉ. खेमधममो होते. तर प्रमुख अतिथी म्हणून भदंत विशुधानंदबोधी महाथेरो बुद्धगया, भंते एम सत्यपाल महाथेरो, डॉ. ईदवंश महाथेरो,भिखु एम.धम्म ज्योतीथेरो, भिखु धम्मबोधि थेरो, भिखू सुगतानंदबोधी, भिखु धम्मानंद भिखु भन्ते अनिरुद्ध, भन्ते मंगलबोधी,भन्ते बोधीपाल भिखु संघपाल भन्ते संघप्रिय आदी उपस्थित होते.

भिखू संघाच्या नेतूर्तवाखाली सम्यक सम बुद्धांच्या व डॉ बाबासाहेबांच्या मूर्तीची साजापूर शहरातून विविध मार्गांवरून धम्म रॅली काढण्यात आली. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अंजन साळवे यांनी भेट देऊन भिखु संघाचा आशीर्वाद घेतला. तसेच राजूभाऊ शिंदे यांनी सुद्धा संपूर्ण भिखु संघाला अभिवादन करून भिखु संघाचे आशीर्वाद घेतले. या कार्यक्रमाला साजापूर, वडगाव, रांजनगाव, बजाजनगर, वाळुज, पंढरपूर, जोगेश्वरी, तीसगाव, करोडी, घाणेगाव, सलामपुरा, वळदगाव, म्हाडा कॉलनी, रामईनगर सह महाराष्ट्रातून नांदेड, परभणी,उस्मानाबाद, लातूर जालना,उमरखेड, यवतमाळ,वाशिम, मुंबई, पुणे, पनवेल, जळगाव,नंदुरबार धुळे चाळीसगाव, बीड, हिंगोली,मुंबई अहमदनगर आदी ठिकाणाहून उपासक उपासिका उपस्थित होत्या.

यावेळी पद्मपाणी बुद्ध विहार , नालंदा बुद्धविहार साजापूर,पंचशील बुद्ध विहार , सिद्धार्थ बुद्धविहार आनंद बुद्धविहार, नागसेन बुद्ध विहार, लुंबिनी बुद्ध विहार म्हाडा कॉलनी तिसगाव, लुंबिनी बुद्धविहार रांजणगाव शेणपुंजी, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर अन्य अत्याचार विरोधी कृती समितीचे संपूर्ण पदाधिकारी, भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दलाचे कमांडर भीमसैनिकांसह विनिता सातदिवे, वसंत सातदिवे, राहुल सुभेदार, नामदेव सावंत, एल.एल. गायकवाड, विकास रामटेके, रमेश जोगदंडे, गौतम बनसोडे, नितीन जाधव, ड. सचिन जाधव , नितीन शेजवळ,कलीम भाई, आदींनी महत्वपूर्ण सेवा दिली. सूत्रसंचालन भंते करुणानंद यांनी केले.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. पंकज जाधव यांचे जिल्ह्यातील नागरिकांना आवाहन

जालना : महाराष्ट्रात विधानसभेचे वेळापत्रक जाहीर झाले असून जालना पोलिसां तर्फे निवडणुकीसाठी जय्यत तयारी सुरू आहे. त्या अनुषंगाने जालना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांनी आज दिनांक १९ शनिवार रोजी सकाळी बारा वाजेच्या सुमारास माध्यमांशी संवाद साधत नागरिकांना आवाहन केले आहे. जाधव म्हणाले की जालना जिल्ह्यामध्ये निवडणुका भयमुक्त वातावरणात व्हाव्यात यासाठी पोलीस प्रशासन सज्ज असून सायबर शाखेच्या वतीने तसेच शहरांमध्ये जागोजागी सीसीटीव्ही च्या माध्यमातून पोलिसांची करडी नजर असणार आहे. रात्री बे रात्री वाहनांचे कर्णकर्कश आवाज करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात येणार आहे.तसेच कोणीही अफवा पसरू नये किंवा अफवांवर विश्वास ठेवू नये, जातीय तेढ निर्माण होईल अशा प्रकारच्या पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल करू नये, अशा प्रकारचे आवाहन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांनी केले आहे

गावकऱ्यांच्या २४ तासांच्या प्रयत्नानंतर मृतदेह विहिरीबाहेर काढला, प्रशासनाचे दुर्लक्ष

परतुर -परतुर शहरापासून अवघ्या ५ किमी अंतरावर असणार्या सिरसगाव येथील विहिरीत जेसीबीसह बुडालेल्या मजुराचा मृतदेह तब्बल २४ तासानंतर विहिरीतून बाहेर काढण्यात गावकर्यांना यश आले आहे. प्रशासनाची भूमिका महत्त्वाची असताना संपूर्ण तालुका प्रशासन मात्र मदतकार्यात सपशेल अपयशी ठरल्याचे आढळून आले.

गावकर्यांनी विद्युतपंप लावून पाणी उपसले मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यासाठी खाजगी व्यक्तीला पाचारण करण्यात आले होते. शनिवारी दुपारी १२ वाजेच्या सुमारास मृत मजुराचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. मृतदेह बाहेर काढण्यासाठी अंकुश शिंदे, हरिभाऊ खरात, रवी खरात,भारत शिंदे, प्रभाकर जाधव, अनिल जाधव, राजू कंकाळ, नवनाथ खरात आदी गावकर्यांनी परिश्रम घेतले. परतूर येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आला. प्रशासनातील कोणतीही जबाबदार अधिकार्यांनी घटना स्थळाला भेट दिली नसल्याचे गावकर्यांनी सांगितले.

जालन्यातील मोती तलावात ४० वर्षीय भेळ विक्रीत्याची उडी घेऊन आत्महत्या

सायंकाळी ६ वाजेच्यासुमारास मारली पाण्यात उडी

जालना, दि. १९(प्रतिनिधी)- जालना शहरातील मोती तलावात शहरातली एका भेळ विक्रीचा व्यवसाय करणारे बालाजी शेषराव मैंद या ४० वर्षीय व्यावसायिकाने तलावाच्या पाण्यात उडी घेऊन आत्महत्या केल्याची घटना १८ ऑक्टोंबर रोजी सायंकाळच्या सुमारास घडली आहे. यावेळी त्या ठिकाणी उपस्थित असलेल्या नागरिकांनी आरडा-ओरडा केली असता त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र वाचवू शकले नाही.

यावेळी घटनेची माहिती चंदनझिरा पोलिसांना दिली. या माहितीवरून चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सम्राट सिंग राजपूत यांनी आपल्या फौजफाट्यासह घटनास्थळी धाव घेतली. यावेळी त्यांनी सुद्धा याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. मात्र बालाजी मैंद आढळून आले नाही. यावेळी घटनास्थळी अग्निशामक दल सुद्धा दाखल झाले व त्यांनी सुद्धा सुमारे तीन तास बालाजी मैंद यांचा तलाव परीसरात शोध घेतला मात्र ते आढळून आली नाही. यावेळी पोलीस प्रशासन व अग्निशामक विभाग व स्थानिक नागरिकांच्या मदतीने अथांग प्रयत्न केल्यानंतर तीन ते सव्वा तीन तासानंतर बालाजी यांचा मृतदेह आढळून आला नाही. रात्री नऊ वाजेच्या सुमारास शेख चांद पाशा याला तलावत शोधण्यासाठी पाठवण्यात आले. अर्धा तासानंतर बालाजी यांचा मृतदेह आढळून आला आहे.

यावेळी त्यांना तात्काळ जिल्हा रुग्णालयात दाखल केले असता त्यांना त्या ठिकाणी कार्यरत असलेल्या डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले आहे. याप्रकरणी चंदनझिरा पोलीस ठाण्यामध्ये आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस करत आहे. मात्र या व्यवसायिकाचा मृत्यूने संपूर्ण जालना शहरासह परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे, कारण हा व्यक्ती आपल्या परिवाराचा उदरनिर्वाह करण्यासाठी भेळचे स्टॉल लावून आपला परिवाराचा गाडा हाकलत होता आणि आज त्याच्यावर ही वेळ का आली यामुळेच परिसरात व शहरात एकच चर्चेला उधाण आली आहे.

महिलांसाठी वैजापुरात निवडणूक कार्यक्रम प्रशिक्षण आयोजन

वैजापुर प्रतिनिधी : वैजापूर येथील विनायकराव पाटील महाविद्यालयात विधानसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने स्वीप कार्यक्रमांतर्गत महिलांसाठी प्रशिक्षण आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष निवडणूक निर्णय अधिकारी डॉ अरुण जऱ्हाड यांच्या अध्यक्षतेखाली व तहसीलदार सुनील सावंत यांच्या प्रमुख उपस्थितीत गटशिक्षणाधिकारी मनीष दिवेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. महिलांनी जनतेमध्ये जाऊन मतदान जागृती करावी. सदर मतदान जागृती करताना लोककलेच्या माध्यमातून जन जागृती करावी .विविध ठिकाणी सेल्फी पॉइंट निर्माण करून त्या ठिकाणी घेण्यात आलेले फोटो अपलोड करावे .आपले कार्य हे स्मार्ट पद्धतीने करावे अशा सुचना यावेळी दिल्या.

चुनाव का पर्व देश का गर्व. हे अभियान राबवावे तसेच त्या मार्फत मतदानाची टक्केवारी वाढवण्याचा संदेश मतदारापर्यंत पोहोचवायचा आहे. प्रतिज्ञापत्रकाचे वाचन करून निर्भय व पारदर्शकपणे निवडणूक पार पाडावयाची आहे. आदर्श आचारसंहितेचे पालन सर्वांनी करावे . टपाली मात्र पत्रिकेची सुविधा आहे ही सुविधा कर्मचाऱ्यांसाठी असून मतपत्रिका बाद होणार नाही याची काळजी सर्व कर्मचारी यांनी घ्यावी .मतदानाची टक्केवारी

वाढवण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे यावेळी कुलकर्णी यांनी गीत गायन करून मतदान जनजागृती बाबत संदेश दिला. चला या ग या सयांनो मतदान करूया या गीतास गोड व मधुर स्वरामध्ये गायन केले.सोळा गावांची निवड करून तेथील प्रत्येक गावात प्रत्येक विभागातील महिलांनी मतदार जनजागृती कार्यक्रम सहभाग घ्यावा असा संदेश देण्यात आला .महिला स्वीपचा स्वतंत्र ग्रुप तयार करण्यात आलेला असून घेतलेल्या कार्यक्रमांचे व्हिडिओ फोटो त्या ग्रुप वर शेअर करावे असे सांगण्यात आले. शिंदे यांनी (वाघला) जिल्हा परिषद ला झालेल्या बैठकीची माहिती दिली. महिलांकडे काम न करणाऱ्या म्हणून पाहिलं जातं तर आपण महिलांनी पुढाकार घेऊन मतदार जनजागृती करावी. महिलांनी स्वतःला कमी लेखू नये .निवडणुकीदरम्यान पिंक बूथ (महिलांचे मतदान केंद्र)बनवण्यात येणार असून ज्या महिला कर्मचारी यांना त्या बूथ मध्ये काम करण्याची इच्छा असेल त्यांनी आपली नावे कळवावी. तसेच मनीष दिवेकर यांनी कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना मतदानाची टक्केवारी वाढविणे ही आपली सर्वांची जबाबदारी असून ग्रामीण भागातील महिला मतदारांची टक्केवारी वाढविणे आवश्यक असल्याचे सांगितले .त्याकरिता भारुड स्पर्धा ,रांगोळी स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करणे नव मतदारांना मतदान करण्यास प्रोत्साहित करणे, जनजागृती करणे ८५ वर्ष पेक्षा जास्त वय असणाऱ्या नागरिकांना आपल्या घरून मतदान करण्याची सुविधा जी शासनाने दिली आहे तिचा वापर करून मतदान करून घेणे. विद्यार्थ्यां मार्फत प्रत्येक घरी मतदान करण्याचा संदेश पाठविणे. जनजागृती बॅनर वाटप करून उत्कृष्ट काम करणाऱ्या महिलांचे अभिनंदन केले जाईल असे सांगितले. अशा पद्धतीने निवडणुकी प्रक्रियेमध्ये स्विप कार्य क्रमाद्वरे मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी उपक्रम घेऊन जनजागृती करण्यात येत आहे. सर्व निवडणूक कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेऊन हा कार्यक्रम यशस्वी करावा असा संदेश निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.अरुण जऱ्हाड यांनी दिला.